म. ग्रं. सं. ठाणे.
विषय जेवघ
सं. क्र. 3219

दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते

डॉ. योगेन्द्र मेश्राम

REFBK-0025379

निबंध । साहित्य समीक्षा
३२१९
२५३७९
२५१८८७

दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते

डॉ. योगेन्द्र मेश्राम

REFBK-0025379

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

दलित साहित्य
जेव्हा
चळवळ बनते

Dalit Sahitya
Jenvha
Chalval Bante

डॉ. योगेंद्र मेश्राम

Dr. Yougendra Meshram

प्रकाशन क्रमांक/५९

प्रथम आवृत्ती/आक्टोबर १९८७

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ,
नलवडे कॉलनी, सम्राटनगर
सागरमाळ, कोल्हापूर–४१६ ००८

मुद्रक
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क–कोल्हापूर. ४१६ ००३
फोन नं २३९०६

मूल्य रुपये ३५/–

© सौ. शारदा योगेन्द्र मेश्राम

१३४, नागसेन नगर,
पोस्ट जरीपटका,
नागपूर–४४० ०१४

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८



ऋणश्रेय

डॉ. वि. भि. कोलते
(माजी कुलगुरू, नागपूर विद्यापीठ)
डॉ. गंगाधर पानतावणे
प्राध्यापक, केशव मेश्राम
डॉ. वि. स. जोग, ताराचंद खांडेकर
डॉ. यशवंत मनोहर,
प्रा. जोगेंद्र कबाडे,
आणि
प्राचार्य टी. ए. गवळी
प्रचार प्रकाशनच्या संचालिका
सौ. नंदिनी गवळी,
मुद्रक श्रीपाद गोसावी,
चित्रकार स्टुडिओ मयूरचे
मधुकर ओतारी, उदय प्रोसेस
वितरक सिद्धार्थ बुक सेंटरचे
दिलीप गवळी

पूर्वप्रसिद्धी

१) दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते– (साप्ता. ' जयभीम ' नागपूर)

२) साहित्य आणि सामाजिक बांधिलकी (आं. जयंती विशेषांक १९८४ द. सा. संघ, अकोला)

३) दलित साहित्य हे आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य ('जयभीम' १८ फेब्रु. १९८४)

४) दलित जाणिवेचे साहित्य (' जयभीम ')

५) दलित साहित्यातील विद्रोह संपला आहे काय ? (अस्मितादर्श एप्रिल--मे–जून ८४)

६) दलित साहित्य : काही विचार वैशिष्टचे (जयभीम. . .)

७) दलित साहित्य आणि कलावाद (युगवाणी : मार्च-एप्रिल १९८४)

८) दलित साहित्य : सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता (ऋतुगंध : दि. ८३)

९) दलित चळवळ : व्यापकता आणि मर्यादा (अस्मितादर्श : दि. अं. १९७९)

१०) दलित चळवळ आणि मार्क्सवाद (अस्मितादर्श : दि. अं. १९८०)

११) दलित चळवळ आणि जातीचे राजकारण (साप्ता. ' जयभीम. . .)

१२) दलित साहित्य : एक हत्यार (नागपूर पत्रिका. . .)

१३) दलित चळवळीच्या पडझडीमधील अक्षरदुवा (नागपूर पत्रिका. . .)

माझे जन्मदाता दिवंगत
लक्ष्मण हिरामन मेश्राम
यांच्या प्रेरणादायी स्मृतीला –

अनुक्रमणिका

१) दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते १
२) साहित्य आणि सामाजिक बांधिलकी ७
३) दलित जाणिवेचे साहित्य २२
४) दलित साहित्य हे आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य १४
५) दलित साहित्यातील विद्रोह संपला आहे काय ? २८
६) दलित साहित्य : काही विचार–वैशिष्ठ्ये ३४
७) दलित साहित्य आणि कलावाद ४०
८) दलित साहित्य : सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता ५७
९) दलित चळवळ : व्यापकता आणि मर्यादा ६५
१०) दलित चळवळ व मार्क्सवाद ७८
११) दलित चळवळ आणि जातीचे राजकारण ९५
१२) दलित साहित्य : एक हत्यार १०४
१३) दलित चळवळीच्या पडझडीमधील अक्षरदुवा १११



भूमिका : एक संदर्भ

' दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते–' या नावाचे माझे हे साहित्य व चळवळविषयक वैचारिक लेखसंग्रहाचे पुस्तक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. ' दलित ' नावाचे साहित्य जेव्हापासून प्रसवले गेले, तेव्हापासूनच ते मराठी साहित्यिक–समीक्षकांमध्ये एक चर्चेचा विषय बनले. लवकरच त्याने मराठीच्या प्रांगणात एक अभिनवसुंदर असे भक्कम दालन निर्माण केले त्याने मराठी साहित्याला एक नवे तेज, नवी झळाळी दिली. त्याने नवी मूल्यगर्भ अशी सुंदर भर घातली.

मुळात या साहित्याच्या चाकोरी वेगळ्या आणि पहिल्यांदाच जीवनाला इतके समरसून भिडून जाणाऱ्या संवेदनानुभूतींच्या आणि एका अुपेक्षित–दुर्लक्षित सामाजिक जीवनवास्तवाला उजागर करणाऱ्या आविष्काराने मात्र प्रस्थापितांचे डोळे दिपविले. प्रारंभीला उलटसुलट प्रतिक्रिया सुरू झाल्या–आणि हळूहळू विरतही गेल्या तोवर एक अस्सल भारतीय दलित जीवनाचो सर्वस्पर्शी नि सुंदर अभिव्यक्ती म्हणून सिद्ध झालेले दलित साहित्य जगभर सन्मानित झाले. आणि येथील प्रतिकूल कठोर प्रस्थापितालासुद्धा एक मानवतावादी व जीवनस्पर्शी असे ज्वलंत जिवंत साहित्य म्हणून ' दलित ' साहित्याला अखेर मान्यता द्यावीच लागली.

खरे तर दलित साहित्य–निर्मितीचा तसा अल्पसाच काळ लोटलेला. म्हणून ते निर्मितीच्या अंगाने थोडे आहे. त्याची गुणात्मक बाजू मोठी आहे–असेल, पण आकार–व्यापार व विस्ताराने ते अजून एवढेसे आहे, हे खरे. या जीवनाची आणखी ' विशेष ' अशी विविध प्रांगणे त्याने अजून ओलांडावयाचीच आहेत. निर्मितीचा, हा सर्वदूर नि सर्वव्यापी सुकाळ होण्यासाठी मात्र आणखी काही काळ जावा लागेल हेही खरे. तथापि, दलित साहित्य एक ' चळवळ ' म्हणून तिची उन्हाळी पानगळीप्रमाणे पडझडसुद्धा बदलत्या (अनुकूल–प्रतिकूल) काळाबरोबर चालू राहील. हे गृहित धरूनच संख्यात्मकतेबरोबर आपली मूल्यवान गुणात्मकता व प्रथम तीच दलित साहित्याने टिकवून धरावयाची आहे. ती कायम राहावी, राहीलही. कारण मुळात व्यापक मानवतेचा व सृजनाचा भक्कम असा अक्षरदुवा दलित साहित्य चळवळीला लाभलेला आहेच.

अशा या साहित्याची प्रथम महाराष्ट्रात एक चळवळ उभी झाली. ती पुढे देशभर वणव्यासारखी पसरू लागली. चळवळ ही राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक (धार्मिक) असते. पण साहित्याची आणि साहित्यिकांचीही जेव्हा ' चळवळ ' बनते, तेव्हा तिला सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रात एक विशेष अर्थमूल्य व संदर्भ प्राप्त होत असतो. तो अर्थान्वय व संदर्भ–चर्चाच या पुस्तकाचा खरा विषय आहे. ' दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते–'

या पुस्तकाला एक जेष्ठ विचारवंत, साहित्यिक व साक्षेपी संशोधक डॉ. वि. भि. कोलते (माजी कुलगुरू, ना. विद्यापीठ) यांनी अनेक कामाचा व्याप असतानाही अग्रक्रमाने लिहून दिलेली मौलिक प्रस्तावना लाभलेली आहे. मी त्यांचा फार ऋणी आहे. कृतज्ञ आहे. त्याबद्दल प्रिय श्रेयस डॉ. वि. स. जोगांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या लेखामागच्या काही प्रेरणावंतांच्याप्रती मनातली कृतज्ञता व्यक्त करून इथे थांबतो.

१३४, नागसेन नगर, नागपूर–१४
दिनांक ३० डिसें. १९८६.

– लेखक

पुरस्कार

डॉ. योगेन्द्र मेश्राम हे दलित साहित्याचे चांगले जाणकार आणि कथालेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. ' रक्ताळलेली लक्तरे ' हा त्यांचा कथासंग्रह सहा वर्षापूर्वीच प्रसिद्ध झालेला आहे, आणि आता, त्यानी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा संग्रह " दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते " प्रकाशित होत आहे.

" यातील पहिल्याच लेखाचे नाव त्यानी या ग्रंथाला दिलेले असले, तरी बहुतेक लेख दलित साहित्य आणि दलित चळवळ या दोन विषयांना प्रामुख्याने वाहिलेले आहेत. दलित साहित्यासंबंधीच्या डॉ. मेश्राम यांच्या संकल्पना सुस्पष्ट आहेत. दलित हा शब्द निष्क्रिय वा वांझ नसून शंतकाशतकांच्या कढत अश्रूंचे मोल घेऊन आलेला तो शब्द सृजनाचे, सर्जनशीलतेचे, कृतिमप्रवणेतेचे स्फुरणदायी प्रतीक ठरलेले आहे. या सर्व दृष्टीतून दलित नावाच्या वेगळ्या साहित्याची समाजाला गरज आहे. अशी त्यांची दृढ धारणा आहे. या दलित साहित्याची सर्वच दृष्टींनी एकमेव मूलात्म प्रेरणा डॉ. आंबेडकर हीच होय. कारण, आंबेडकर म्हणजे या क्रांतियुगाचा परिवर्तनवादी विचार आहे. न्याय, समतेचं, मानवतेचं तत्त्वज्ञान आहे. आणि ते संघर्ष–प्रेरक आहे किंबहुना समाजातील अन्याय, विषमतामूल परिस्थिती पोसणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपणाचे हक्क व प्रतिष्ठा मिळवून देऊ इच्छिणाऱ्या वर्णजातीय समाजव्यवस्थेला तोडून नवी समाजरचना आणि मानवतेची प्रस्थापना करू पाहणाऱ्या आजच्या दलित चळवळीला विद्रोह–बंड–नकारादी लाभलेली प्रेरक तत्त्वे प्रसृत करणारे एकूण आंबेडकरी दर्शन म्हणजेच आंबेडकरवाद. हेच दलित साहित्याचेही ध्येय होय. अर्थात ते परिवर्तनवादी आहे. या सामाजिक बांधिलकीत दलित जाणीव अंतर्भूत आहे.

' रक्तलांच्छित वेदनांचा आक्रोश पाठीस घेऊन ' वाटचाल करणाऱ्या जीवनाचे निराळेपण हेच दलित वाङ्मयाचे प्रस्थापित पांढरपेशी साहित्याहून वेगळे वैशिष्टय आहे. ते एक वेगळे जीवनदर्शन आहे. दलित साहित्याने देव-दैव, धर्मरूढीच्या संचिताबरोबरच प्रस्थापित वाङ्मय परंपरेच्या कालबाह्य

कलासंकेताचा त्याग केलेला आहे. ही आपली भूमिका डॉ. मेश्राम यांनी या लेखांतून समर्थपणे मांडली आहे. त्या भूमिकेवर त्यांची दृढ श्रद्धा आहे. तिचे ते कट्टे समर्थक आहेत. या विचारांच्या व भूमिकेच्या आड येणाऱ्या इतर सर्व विचारांवर म्हणूनच ते तूटून पडतात. कलावादाला त्यांचा विरोध आहे. 'साहित्य हे अगदी स्वतंत्र प्रतिभानिर्मित स्वायत्त' वगैरे असले पाहिजे हे कलावाद्यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. कारण त्यांच्या मते स्वातंत्र्याच्या नावाखाली परंपरेने चालत आलेला स्वैराचार व व्यभिचार मांडण्याची, तसेच धर्मरूढी संकेत बेमालूमपणे जतन करण्याची व पोसण्याचीच मोकळीक कलावाद्यांना पाहिजे असते. 'दलित साहित्य आणि कलावाद' व 'दलित साहित्य: सौंदर्यदृष्टी कलात्मकता' या दोन लेखांत त्यांनी या प्रश्नाची चर्चा करून मर्ढेकरादी कलावाद्यांचा व समीक्षकांचा खरपूस समाचार घेतला आहे. व त्या पार्श्वभूमीवर 'विद्रोहाचा अंगार आणि वेदनेचा पोळ घेऊन निर्माण झालेल्या' परिवर्तनवादी दलित साहित्याची बाजू हिरीरीने मांडली आहे.

प्रस्थापित मराठी साहित्यातील जीवनवादी आणि सामाजिक बांधिलकी मानणारा विचारप्रवाही, परिवर्तनवादी नसून परंपरानिष्ठ बांधिलकी मानणारा, स्थितिप्रिय वाङ्मय प्रवाह असल्यामुळे त्यालाही डॉ. मेश्राम यांचा विरोध आहे. याच कारणामुळे स्थितिप्रिय ज्ञानेश्वर व त्यांची 'संतावली' यांचे वाङ्मय ते नाकारतात. ग्रामीण साहित्य, जनसाहित्य हेही त्यांच्या मते स्थितिप्रियच असल्यामुळे त्याना मान्य नाही. धर्मसंस्कृतीने आणि वर्णजाती व्यवस्थेने या देशात चालविलेल्या मानवद्रोह, समाजद्रोह या विरुद्ध 'विद्रोह' पेटविणाऱ्या दलित साहित्यासमोर हे सर्व साहित्यप्रवाह त्याना ढोंगीपणाचे व एकांगी वाटतात.

या निरनिराळ्या दृष्टिकोणातून दलित साहित्याची व दलितांच्या राजकारणाची भूमिका डॉ. मेश्राम यानी आग्रहपूर्वक व परखडपणे मांडली आहे, यात शंका नाही. या दोहींच्या चळवळींच्या मर्यादांचीही त्याना चांगली जाणीव आहे, असे दिसून येते. ते येथे अंतर्मुख होऊन आत्मपरिक्षण करताना व तेवढ्याच वेधकपणे चळवळीचा चिंतनात्मक आत्मशोध घेतानाही आढळतात. डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेल्या सामाजिक व राजकीय चळवळी शिथिल होत चालल्या आहेत की काय, अशी त्याना शंका वाटते. डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांतील काहीजण काँग्रेसमध्ये शिरले आहेत तर काहीजण आंबेडकरांच्या नावाने निरनिराळे पक्ष स्थापन करून एकमेकांच्या शक्ती क्षीण करीत आहेत. 'आजचा सुशिक्षित दलित तरूण आर्थिक हितसंबंधासाठी वरच्या पायरीवर जाऊ इच्छितो, गेल्यावर तिथे तो गुंततोही, कधी कधी दलितांतील ब्राह्मण बनून त्यांच्यातच वावरतोही.' (पृ. ९४) ते म्हणतात– "दलितांचे राजकारण पडले. मागाहून तिच क्रिया सामाजिक व

सांस्कृतिक बाबतीत घडू लागली. .... ' राजकीय ' रिपब्लिकन पक्षाचे झाले तेच ' सामाजिक ' पॅन्थरच्या वाट्याला आले. दलितांच्या घसरगुंडीस लागलेल्या राजकारणाची अशुभ छाया पडून धार्मिक बाबतीतसुद्धा एकसंघ अभिन्नत्त्वाचा ' उःशाप ' दिसत नाही." (पृ. ११५)

दलित साहित्याच्या चळवळीतही त्याना हेच दृश दिसते. " प्रत्यक्ष दलितांतील काही शिक्षित उच्चपदस्थ अधिकारी, डॉक्टर, वकील, समाजसेवक इत्यादींना ' दलित साहित्य लिहिणे म्हणजे मांगवाडे, महारवाडे माजविणे, दलित साहित्यिक म्हणवून घेणे म्हणजे जातिभेद पाळणे–म्हणजे जातीयवादाला वळ देणे ' अशा पराकोटीची संकुचित आत्मश्लाघ्य दृष्टी, अनास्था व अपसमजूत काही दलितेतरांप्रमाणेच आजच्या काही पांढरपेशी वृत्तीच्या दलितांमध्येही आढळून येते." (पृ. १६) ' दलित साहित्याची चळवळ....निष्प्रभ झाली नसली... तरी जरा सैराभरा झाल्यासारखी मात्र वाटते. तिच्या मूळ क्रांतिप्रेरक विद्रोहातील ताकद काहींशी शिथिल पडल्यासारखी वाटते ' (पृ. ३) ' दलितांच्या या साहित्य चळवळीतही सृजनशील निर्माणकर्त्या साहित्यकारांत विभिन्नत्त्वाची, वर्तुळत्त्वाची वा विलगत्वाची हेतूगर्भित प्रस्थापित उद्दिष्टचे अध्याहृत होताना दिसत आहेत. त्याचे एक कारण दलितांच्या साहित्यिक चळवळीला झालेला होऊ पाहणारा भारतीय मार्क्सवादी विचारवंत व लेखकांचा हस्तक्षेप होय.' (पृ. ११५) म्हणूनच डॉ. मेश्राम यानी येथील मार्क्सवाद्यांचा समाचार घेतला आहे. या सर्व कारणांची त्यानी मीमांसा केली असली तरी त्या वस्तुस्थितीची त्याना जाण आहे. हे चांगलं चिन्ह आहे. याचबरोबर त्याना याचीही जाण आहे, की–" चार्वाकाचा विज्ञाननिष्ठ भौतिकवाद व पुनर्जन्म, चातुवर्ण्यादी कल्पनांना कडवा विरोध, गौतमबुध्द व महावीरांनी वर्णव्यवस्थेविरुद्ध केलेला उठाव आदी सर्व समतावादी आंदोलनांचा हितसंबंधी उच्चवर्णियांनी कसा पराभव केला हा सारा इतिहास अनेकांना ज्ञात आहेच. पण अगदी अलीकडचा अनुभवही वेगळा नाही. " याचीही कारणमीमांसा त्यानी केलेली असली, तरी त्याना प्रतीत होणाऱ्या या वास्तवावरून यापुढे दलित चळवळ व दलित साहित्याची चळवळ यांचे पुढे काय होणार आहे, यासंबंधीची त्यांच्या अंतर्मनात सुप्त स्वरूपात असलेली चिंता तर व्यक्त होत नाही ना, असे वाटल्यावाचून राहत नाही.

डॉ. मेश्राम यांच्या या लेखांवरून दलित चळवळ व दलित साहित्य यांच्या विषयीचे त्यांचे आकलन, त्यांच्या प्रेरणास्थानांवरील त्यांची निष्ठा, या संबंधात उपस्थित होणारे निरनिराळे प्रश्न व आक्षेप इत्यादींची उत्तम कल्पना येते. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. या लेखसंग्रहामुळे दलित साहित्यातील विचारवंत म्हणून त्यांची असलेली कीर्ती वाढेल. त्यांचे हे विचार

दलित व दलितेतर या सर्वांनाच मार्गदर्शक होतील व विचार करायला लावतील, यात शंका नाही.

या संग्रहातील डॉ. मेश्राम यांची भाषाही कमावलेली व परिष्कृत आहे. त्यांच्या आक्रमक प्रतिपादनाला आवश्यक असे ओज तिच्यात आढळते. क्वचित... 'जन, ग्रामीण' वाले आणि 'टूम' वाले कितीही उलटचासुलटचा बोंबा मारू देत... ' अशा आवेशाच्या भरात त्यांच्या भाषेचा तोल सुटतो, पण तो क्वचितच कालांतराने तो साकरला जाऊन त्यांच्या भाषेचे सुंदर वळण व तिची वेधक शैली अधिकच विकसित होईल आणि विषयप्रतिपादनाच्या दृष्टीने ती विशेष परिणामकारक होईल, असा मला विश्वास वाटतो. डॉ. योगेन्द्र मेश्राम यांच्या या वैचारिक व समीक्षात्मक लेखनाबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व या वाटचालीत त्यांना सुयश चिंतितो.

नवी रामदास पेठ
नागपूर–१०

वि. भि. कोलते

दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते

आंबेडकरी प्रेरणेच्या दलित साहित्यातील विद्रोहाच्या स्वरूपाचा साधक बाधक विचार करणे, त्या साहित्याची विकास प्रक्रिया समजून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. तो विचार सर्वसामान्य दलित दृष्टी निवळण्याच्या हेतूने केल्यानंतर येथे हे साहित्य जेव्हा ' चळवळ ' बनते किंवा चळवळीचे रुप धारण करते, तेव्हा चळवळकर्त्या साहित्यिकांच्या दृष्टिकोणाचा आणि त्यांच्या एकनिष्ठ वा बहुनिष्ठ वाङ्मयविषयक प्रेरणा जाणीवाबद्दलचा पूनरपि विचार करणे आवश्यक ठरते. दलित साहित्य ही एक सामाजिक घटना किंवा एक चळवळ म्हणून प्रथम सामाजिक पातळीवरून तो विचार करता येतो, त्याप्रमाणे व्यक्ती ही समाजाची मूल घटक म्हणून व्यक्तिगत पातळीवरून तो करावा लागतो. तो विचार, दलित साहित्याचा प्रथम 'चळवळ' म्हणून विचार मांडल्यानंतरच आपणास करता येईल.

चळवळ म्हटली, की तिला काहीएक बदल हवा असतो. हा बदल मानवतेला अपायकारक आणि समाजोत्थानाला अडसर घालणाऱ्या जुन्या जीर्ण वा कालबाह्य मूल्यांच्या राखेवर उभा होण्यासाठी चळवळकर्त्यांची धडपड असते. एकूण चळवळ म्हणजे मनुष्यजीवनाला त्याच्या उभतावस्थेकडे नेणारी एक धडपड, जीवनाला वर्धिष्णू करणारी एक संघटित आचार–विचाराची संघर्षमय प्रक्रिया. चळवळप्रणीत लढ्याला प्रेरणा देणारी ती एक सुत्रबद्ध सामाजिक यंत्रणाच असते. म्हणून इथे चळवळीलाही एक–एक संपूर्ण सामाजिक जीवन असते. त्या समाजजीवनाचे त्याच्या कथाव्यथांमधून व्यक्त होणारे समान दुःख असते, आणि दुःखोद्भूत समान स्वरूपाच्या काही ज्वलंत समस्या असतात. त्यांच्या सोडवणुकीकरिता इथे मात्र व्यक्ती-व्यक्तीच्या वैयक्तिक हितसंबंधापेक्षा एका उर्जस्वल सामाजिक हेतू सिद्धीसाठी समान उक्ती, कृती आणि विचारप्रणालीचा अवलंब करून सामूहिक हित साधण्याचा जेव्हा एकाच पातळीवरून सुसंघटितपणे व सूत्रबद्ध रीतीने सर्वांगीण प्रयत्न होतो, तेव्हा त्या वैचारिक सामाजिक घटनेला, संघटनेला चळवळीचे रूप प्राप्त होत असते. सामाजिक साहित्यिक चळवळ अशी जन्माला येते व साकारते.

मानवसमाजाच्या एकूण धडपडीमागे जो विचार संदर्भ अर्थसंकल्प वा हेतू असतो, त्या विचार, हेतू संकल्पासह चळवळीला सफल व सकळ चढाईसाठी लढाई करावी लागते. म्हणजे चळवळीच्या मार्गात संघर्ष हा अपरिहार्यपणे येतो. संघर्षाला अंतिमतः ' क्रांती ' अभिप्रेत असते. क्रांतीनंतर अपेक्षित बदल, परिवर्तन घडत असते. ह्या शब्दांना सामाजिक संदर्भात अर्थमूल्य, आशयमूल्य प्राप्त करून देणारी जीवनाची अभिव्यक्ती म्हणजे साहित्य. ' दलित ' संदर्भात दलित साहित्याची चळवळ अशीच मूल्यसंपन्न झालेली आहे. आणि ती आज दलितांच्या सामाजिक सांस्कृतिक चळवळीचे प्रधान अंग बनली आहे, जीवनमूल्य झाली आहे.

दलित साहित्याची चळवळ ही निर्मितीशील कलावंतानी चालविलेली 'निर्मात्यांची चळवळ' आहे.(प्रा. रा. मुक्तिबोध)या म्हणण्यातील ' निर्मात्यांची चळवळ ' याचा अर्थ जुन्याच जागी काही नवे निर्माण

करू इच्छिणाऱ्या निर्मितीक्षम माणसांची चळवळ. त्यात नवनिर्माण करावयाचे म्हणजे पुनर्रचना करावयाची नसून कालबाह्य अनिष्टाला, विपरिताला गाडून त्याजागी नव्या जीवनमूल्यांची व युगपरिवर्तनाच्या शुद्ध मानवी मूल्यांची नव्याने प्रतिष्ठापना करावयाची. या नव्या रचनेसाठी क्रांती होणे अपरिहार्य असते.दलितांच्या सामाजिक वाङमयीन चळवळीमागे परिवर्तनाच्या क्रांतिमूल प्रेरणा निश्चितच आहेत.

क्रांतीचे-परिवर्तनाचे ध्येय असलेल्या दलित चळवळीमधील निर्मितीशील कलावंत चळवळकर्त्यांची आपल्या ध्येयावर तेवढीच निष्ठा असली पाहिजे. ती निष्ठा जीवनातून व त्यांच्या बांधिलकीयुक्त सामाजिक जाणिवेतून निर्माण व्हावी लागते. सामाजिक चळवळीच्या म्हणून समाजजीवनाच्या संदर्भात जीवननिष्ठांशी प्रमाणित व प्रामाणिक असल्याशिवाय माणूस कुठल्याही गोष्टीशी एकनिष्ठ राहू शकत नाही. प्रामाणिक, ध्येयनिष्ठा, श्रद्धा, त्याग ही मनुष्य स्वभावमूल साधने प्रत्यक्ष चळवळीत कार्यान्वित होतात की नाही, याचा इथे दलित कलावंत, चळवळकर्त्यांनी आत्मनिरिक्षणावर विचार करणे अगत्याचे आहे.

दलित साहित्याची चळवळ ही जीवनाचा गर्भितार्थ सांगणाऱ्या मानवी अनुभवमूल्यावर जोपासणारी समाजसृजनाचे व प्रबोधनाचे कार्य करणारी एक प्रभावी चळवळ आहे. ती निष्प्रभ झाली नसली, किंवा कुठे थांबलीही नसली, तरी जरा सैराभरा झाल्यासारखी मात्र वाटते. तिच्या मूळ क्रांतिप्रेरक विद्रोहातील ताकद काहीशी शिथील पडल्यासारखी वाटते.

विद्रोह म्हणजे विद्रोह, तो नवनिर्माणाच्या विधायक कार्यासाठी असेल, तर मग कुठल्याही अन्यायमूल प्रतिगामी शक्तीविरुद्ध विद्रोहाचा लढा हा द्यायलाच पाहिजे. विषमतेचे व अन्यायाचे संवर्धन करणाऱ्या पारंपरिक रुढी-धर्माविरुद्ध व संस्कृतीविरुद्ध पहिल्यांदा दलित विद्रोहाने भिडणे स्वाभाविक आहे. पण हा आहे तो व सारखाच विद्रोह पुरेसा व्यापक नाही. दलितांच्या विद्रोहाने विश्वात्मक व्हायला पाहिजे आहे. जाचक अशा भूतकाला बरोबरच दाहक वर्तमानातील असामाजिक तत्वाचे पोषण करणाऱ्या आजच्या प्रतिगामी प्रवृत्तीचा, समाजविघातक

गुंडनीतिज्ञ झुंडशाहीचा, पक्षपात करणाऱ्या वर्ण-अहंकारी जातीयवादी सत्ताधाऱ्यांचा, धर्मवत स्वार्थी शोषकांचा, भ्रष्टाचाऱ्यांचा आणि अत्याचारी, पाखंडखोर समाजद्रोह्यांचा सारखाच आणि कडवा विरोध चौफेर व्हायला पाहिजे आहे. दलितेतर किंवा ब्राह्मणोतर मध्यम वर्गीय जातीयवादयांचा विरोध ब्राह्मणग्रस्त वृत्ती दलितांची शत्रू खरी, पण ती वृत्ती आज ब्राह्मणातच उरली नसून कुणबी, मराठा या ब्राह्मणेतरांमध्येही किंबहुना त्यांच्यामध्येच आज अधिक उतरलेली दिसते. आजचे जातीयवादी सामाजिक उत्पाद जास्तीत जास्त कोणामुळे घडतांना दिसतात ? त्यांच्यातच कशाला, दलितांतील 'हरिजना' मध्ये आणि क्वचित आपल्या-तुपल्यातूनही ती ब्राह्मण्यग्रस्त वृत्ती समाजात वावरताना दिसत नाही काय ?

तात्पर्य, जेथे जेथे ही समाजवृत्ती आढळते, त्या सर्व विषारी केंद्रावर दलित धारेचा मारा व्हायला हवा आहे. त्याचप्रमाणे मराठीमधील प्रस्थापित साहित्याचे. पुरोगामित्त्वाच्या मखमली पांघरुणाखाली गत कालच्या मृतात्म्यांचे जुनेच संदेश, स्मृति संकेत व आदर्श नव्या ढंगाने आणि गुलगुलीत मोहक भाषाशैलीत गुंफून वाचकांना मूर्ख बनविणाऱ्या आजच्या बहुरुपी, वाङमय प्रवाहाची दुचाकी चलन दलित साहित्याने मोडून टाकली पाहिजे. त्याच्या आतल्या चेहऱ्याचा गळा आवळणे आवश्यक आहे.

दलित साहित्याच्या या प्रयोजन उद्दिष्टांची आजवर बरीच चर्चा झालेली आहे. येथे या साहित्याचा चळवळीच्या दृष्टिकोणातून विचार करताना असे दिसून येते की, दलितांच्या सामाजिक वा राजकीय क्षेत्राप्रमाणेच वाङमयीन क्षेत्रातही व्यक्ती वर्तुळवाद निर्माण झाला व होत आहे. चळवळीत एकदा व्यक्तिवाद उपटला, की चळवळकर्त्यांमध्ये आपसातच निष्फळ स्पर्धा जन्माला येते. आणि त्या स्पर्धायुक्त अंतर्विरोधामुळे त्या चळवळीच्या मूळ ध्येयाचे, उद्दिष्टांचे केंद्र बाजूला सरकते. पण तोपर्यंत व्यक्तिवादाच्या आहारी गेलेल्यांच्या हे लक्षात आलेले नसते. तोपर्यंत त्यांची विद्रोह, बंड शक्ती शिथील झालेली असते. मग ते मूळाला सोडून झाडाची पानेच झोडू लागतात. दोरीलाच

साप समजून झोडपतात. कारण त्यात माणसाला आंधळे करणारा अहंवाद शिरलेला असतो. सामाजिक जाणिवेच्या निर्मितीक्षम पातळीवर क्वचित अहंवाद उभा असला, तर एखाद्यावेळी शोभतोही. पण तो जेव्हा व्यक्ती, वर्तुळवाद, व्यक्तिद्वेष, स्पर्धा यातून व्यक्तिगत पातळीवर उतरतो, त्यावेळी चळवळीची 'शोभा'च सुरू होते. तिचे ध्येय खुजे होते आणि पाणी आटते.

तात्पर्य हे की, दलित चळवळ जोपर्यंत व्यक्ति अहंमन्यता आणि व्यक्ती, वर्तुळ वादापासून पर्यायाने विभिन्नपणा, विच्छिन्नपणा, वा विलगता यापासून मुक्त होणार नाही, तोपर्यंत तिला एकसंघानी एकसंघतेची खरी ताकदसुद्धा प्राप्त होणार नाही.

जे समाजाभिमुख आणि समाजानुबंधित असायला हवे होते, ते दलितांचे राजकारण अंतःस्पर्धा स्वार्थ व व्यक्तिवादाला डोक्यावर घेऊन आत्मनाशापासून वाचायचेच तेवढे राहिले. दलितांची वाङ्मयीन चळवळ मात्र तिच्यात शिरलेल्या काही प्रमादासहसुद्धा समाजाभिमुख राहिली आहे. एवढेच नव्हे, तर त्यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक साऱ्या चळवळीमागची ती प्रेरणा, एक प्रभावी शस्त्र साधन आहे. तसेच ह्या चळवळीला गतिशील ठेवणारी, तिला लढ्याचे पथ दर्शविणारी आणि पथदिग्दर्शनाचे संस्कार करणारी समाजजीवनाची एक सामर्थ्यवान तात्त्विक वैचारिक सामूग्रीही ती असल्याने विशेष महत्त्व पावली आहे. अशी ती दलित साहित्याची चळवळ आपल्या प्रेरणामुळे ध्येयमार्गापासून भरकटून जाता वा शीथील होता कामा नये.

पण याही चळवळीत विचार विलगतेचे, प्रेरणा विलगतेचे केंद्रभिन्न विसंवादी वाद शिरत असल्याचे आणि त्यातून ग्रह विग्रह निर्माण होत असल्याचे दिसते. चळवळकर्त्यांची अशी प्रेरणाभिन्न वादांशी आढळणारी तडजोड चळवळीच्या केंद्रिभूत लढ्याचे भान हरवीत असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे इथे स्वच्छ आणि स्पष्ट आहे, की दलित साहित्याची एकमेव मूलात्म प्रेरणा ' आंबेडकर हीच आहे. सामाजिक दलित जीवन नि जीवनाचे भवितव्य घडविणारी सारी विचारसृष्टी आणि चळवळीचे तत्त्वज्ञान या संदर्भातील

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान अनन्यसाधारण आहे, यात शंकाच नाही. दलितांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधन व परिवर्तनाचे परिवर्तनाच्या लढ्याचे आत्मभान जागृत ठेवणारी प्रेरणा ' आंबेडकर ' हीच असल्याने हे प्रेरणा केंद्रच दलित साहित्याच्या चळवळीला गतिशीलता प्राप्त करून देऊ शकते.

दलितांतील चळवळकर्त्या कलावंत निर्मात्यांनी सतत हे भान जागृत ठेवले तर चळवळीत शिरु पहाणारे ग्रह दुराग्रहाचे, विसंवादाचे आणि पर्यायाने विलगतेचे संभवनीय प्रमाद वा विपर्यास त्यांना टाळता येतील. किंवा चळवळीत निर्माण होणाऱ्या विपर्यास, विसंवादामुळे तिला बसणाऱ्या विभाजनाचे, उण्यादुण्याचे हादरे आपोआप गिळता येतील. आणि दलित साहित्याची चळवळ आहे याहून अधिक तेजस्वी वाटेने वेगवती करता येईल.

o o o

साहित्य आणि सामाजिक बांधिलकी

साहित्याच्या संदर्भात सामाजिक बांधिलकीचा उलटसुलट विचार अलिकडे सभासम्मेलनातून जोरदारपणे मांडला जात आहे. आपण पाहतो, की सामाजिक असो अथवा साहित्यिक चळवळ असो, तिला एक विशिष्ट परिस्थितीभूत सामाजिक बांधिलकी असते. ती परंपरा-निष्ठ आणि परिवर्तननिष्ठ दोन्ही प्रकारच्या लेखनप्रवृत्तीमागे उभी असते, यात शंका नाही.

एक स्थितीप्रीय प्रवृत्ती. दुसरी परिवर्तनप्रिय प्रवृत्ती. हचा दोन्ही प्रवृत्ती परस्पराविरुद्ध, म्हणून आरंभापासून त्यांच्यामध्ये सतत संघर्ष चालत आलेला आहे. श्रीकृष्ण, मनू, आदिशंकराचार्य किंवा उदयनाचार्य हे पूर्वीचे धर्ममार्तंड समाजरचनाकार स्थितीशीलतेचा कैवार घेणारे एकीकडे, तर–विशुद्ध बुद्धिप्रामाण्यवादी, परिवर्तनवादी गौतम बुद्ध आणि बुद्धाच्या आगेमागे झालेले चार्वाक, केशकंबली, रुणाद, कपिल इ. हे पहिल्या प्रवृत्तीच्या तत्त्वज्ञानिक – वैचारिक धारेला विचाराच्या पातळीवर विरोध करणारे तत्कालीन पुरोगामी प्रवृत्तीचे, तत्त्वज्ञानी दुसरीकडे. भ. श्रीकृष्णाच्या भगवद्गीतेवर भाष्य करणारे कविश्रेष्ठ

ज्ञानेश्वर हेही पहिल्या परंपरेचेच पुरस्कर्ते होत. ज्ञानेश्वरांनी आपल्या भाष्यासाठी गीता निवडली, परंतु मुळात विज्ञाननिष्ठ, समाज परिवर्तनवादी आणि मानव्याने ओतप्रोत विचारमूल्य देणारे बुद्धाचे त्रिपिटकासारखे तत्त्वदर्शन त्यांना आपल्या भाष्यासाठी निवडता आले नाही, हे कशाचे निदर्शक? उलट त्यांनी गीतेत श्रीकृष्णाने सांगितलेल्या 'चातुर्वर्ण्य मया सृष्टम्...'–चा पुरस्कार करताना–

'पै द्विजसेवे परौते धावणे नाही शूद्राते । चातुर्वर्णी उचिते दाविली कर्मे ।।' असे म्हटले आहेच ना ? ज्ञानेश्वरांनी इथे विरोध दर्शविला असता, (तो त्यांना तसा करता आलेला नाही–ही त्यांची मर्यादा)तर त्यांचे 'पसायदान' खऱ्या अर्थाने वैश्विक ठरले असते. त्यांचा व्यापक मानवतावाद अधिक व्यापक नि विश्वस्पर्शी झाला असता.

ज्ञानेश्वर संचालित संतावळीमध्ये नामदेव-एकनाथ-तुकारामादी संत हे तर 'ठेविले अनंते तैसेचि राहावे-चित्ती असो द्यावे समाधान'-असा दैववाद पोसत आणि आपली 'शूद्र' अवस्था व तिची अगतिकता कबूल करीत करीत धर्मरुढीमूल समाजव्यवस्थेलाच शरण गेलेले आहेत. संत रामदास हे तर जातिवर्ण-अहंकाराचे कडवे पुरस्कर्ते होते. 'चांडाळ / अंत्यज कितीही मोठा ज्ञानी असला, तरी तो गुरू होणे–हे घडेना की ! त्याला सदा दूर ठेवून विटाळ करावा, अशाच लायकीचा तो चांडाळ !'–अशा प्रकारचे अत्यंत जहाल भेदभावमूलक जातिवादी उद्‌गार रामदासांनी काढले आहेत. एकूण संत शिकवणुकीचा, त्यांच्या अभंग वाङमयाचा सामान्य जनजीवनाच्या तळापर्यंत होणारा शिरकाव व परिणाम ह्या विषमतामूल धर्मरुढीचे संस्कार दृढ ठेवण्यास कसे कारण झालेत, हे आपण इथे लक्षात घेतले पाहिजे.

पेशवाईचा काळ हा तर शुद्ध जातिवर्ण–अहंकाराच्या आणि अस्पृश्यतेच्या विद्वेषपूर्ण वातावरणाने भरलेला व भारलेला होता, याचा इतिहास ताजाच आहे. अगदी अर्वाचीन काळातील जुन्याचा पुरस्कार करणाऱ्यांमध्ये चिपळूणकर, लो. टिळक, म. गांधी हे थोर पुरुष होत. दुसऱ्या बाजूला–बुद्धाच्यानंतर त्याचा वारसा घेऊन समाज प्रबोधनाची व परिवर्तनाची प्रेरणा देणाऱ्या फुले-आंबेडकरांचा सुरू झालेला युगबदल

कालप्रवाह आपण आज पाहतोच आहोत.

अशा ह्या प्राचीन काळापासून आजतागायत चालत आलेल्या दोन प्रवृत्ती दोन प्रकारच्या सामाजिक बांधिलकीने बद्धपरिकर असून सामाजिकप्रमाणेच आज साहित्याच्या क्षेत्रात विशेषत्वाने कार्यरत आहेत. असे असतानाही साहित्याला सामाजिक बांधिलकीची गरज नाही, समाजजीवनाशी साहित्याचा संबंध असलाच पाहिजे असे नाही, साहित्यातून मानवी विचार/आकांक्षा/मूल्याची प्रस्थापना व जोपासना करणे वगैरे हे ध्येय ललित साहित्याला नसते; साहित्याचे कार्य वाचकांचे मनोरंजन करून त्याला केवलानंद देणे एवढेच असले पाहिजे, असे प्रस्थापितांचे म्हणणे आहे. तेथे कलावाद उभा करून साहित्यकला ही जीवनासाठी वगैरे नसून 'कलेसाठी कला' असते आणि कलावादी साहित्य हेच श्रेष्ठ साहित्य असते, असा त्यांचा दावा आहे. इथे प्रश्न असा आहे की, मनुष्यनिर्मित माणसाची कला (साहित्य) माणसासाठी व त्याच्या जीवनासाठी नसते आणि समाजासाठीही नसते, तर ती असते कोणासाठी व कशासाठी ? कलेचे शेवटी प्रयोजन काय,–उपयोग काय ? कलानिर्मितीमागचा हेतू किंवा तिचे अंतिम उद्दिष्ट काय ? उद्दिष्टविरहित कला कोणाच्या काय कामाची ? पण हे सारे प्रश्न जीवननिष्ठ परिवर्तनवादी साहित्याच्या बाजूचे आहेत. कलावाद्याच्या दृष्टीने त्यांची साहित्यकला त्यांच्या म्हणजे विशिष्टांच्या कामाचीच आहे, असे दिसेल.

साहित्याला निव्वळ अशी 'कला' बनवून शोभेची वस्तू करणारे हे कलावादी 'कलाकार' लेखक लोक खरे म्हणजे कलेच्या आडून परंपरावाद, ग्रंथप्रामाण्य जोपासत आहेत. त्यांना देव, दैववाद, धर्मरुढी आणि ही सारी वर्णजातिवादी समाजव्यवस्था कायम राहावी, असे वाटते आहे/कारण या व्यवस्थेने ठरविलेले त्यांचे वरचे स्थान सुरक्षित राहावे, व्यवस्थेने दिलेला उच्च दर्जा कायम राहावा, असे त्यांना वाटणे त्यांच्या हिताचेच नव्हे काय ?

त्यांच्या हिताचे, पण दलित-पीडित, आदिवासी बहुजनांच्या ते हिताचे नाही, तर घाताचे आहे ! म्हणून/या विषमतावादी समाज-

व्यवस्थेविरुद्ध, समाजात वावरणाऱ्या विघातक, कलुषित प्रवृत्तीविरुद्ध आणि समाजजीवनाला प्रदूषित करीत आलेल्या व सामान्य जनजीवनाला सडविणाऱ्या त्यांच्या रुढि-संकल्पनाविरुद्ध आणि शीरजोर, उन्मत्त झालेल्या वर्ण-अहंकारी, जातीयवादी विषारी मूल्यांविरुद्ध दलित साहित्याने लढा पुकारलेला आहे. त्यातून उठलेला आवाज ऐकून हे बांधिलकीविरुद्ध बोलणारे लोक खरे म्हणजे आतून बिचकलेले आहेत, घाबरलेले आहेत. दलित साहित्यातून बाहेर पडणारी या जीवनातली भेसूर सत्ये पाहून ते भांबावून गेले आहेत. म्हणून त्या सत्यांना पाठ करून उभे राहण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. ते हेतूपुरस्सरपणे साहित्याला समाज व जीवनापासून वेगळे ठेवू पाहत आहेत.

साहित्य हे स्वतंत्र प्रतिभानिर्मित, स्वायत्त वगैरे असले पाहिजे, असे आजचे कलावादी जोर देऊन सांगतात. त्याचे कारण उघड आहे, की, ह्या कलावादी कलाकार लोकांना जसे वाटते तसे व तसेच लिहिण्याचे पूर्ण स्वातंत्र्य हवे आहे. समाजजीवनाप्रमाणेच साहित्यातूनही त्यांना परंपरेने चालत आलेला स्वैराचार व व्यभिचार मांडण्याची पूर्ण मोकळिक पाहिजे आहे. धर्मरूढि–संकेत बेमालूमपणे त्यांना जतन करायचे व पोसायचे आहेत. म्हणूनच ते मानवी मूल्याधिष्ठित जीवनबंधाला आणि सामाजिक बांधिलकीला नाकारीत आहेत.

याचे आपल्याला येथे तसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण साहित्याला जीवनाची समाजाची बांधिलकी नको, असे म्हणणे, हा त्यांचा निव्वळ देखावा आहे. एक मोठे ढोंग आहे. अर्थ स्पष्ट आहे, की एकीकडे समाज-जीवनाचा उपभोग घेत घेत, नाना तऱ्हेने जीवन जगत जगत लेखन करायचे आणि त्याच जीवनाला व सामजसंबंधित्वाला दुसरीकडे नाकारायचे, यासारखी हास्यास्पद गोष्ट दुसरी कोणती असेल ? हे ढोंग नाहीतर काय आहे ?

एकूण ही धारणा समाजप्रबोधनाची नासाडी करणारी अत्यंत गंभीर अशी आजची वस्तुस्थिती आहे, नव्हे ती आजच्या समाज-प्रबोधनाच्या कार्यात एक मोठा अडथळा सिद्ध झाली आहे. ती पूर्वीच्या काळापासून खऱ्या प्रबोधनाला मागे सारीत आली आहे. ते होऊ

दिलेले नाही. ती धारणा समाजप्रबोधनास नव्हे, –दुर्बोधनास पोषक आहे. प्रबोधनाने ती प्रभंजन करणारी म्हणून अनिष्टाचे-विपरितांचे पोषण करणारी दलित-शूद्रादी बहुजनसमाजाचे शोषण करणारी आहे. कारण ती अन्याय्य रूढि-धर्माचेच पोषण करते.

प्रस्थापित मराठी साहित्यामध्ये सुरुवातीला आपण पाहिल्याप्रमाणे दुसराही एक मोठा प्रवाह आहे. तो जीवनवादी आहे आणि सामाजिक बांधिलकीला मानणाराही आहे. पण तो प्रवाह परिवर्तनवादी नसून परंपरानिष्ठ बांधिलकी मानणारा स्थितीप्रिय वाङमय–प्रवाह आहे. सार्त्रने म्हटल्याप्रमाणे– "सामाजिक बांधिलकीचे पण विषमतेचे संवर्धन करणारे साहित्य हे कधीच श्रेष्ठ ठरत नसते." त्याने नव्या समाज-प्रबोधनाची आणि न्याय-समतावादी मानवी मूल्याची भृणहत्त्या होत असते. परिवर्तन तर दूरच राहिले.

एकूण पारंपरिक, प्रस्थापित मराठी वाङमयामधील उघड-गुपित अशा दोन्ही प्रवृत्ती म्हणजे भूत व वर्तमान जीवनाच्या विभत्सिकरणाचे नि व्यभिचाराचे एकप्रकारचे दुटप्पी, मखमली रूप होय. ते रूप आता अधिक काळ टिकावयाचे नाही. त्याला बाजूला टाकणारे आधुनिक विद्रोही वाङमयाचे प्रवाह आता सुरू झालेले आहेत. त्यात दलित साहित्य त्या स्थितीप्रिय प्रस्थापिताचे झाकले पितळ अधिक जोमाने व समर्थपणे उघडे पाडीत आहे.

दलित साहित्याला हे सामर्थ्य लाभले आहे. हे साहित्य साहित्या-बरोबर एक सामाजिक घटना आहे. ते दलितांच्या सांस्कृतिक-सामाजिक चळवळीचे एक महत्त्वाचे शस्त्रसाधन सिद्ध झाले आहे. ते दलितांची चळवळच बनले आहे. या साहित्य चळवळीला एक मूल्यगर्भ विचाराची तत्त्वज्ञानाची बैठक लाभलेली आहे. ती नीती-न्याय-समतेवर, विश्व-मैत्री करूणा, बंधुभावावर उभी आहे. चळवळीमागील या विचारसूत्रासह सामाजिक बांधिलकीची संकल्पना दलित साहित्याने स्वीकारलेली आहे. ही संकल्पना निश्चित काय आहे, हे समजून घेताना बांधिलकीबरोबर सामाजिक जाणिवेचा संबंध काय आहे, हे पाहावे लागेल.

दलित साहित्याच्या सामाजिक बांधिलकीच्या संकल्पनेत

पहिल्यांदा दलित जाणीव अनस्यूत आहे. दलित जाणीव म्हणजे दलित जीवनासंबंधीचा दृष्टिकोण, एक धारणा. या जीवनाच्या मूल्यप्रणाली-विषयीची एक डोळस जाणीव. ही जीवनमूल्य–प्रणाली म्हणजे जीवनाचे महत्त्व सांगणारी आचार–विचारप्रणालीच होय. ही जीवनविषयक आचार–विचारासंबंधीची डोळस जाण, दृष्टिकोण, भूमिका वा धारणा म्हणजे दलित जाणीव होय. या जीवनासंबंधीची ही जाणीव ही दलित समाजाची जाणीव असते. ही जीवनजाणीव एक सामाजिक जाणीवच असते आणि ती समाजजीवनाला बांधील असते. दलित जाणिवेची समाजजीवनाशी निगडित ही जी आंतरिक सोयरिक असते; ती अनुभवांनी सुबंधित असलेली आंतरिक सोयरिक म्हणजे सामाजिक बांधिलकी होय. दुसऱ्या शब्दात, दलित साहित्याने स्वीकारलेली सामाजिक बांधिलकी ही सांस्कृतिक-सामाजिक परिबंधातून प्रकटणारी, सामाजिक जाणिवेला अंगिकारणारी आणि त्या जाणिवेशी काही एका नियंत्रित विचारांनी प्रतिबद्धता ठेवणारी सामाजिक संबंधाची विशिष्ट संकल्पना आहे. बांधिलकीची ही संकल्पना जीर्ण व कालबाह्य आचार-विचारांना गाडू इच्छिते आणि युगपरिवर्तनकारी नवी भूमिका, मूल्यधारणा व नवा दृष्टिकोण यांचा जाणीवपूर्वक स्वीकार करते.

सामाजिक जाणीव आणि बांधिलकी-दोन्ही एका सांस्कृतिक संदर्भाने आणि सामाजिक आशयाने परस्पराशी सबंद्ध असतात. दोन्ही परिवर्तनाच्या प्रक्रियेची सर्जक रुपे आहेत. ती रुपे सामाजिक परिवर्तनाची क्रांतिसंवेद्य 'शक्ती' बनतात. विद्रोह बंडाची सर्जना करतात. परिवर्तन जन्माला येते.

सामाजिक बांधिलकीमध्ये अंतर्भूत असलेली दलित जाणीव दलित लेखकाचा संवेदन-स्वभाव असते.त्याची ती एक मानसिकताच असते त्या मानसिकतेतून प्रस्फुटणारी विद्रोह-बंडाची प्रेरक दलित(सामाजिक)जाणीव ही दलित साहित्यामागची शक्ती असते. ती नेहमी क्रांतिसन्मुखच असते.

अशा कालोचित सामाजिक बांधिलकीला अव्हेरून व सामाजिक जाणीव न ठेवून साहित्य-लेखन कसे शक्य व्हावे ? पण कलावादी लेखकांना ते शक्य झाले आहे, हे खरे. कारण त्यांना समाजजीवनाची

गंभीर बाजूच दिसली नाही. आणि दिसत असली, तरी-साहित्याचे कार्य केवळ आनंद देणे व मनोविनोदन करणे हे निश्चित केल्यावर त्यांना ती गंभीर बाजू मांडण्याचे प्रयोजनच नाही. सुखाचा जीव दुःखात घालील कोण ? इथल्या समाजजीवनाची दुःखवेदना जाणिवेतून जगणे वा भोगणे त्यांचे काम नाही. दलित साहित्याला ही गरज आहे. म्हणूनच ते उगाच रंजनबिंजन करीत बसणारे किंवा वाचकाला नुसता विरंगुळा देणारे वरवरचे साहित्य नव्हे, तर ते सरळ काळजाला जाऊन भिडणारे आणि अंतःकरणाला दरदरा हलविणारे, झोप उडविणारे झणझणीत नि रसरसीत साहित्य आहे. ते कलेचा कलेसाठी व्यर्थ बडेजाव मिरविण्याऐवजी जीवनवास्तवाला सामोरे जाणारे प्रखर सामाजिक जाणिवेचे आणि समाजपरिवर्तनाचे साहित्य होय. अर्थात, या विषमताधिष्ठित, अन्यायकारी समाजरचनेचा जुना नकाशाच बदलून टाकण्याचे त्याचे ध्येयस्वप्न आहे. या व्यवस्थेचा मूळ पायाच उलथून पाडण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट युगपरिवर्तनाच्या, मानवी न्याय व मानवी सभ्यतेच्या मूल्यांनी सुशोभित झाले आहे.

दलित साहित्य हे सामाजिक बांधिलकीचे तर आहेच. पण ते या जीवनाचे जिवंत व ज्वलंत प्रत्यंतर असल्याने अगोदर जीवनाशी बांधील आहे. समाजजीवनाचा आशय हे त्याचे श्रीमंतपण होय.

भारतीय वाङ्मय-सृष्टीमध्ये मानवी न्याय, मानवप्रतिष्ठा व समतावादाची आणि मैत्री-करुणा-प्रेम या मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करणाऱ्या साहित्याची लाट पहिल्यांदा कोणी निर्माण केली असेल, तर ती दलित वाङ्मयानेच होय. तेच पडसाद आज इतरही साहित्य-प्रवाहात उमटत आहेत. अर्थात, प्रस्थापित मराठी साहित्यात आजचा जो जीवनवादी सामाजिक बांधिलकी मानणारा परंतु परंपरानिष्ठ प्रवाह असेल, त्याला परिवर्तनाच्या दिशेने बदलण्याचे दलित साहित्याने आव्हान दिले आहे. ते त्याने स्वीकारणे काळाची गरज आहे. भारतीय समाज-प्रबोधनाच्या व परिवर्तनाच्या वाटा आणि वळणे त्यामुळेच कांही प्रमाणात मोकळी होऊ शकतील.

o o o

दलित जाणिवेचे साहित्य

सुमारे दीडदोन दशकापूर्वी व त्यानंतर आणखी काही वर्षे चाललेला मराठी साहित्यसृष्टीत दलित साहित्याच्या उद्‌गम व नामाभिदानासंबंधीचा घोळ आता संपलेला आहे. दलित साहित्याला मराठीतच नव्हे तर एकूण भारतीय साहित्य-प्रवाहांच्या संदर्भात एक विद्रोही, नव्या जीवनजाणिवेचे क्रांतिकारी साहित्य म्हणून मान्यता मिळालेली आहे. निग्रो साहित्यानंतर भारतीय दलित साहित्यातील हकीकत-जटायू, बलुतं, उपरा आदीच्या रूपाने जगाच्या वाङमयीन वर्तुळातसुद्धा सन्मानाने वर्दी लागावी, यातून या साहित्याचे वैशिष्टयपूर्ण स्थान आणि निराळेपणाचे सामाजिक वाङमयीन मूल्य आणि सामर्थ्य दिसून येते.

तथापि, आपल्या येथील, किंवा आपल्याचमधील काही चांगल्या शिक्षितांची दलित साहित्याकडे पाहण्याची दृष्टी पारंपरिक आहे, तशी

ती अजूनही काही अडाणग्रहांनी दूषीत, मागास राहिली असल्याचेही प्रत्ययास येते. जसे निग्रो काळे म्हणून त्यांचे साहित्य काळे वा कुरूप, ग्रामीण जीवनावरील साहित्य हे ग्रामीण म्हणजे खेडवळ वा अडाणभोळे त्याचप्रमाणे दलितांचं साहित्य म्हणजे 'दलित' आणि दलित साहित्य हे त्याच्याचप्रमाणे ओंगळ, हीन आणि म्हणजे ' व्हेरी पूअर ' असा हास्यास्पद अर्थ साहित्याविषयीची थोडीफार जाणीव असलेला साधा वाचकसुद्धा काढू शकणार नाही. परंतु साहित्याचं 'दलित' हे नाव आपल्याला मान्य नाही. साहित्य दलित म्हणजे 'पूअर' (POOR)आणि पूअर म्हणजे निकृष्ट, हीण असे साहित्य आपल्याला मान्य नाही. असा वाचाळ वाचार्थ घेऊन ज्या ' दलित साहित्य ' या नावाला मराठीतील बहुतेक सर्व साहित्यिक समीक्षक विचारवंतांनी मान्यता दिली आहे, तिला एका झटक्यात नाकारणारा एखादा तथाकथित 'सुसंस्कृत' महाभाग आजसुद्धा भेटतो; त्याची या व एकूणच साहित्याविषयी असलेली काहीतरीच 'गरीब' जाण पाहून आणि त्याची दलित साहित्याविषयीची एकांगी किंबहूना अडाणी धारणा पाहून कोणालाही आश्चर्य वाटेल.

साहित्य हे उत्कृष्ट असावं वगैरे– हे मान्यच. परंतु ते साहित्य ' दलित असू नये (म्हणजे–'पूअर' या शब्दावर त्यांचा जोर) कोणतंही साहित्य 'दलित नसावं हे खरं; पण 'दलित साहित्य' तर मान्यताप्राप्त आहे. 'दलित नकोच. उत्कृष्ट साहित्य आपण मानतो! '... बरं उत्कृष्ट, उत्कृष्ट म्हणजे कसं ? त्याचे मानदंड कोणते ? एखादी दलित साहित्य कृती उत्कृष्ट नसायला काय झालं ? दलितेतर सर्वच प्रस्थापित साहित्य उत्कृष्टच म्हणायचं काय ? पण हे तसे वादाचे भंकस प्रश्न ठरतात.

प्रत्यक्ष दलितांतील अशा काही शिक्षित त्यातही उच्चपदस्व अधिकारी, डॉक्टर, वकील, आबूबाबू, तथाकथित, समाजसेवक, पत्रकार अशापैकी काही लोकांची 'दलित' शब्दाविषयी अशी धारणा, अरुची वा नाराजी असलेली दिसते. या साहित्याचे अंतरंग, स्वरूप आणि त्याची अपरिहार्यता समजून न घेण्यातून असल्याप्रकारचे उथळ गैरसमज, हीनत्वदर्शक दृष्टिकोण आणि ' दलित साहित्य लिहिणे

म्हणजे मांगवाडे, महारवाडे माजविणे, दलित साहित्यिक म्हणवून घेणे म्हणजे जातिभेद पाळणे– म्हणजे जातियवादाला बळ देणे ' अशा पराकोटीची संकुचित आत्मश्लाघ्य दृष्टी अनास्था व अपसमजूत काही दलितेतरांप्रमाणेच आजच्या काही पांढरपेशी वृत्तीच्या दलितांमध्येही आढळून येते. दलित शब्दाचा वाङ्मयीन संदर्भात मूळात प्रेरणापोषक जो अर्थ त्याची महती लक्षात न घेतल्यामुळे ही विकृत ग्रहधारणा. दुसरे आपण आता जातपातरहित अशा मानवतावादी, बुद्धिनिष्ठ बौद्ध संस्कृतीचे पायीक आहोत. दलित महारमांग वगैरे ' हीण ' जातिदर्शक ' दलित ' शब्द लावायचाच कशाला आणि काय म्हणून ? दलित शब्दाने जुनाच नको तो किळसवाणा इतिहास आपण साहित्यातून फिरून जिवंत का करायचा ? यास्तव आपल्या साहित्याला ' दलित ' हे नाव नकोच; असे हे एकंदर म्हणणे.

अस्पृश्यतेच्या संदर्भातील खरोखर तो घृणित इतिहास विसरण्याचा हा प्रयत्न एकदम गैर आहे असे नाही. पण त्याचवेळी वर्तमान समाजवास्तवाला डोळ्याआड करण्याचा किंवा त्या वास्तवापासून पलायनाचाच तो प्रयत्न आहे, हेही तेवढेच खरे. तो प्रयत्न व्यापक सामाजिक जाणिवेला संकुचित व दृष्टीला व्यक्तिसंकुलित करणारा आहे. त्यातून निर्माण होणारी व्यक्ती केंद्रित 'अपन भला तो जग भला'असली स्वार्थभावना वाढीस लागते.वस्तुस्थितीचा तेथे शुद्ध विपर्यास केला जातो.

या ठिकाणी दलित शब्दामागे असलेला तो इतिहासच दलित लेखकाला आपल्या साहित्याची पार्श्वभूमी म्हणून मांडावयाचा आहे. कारण जे दलित होते व आहेत. ती माणसंच होती व आहेत.।माणूस हा मुळात चांडाळ, ढोर, अत्यंज, बहिष्कृत अस्पृश्य असतोच कसा ? तो महार, मांग, चांभार, तेली, माळी, कुणबी, मराठा, ब्राह्मण वगैरे कोणीही असण्यापेक्षा तो अगोदर माणूस असतो.,मग ह्या वर्णजातीच्या उतरंडीमध्ये सर्वात खालचा 'दलिता'चा दर्जा माणसाला दिला आहे तो कोणी ? स्पष्ट आहे की, या माणसानेच माणसाला तो हीन दर्जा दिला आणि या समाजव्यवस्थेने तो कायम केला. त्यात 'कर्मविपाकाची' अलगद कूट यंत्रणा, माणसाला आंधळे करणारे दुष्ट चक्र. दलितांच्या

सामाजिक, धार्मिक व आर्थिक पिळवणूक व शोषणांची ही सगळी प्रक्रिया अव्याहतपणे चालत आलेली. या साऱ्या माणूसघानी यंत्रणेविरुद्ध दलिताला दलित–मुक्तीसाठी लढा द्यायचा तो– 'दलित' संज्ञेमागचा हा सारा मूळ इतिहास विसरून देता येईल ? त्या इतिहासानेच तर संघर्ष लढ्याच्या बारीक वाटा नि खाचखळगे आणि चाल करण्याच्या दिशा दलिताला दाखविल्या आहेत. मागचा बरावाईट अनुभवच पुढची गती डोळस करीत असतो. एकूण म्हणजे व्यवस्थेविरुद्धचा दलित–संघर्ष इथे या भक्कम पार्श्वभूमीवर सुरू होतो आणि पुढे पुढे तो प्रकर्ष पावत जातो. लढ्याचे स्वरूपही कालपरिस्थितीनुरूप बदलत जाते. लढ्याचे केन्द्र स्पष्ट होत जाते.

इथे प्रश्न असा आहे की, दलितातील काही वर पोचलेल्या लोकांना ती समाजव्यवस्था (इथे रुढीग्रस्त मनोवृत्ती) आज बदललेली आहे, असे वाटते का ? तिचे जुने स्वरूप कालानुरूप नव्या धोरणात परिवर्तीत झालेले दिसते. पण व्यवस्थेचे ते रूप आजच्या दलित जीवनाच्या संदर्भात कमी क्रूर, कमी शोषक, कमी दुःखदायक, कमी भयंकर दिसते आहे काय ? ती रुढीग्रस्त, स्थितीप्रिय वर्चस्ववादी वृत्ती बदलली तर नाहीच, उलट ती आज जातिवर्ण–अहंकाराने पेटलेली व देशभर अधिकच फोफावत गेलेली दिसते, याचे कारण काय ?

याचे कारण–आता दलित समाज बदलला व बदलत आहे. हे आहे. त्याने पूर्वापार चालत आलेले दास्यबंध झुगारले. लाचारीचे जीणे सोडले. हे त्याचे कारण आहे. जुन्या जीर्ण संकल्पनांना व माणसाचे ताडन करणाऱ्या अशुभ, कुरूप मानदंडांना सगळ्या मानवताविरोधी विचारतत्त्वाला आणि कालबाह्य रूढी-संकेतांना व अंधश्रद्धांना कायमची मूठमाती देऊ इच्छिणारे क्रांतीपरिवर्तनाचे बळ दलित माणसात आले कुठून ? पारंपरिक मनोवृत्तीच्या व व्यवस्थेच्या नजरेतील तो घृणित, तिरस्कृत, हीनदीन, दुबळा, लाचार नि गुलाम दलित आज राहिला नसून आज तो विद्रोहाने पेटून प्रतिकार करणारा, क्रांती–लढा देणारा, हक्कासाठी झुंजणारा लढाऊ सामर्थ्यवान व तेजस्वी माणूस बनला आहे. तो असा बनला कसा ?

तो एकदम तसा बनला नाही, तर बुद्धाच्या काळापासूनच त्याच्यात ही बदलण्याची प्रक्रिया हळूहळू सुरू झाली होती. म. बुद्धाच्यानंतर फुले, आंबेडकरांच्या सामाजिक प्रबोधनाच्या व परिवर्तनाच्या क्रांतिकारी कार्याने आज दलित माणूस असा बदलला नि बदलत आहे. आधुनिक काळाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित जीवनात एकप्रकारे क्रांतीच घडवून आणली हे खरे आहे. त्यांनी या माणसात स्वत्व, स्वाभिमान व आत्मप्रतिष्ठेचे भाव निर्माण केले. त्याला त्याच्या दु:खाची व दु:खाच्या कारणाची जाणीव करून दिली. त्याला माणुसकीची दिक्षा देऊन अमानुषकीविरूद्ध, अन्याय–अत्याचार व शोषणाविरूद्ध आणि सगळ्या विषमतेविरूद्ध लढण्याचे आधुनिक अस्त्रशस्त्र आणि नव्या ज्ञान–विज्ञानाचे तेजस्वी डोळे बहाल केले. बाबासाहेबांनी काळोखमय दलित जीवनाला अस्मितेचा प्रकाश दिला. त्यांनी दलिताला समर्थ व तेजस्वी बनविले. माणूस घडविला. त्यांच्या हाती संघर्ष प्रवृत्त करणारे आपले क्रान्तिप्रवण विचार, एक मानवतावादी लढाऊ तत्त्वज्ञान, भाषा आणि लेखणी दिली. सामाजिकता जीवन-जाणिवेची आत्मप्रत्ययकारिता आणि हृदयाविष्काराची तेजस्वीता आंबेडकरी प्रेरणेतूनच दलिताला लाभली. त्याच प्रेरणेचे साहित्य आजचे दलित साहित्य होय.

याप्रकारे पूर्वीच्या विद्या-धन-सत्ताहीन अशा दलित माणसाची वाटचाल सुरू झाली. इतिहासक्रमाने राजकीय क्षेत्रातील सत्ताप्रवेशापासून सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात हळूहळू वाढत गेलेल्या समाजसेवक, पुढारी, कार्यकर्ते आणि कलावंत साहित्यिक, समीक्षक, विचारवंतांपर्यंत ही वाटचाल समृद्ध होत आली आहे. त्याच इतिहासक्रमावरून असे म्हणता येते, की दलित माणूस असला तरी माणूस दलित राहत नसतो. 'दलित' शब्द माणसाचे शिक्कामोर्तब झालेले नाव किंवा जात दर्शवीत नाही. तर ' दलित ' ही उत्क्रांन्त होत आलेली माणसाची आणि एका मानवसमाजाची अवस्था आहे. दलित ही कोणी एक जात नसून सामाजिक जाणीव आहे. आणि ती दलित जाणीवही आहे. त्यातील दलित जाणीव दलित-मुक्तीच्या संघर्षाचा आजचा

मानवी हुंकार आहे. तो हुंकार 'आवाज' आजच्या एकूण दलित चळवळीची शक्ती ठरलेली आहे. या समाजमनाचे ती स्फुरण, त्यांच्या सामाजिक आंदोलनाचे प्रकटन, तीच या समाजजागृतीची उर्मी आणि दलित जीवनातल्या क्रांतीची नांदी देणारी मूल्यगर्भ चेतनाशक्ती बनलेली आहे.

तेव्हा माणसाला लढाऊपणाचे तेज, विद्रोहाची ताकद, माणुसकीने व जीवन सुंदरपणे जगण्याची इच्छा, प्रेरणा देणारा, क्रांतीचे स्फुरण ठरलेला 'दलित' शब्द वाचार्थाने प्रतीत होणारा नुसता निष्फळ शब्द नसून त्याला शेकडो वर्षांचा जिताजिवंत असा इतिहास आहे. त्या शब्दामागे संपूर्ण एक सामाजिक जीवन उभे आहे. त्याला त्या जीवनाच्या उत्क्रांतीचा मूल्यगर्भ व गर्द संदर्भ आहे. परिवर्तनाच्या प्रेरणाशक्तीचा पेटता गंध माखलेला आहे. 'शब्दांनीच पेटतात घरे, दारे, देश आणि माणसेसुद्धा आणि विझवतात आगही' शब्दात अशी शक्ती असते. दलित शब्दात त्या शक्तीचा वेगळा मूलस्त्रोतच भरलेला आहे.

अब्राहम लिंकनपासून डॉ. आंबेडकरांसारख्या बंडखोर क्रांतिवाद्यांनी हेच सांगितले आहे की,– 'टेल द् स्लेव द्याट ही इज अ स्लेव' दुसऱ्या शब्दात, गुलामाला आपण गुलाम आहो, याची जीवघेणी जाणीव झाल्याशिवाय तो जीवाच्या सर्व शक्तीनिशी प्रतिकाराला सज्ज होत नसतो. वर्षानुवर्षाच्या कडू–गडद अनुभवाने दलित अस्पृश्याला आपण अजून दलित व अस्पृश्य आहोत, अशी आजच्या दलितालाही जाणीव झाली आहे. त्यामुळे व्यवस्थेने दिलेल्या दलित-दास्यत्वाच्या अस्पृश्यतेच्या दु:खाची त्याला आता तीव्र जाणीव झालेली आहे. त्याला त्या दु:खाचे कारण कळलेले आहे. म्हणून तो आपले शोषण करणाऱ्या, छळणाऱ्या, वाटचाला माणूसकीहीन लाचारीचे, परावलंबन दास्यत्वाचे जीणे जगणे भाग पडणाऱ्या वर्ण–जातिव्यवस्थेवर व तिच्या जुलमी, शोषक मनोवृत्तीवर तो आता तुटून पडला आहे. आपल्या चळवळीतून साहित्यातून सारखे प्रहार करू लागला आहे. विद्रोहाने पेटून तो–

'इट् मे बी युवर इन्टरेस्ट टु बी अवर मास्टर्स
बट् हाऊ इट् क्यान बी अवर्स टु बी युवर स्लेव्ज्?' (थुईसाईड्स)

असे व्यवस्थेला आव्हान देऊ लागला आहे.

दलितात व त्याच्या लेखणीत आजही शक्ती निर्माण झाली आहे. त्याला झालेली दलित-दुःखाची डोळस जाणीव हीच त्याच्या साहित्याची प्रबळ अंतःप्रेरणा आहे. 'दलित' शब्दामध्ये एवढी मोठी ताकद आहे. अर्थात् तो शब्द निष्क्रीय वा वांझ नसून शतकाशतकांच्या कढत अश्रूंचे मोल घेऊन आलेला तो शब्द सृजनाचे, सर्जनशीलतेचे, कृतिप्रवणतेचे स्फूरणदायी प्रतीक ठरले आहे. या सर्व दृष्टीतून 'दलित' नावाच्या वेगळ्या साहित्याची समाजाला गरज आहे. एक वेगळी पॉवरफूल 'आयडेन्टिटी' हे साहित्य राखते. अर्थात, दलित साहित्य अपरिहार्यपणे या समाजाच्या 'दलित' चळवळीचे एक जोरदार नि धारदार शस्त्रसाधन बनले आहे.

थोडक्यात, दलित हे नाव दलित जाणीव जागृत असल्याचे द्योतक आहे. ती जाणीव एका सामाजिक अवस्थेचे सतत भान कायम राखते. जिवंत दलित जाणिवेसह दलिताच्या सांस्कृतिक सामाजिक व साहित्याची चळवळ लढाऊ व तेजस्वी होणार नाही. आणि स्वयंतेजाशिवाय तिला गतिमान होता येणार नाही.

दलित जीवनानेच दलित साहित्याचे अंतरंग–स्वरूप अनुभवसमृद्ध आशयविशाल आणि वेदनासुंदर केले आहे. 'रक्तलांच्छित वेदनांचा भाक्रोश पाठीस घेऊन' वाटचाल करणाऱ्या या जीवनाचे निराळेपण हेच दलित वाङमयाचे प्रस्थापित पांढरपेशी साहित्याहून वेगळे वैशिष्ट्य आहे. एक वेगळे जीवनमूल्य दर्शन आहे. दलित साहित्याने देव–दैव, धर्मरूढीच्या संचिताबरोबरच प्रस्थापित वाङमयपरंपरेच्या कालबाह्य कलासंकेताचा त्याग केलेला आहे.

दुसरे, या साहित्याला संपूर्ण विरोध–विकासाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. ते बुद्धाच्या विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी नि विशुद्ध मानवी तत्त्वज्ञानावर अधिष्ठित आहे. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी, परिवर्तननिष्ठ व विज्ञानवादी क्रांतिकारी विचारांची दलित साहित्याला बलवान अशी प्रेरणा लाभली आहे. इतर कोणत्याही साहित्यप्रवाहापेक्षा या साहित्याच्या अशा वेगळ्या मूलात्म प्रेरणा आहेत.

कोणतेही साहित्य हे व्यक्तीच्या वैचारिक व भावनिक मनोधर्माची प्रत्ययानुभूति असते. दलित लेखकाच्या अनुभूती–जाणिवा ह्या मुळातच निराळ्या असलेल्या त्याच्या जीवनप्रवाहाबरोबर गतिमान होत, आधुनिक युगमूल्यांशी संवाद साधीत शेवटी विश्वात्मकतेकडे प्रवास करतात. त्याचे कारण आजचे विश्वसाहित्याचे व समाजप्रवाहाचे युग हे एकाच विद्रोहमूल क्रांतीपरिवर्तनाच्या लाटेवर आरूढ झालेले दिसते. दलित जाणिवेचे हे साहित्य विद्रोहांकित चेतना घेऊन आजची ही विश्वात्मक मूल्यधारा जपत आहे.

सामाजिक अन्याय, विषमता व अमानवीयता यांचे अवरोधन आणि न्याय, समता, मानवतेचे प्रस्थापन व रक्षण करण्याची प्रेरणा देणाऱ्या दलित साहित्यांचे महत्त्व परंपरेच्या संकुचित, आंधळ्या डोळ्याने आकलणार नाही. दलित साहित्याचा खराखुरा आस्वाद घेण्यासाठी रसिक व डोळस दृष्टीची गरज आहे.

o o o

दलित साहित्य हे आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य

दलित साहित्याविषयी जे हेतूःपुरस्सर किंवा एखाद्या अनाकलनातून ग्रहदूषित दृष्टी व धारणा बाळगतात, त्यांची वेळोवेळी विचारवंताकडून समज काढण्यात आलेली आहे. अशांना दलित साहित्यात तसा 'इन्टरेस्ट' नसतो. त्यांना खरे तर या साहित्याचे स्वरूप अंतरंग आणि अपरिहार्यताच कळलेली नसते. काहींनी मुळात ते वाचलेलेच नसते. पण कुठला तरी तथाकथित 'शुद्ध' आंबेडकरी सूर आळवून ते दलित साहित्यावर आक्षेप घेण्याचा अधिकार मात्र हटकून बजावतात. काही आपला पांढरपेशी रोष व्यक्त करतात. त्यामध्ये डॉक्टर, बाबू, वकील, साहेब, आदी काही उच्च पदस्थांप्रमाणे दलितांतील काही लेखकसुद्धा आढळतात.

त्यांना वाटते की, आपल्या समाजाचे ओंगळ दिनवाणे व गलिच्छ रूप जगासमोर येऊ नये, त्यात आपली मानहानी व बदनामी आहे.

आपण फक्त आपल्या परिवर्तीत (बौद्ध) जीवनाचे उजेडी अंग तेवढे दाखवावे आणि त्याच्याआड येणाऱ्या रुढी परंपरेशी विद्रोह, निषेध व नकार जोरदारपणे व्यक्त करून दलितातील स्वाभिमानाचा बंडखोर प्रवृत्तीचा तडाखेदार क्रांतीकारी अविष्कारच घडविला पाहिजे. (हे पहिल्यांदा खरेच आहे.) पण दलित साहित्य उपेक्षितांची व्यक्तिरेखा ' व्यभिचारी स्वाभिमानशून्य ' ? अशी साहित्यात रेखाटतात. त्यांच्या लाचारीचे, विकृतीचेच चित्रण ते मांडतात. आपल्या सुना-लेकींवर किंवा बायको-बहिणींवर होणाऱ्या बलात्काराचे छळणूक-विटंबनेचे, दारिद्र्याचे झोपडपट्टीचे, वेश्येचे जीवन, हमालीचे, गुलामगिरीचे म्हणजे आपल्या पराभवाचे लाचारीचेच जीवन ते निर्लज्जपणे रेखाटतात. अशी घरातली इज्जत चव्हाट्यावर मांडण्यात कोणता शहाणपणा आहे ? म्हणून हे आंबेडकरी साहित्य नाही. असे हे एकंदरीत म्हणणे. निव्वळच ' ब्लॅक ॲण्ड व्हाईट 'अशा स्वरूपाचे. अर्धसत्य म्हणून हे म्हणणे अभिनिवेशमुक्त नाही. हे सारे आंधळ्या समजुतीचे भ्रममूल्य द्योतकच आहे.

मूळ मुद्दा असा आहे की, दलितातील अशा काही आक्षेपकारांना दलित साहित्य काय आहे, त्याचे अंतरंग स्वरूप, त्याचा हेतू, त्यातील सामाजिक जाणिवा, आशय संपन्नता, त्याच्या ध्येयरचनाची व्यापकता आणि त्यामागचा उज्वल आशावाद, यांचे मूळ आकलनच जिथे झालेले दिसत नाही, तिथे ' दलित ' या साहित्याचे प्रस्थापितापेक्षा निराळे असे विशेष स्वरूप व प्रयोजन का–कसे, ते असे वा तसे जसे अभिव्यक्त व्हायला पाहिजे तसे खरेखुरे का मांडले जावे याची अभिव्यक्तीमूल पुरेशी जाणीव त्यांनी करून घेतली आहे, तसे दिसत नाही.

या आक्षेपकांचा झालेला ग्रह व दलित साहित्याकडे बघण्याचा त्यांचा तथाकथित ' स्वाभिमानाचा ' दृष्टिकोन लक्षात घेऊन पुढील स्वरूपाचे काही निष्कर्षमूल विचार इथे देता येतील.

अ) पहिल्यांदा इथल्या धर्मरुढी परंपरेला दलित साहित्याचा विरोध (विद्रोह), निषेध व नकार असणे स्वाभाविक तर आहेच, पण आवश्यकही आहे. आवश्यक का तर या संस्कृती परंपरेने दलित जीवनाला ' दलित करुन ठेवले आहे म्हणून. कोणीही माणूस मूळात

' दलित ' नसतो. या समाजव्यवस्थेने दलित दर्जा दिलेला आहे. तेव्हा माणसाच्या जीवनावर लादलेले हे दलितपण, दीनता, दारिद्र, दुबळेपण लाचारपण, त्याची असहाय्यता आणि अस्पर्शता ह्या गोष्टी साहित्यातून व्यक्त करणे, हा या माणसाच्या जीवनाचा किंवा समाजाचा कमीपणा, अपमान अथवा बदनामीचा प्रकार नसून उलट त्याचे जीवन दुःखी, कष्टी व निकृष्ट करुन ठेवणाऱ्या आणि माणुसकीचेच मूल्य पायदळी तुडविणाऱ्या या बदनाम धर्मसंस्कृतीचे या समाजव्यवस्थेचेच ते लांच्छन ठरत नाही काय ? म्हणूनच द. साहित्याला दलिताचे जीवनवास्तव लपवून ठेवण्याची गरज नाही. येथे आपला स्वाभिमान दुखावला जाण्याचे कारण नाही, तर या धर्मरुढीग्रस्त षंढ प्रवृत्तीचा निर्लज्जपणाच दलित साहित्यातून व्यक्त केला जातो.

आ) पण असे आहे, तर आपल्या साहित्याला मग दलित हे हीनत्वदर्शक नाव कशाला? हा सकृतदर्शनी रास्त प्रश्न वाटतो. दलित साहित्यच कशाला आपल्या वेगवेगळ्या संस्था, मंडळं, संघटना चळवळी ' दलित ' या नावाचे ओळखल्या जातात असे कां ?

याचे कारण सर्वसाधारणपणे समजले जाते, त्याप्रमाणेच दलित ही संज्ञा कोणी ' जात ' नसून ती समाजव्यवस्थानिर्मित एक विशिष्ट अवस्था आहे. ती आजवर उत्क्रान्त होत आलेली, म्हणून क्रांतीदर्शी अवस्था आहे. या अवस्थेचे ' दलित ' हे नाव भान देते. दलित अवस्थेबद्दलची डोळस समज म्हणजेच दलित जाणीव ही आपल्या लढ्यामागची सामाजिक जाणीव एक प्रेरणा म्हणून दलित नाव हे दलित जाणीव जागृत असल्याचे द्योतक ठरते. जिवंत दलित जाणिवेशिवाय दलित चळवळ लढावू व तेजस्वी होणार नाही. स्वयंतेजाशिवाय तिला गतिमान होता येणार नाही. येथे दलित समजला गेलेला माणूसही कसा बंडखोर व तेजस्वी आहे, कसा बुद्धिवादी माणूस आहे, हे आपल्याला 'दलित' या नावानेच दाखवून द्यायचे आहे.

डॉ. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो जिवाच्या सर्वशक्तीनिशी गुलामगिरीविरूद्ध उफाळून उठेल' त्याचप्रमाणे दलिताला अस्पृश्यचेच्या,

दलितपणाच्या दुःखाची जाणीव होताच तो आज अन्याय व दुरावस्था लादणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध सर्व पातळ्यावरून संघर्ष करतो आहे. हा संघर्ष परिवर्तनाच्या विद्रोहाच्या मूलभूत जाणिवेसह दलित साहित्यांतून प्रकटतो आहे. म्हणूनच या साहित्य चळवळीची 'दलित' या नावासह आज गरज आहे. हे इथे आपण लक्षात घेतले पाहिजे.

इ) या विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेला व भेदभावमूल धर्मसंस्कृतीला नकार हा दलिताच्या दलितत्वालाच नकार असतो. दलितपण माणसाला नकोच असते. ते असहय झाल्यामुळेच दलिताने केलेली व्यवस्थेच्या मोडतोडीची, समाजपरिवर्तनाची मागणीच दलित साहित्य समाजापुढे मांडीत नाही काय ? दलित जीवन त्याच्या मूळ रूपात जसे आहे तसे जगापुढे ठेवून, दलित दुःखाला वाचा फोडून, ते दुःख देणाऱ्या धर्मसंस्कृतीविरूद्ध असलेला द. साहित्यातील नकार व विद्रोह म्हणूनच येथे एक अत्यंत लढाऊ ताकद, एक वादळी शक्ती ठरतो. त्यामुळेच दलित साहित्याला त्याच्या पृथगात्म पातळीवर एक वेगळी आशय मूल्य-गर्भता, अर्थसंपन्नता आणि वाङमयीन अन्वयार्थाचे श्रेष्ठ मानवीमूल्य प्राप्त झालेले दिसते.

ई) दलित साहित्याचे स्वरुप प्रथम असे विद्रोही असणे अपरिहार्य आहे. पण नंतरही ते केवळ विद्रोही व नकारात्मच असावे काय ? दलित साहित्य म्हणजे, जर दलित जीवनाचे संपूर्ण दर्शन असले, तर नुसत्या विद्रोह–बंडप्रवृत्तीच्या पराक्रम उद्घोषातून किंवा फक्त विद्रोह नकाराद्वारेच या जीवनाचे पूर्ण स्वरूप कसे उलगडता येईल? जीवनाची काळी व उजेडी बाजू, ती काळी कशी, उजेडी कशी, याची कारण मीमांसा आपण लक्षात घेतली तर दलित साहित्याचे निव्वळ 'ब्लॅक अँड व्हाईट' असे एकांगी स्वरुप राहणार नाही आणि तसे ठेवणेयोग्यही नाही. साहित्य मर्यादांच्या कुंपणात अडकून पडेल. म्हणून त्याला भावस्पर्शी व्यापकतेचे परिमान आणि विधायकतेचे मूल्यही आपल्याला प्राप्त करून द्यावे लागेल. त्यातून दलित दृष्टी मात्र हरवता कामा नये. ही विश्व व्यापकतेची व विधायकतेची मूल्यगर्भ बैठक दलित साहित्याला बौद्ध तत्त्वज्ञानाने प्राप्त करून दिलेली आहेच. दलितदृष्टी ही आजची

क्रांतिकारी विज्ञानदृष्टी आहे.

उ) दलित दृष्टिकोणातून 'दलित-दर्शन' म्हणजे दलित जीवनाची अभिव्यक्ती अनुभवांचे कृत्रिम उदात्तीकरण न करता प्रामाणिकपणे व्हायला हवी. आपल्या जीवन-वास्तवातील सत्य व त्याची प्रामाणिक अभिव्यक्ती हीच विद्रोहाची मूळ शक्ती आहे. दलित जीवनाच्या सच्चा रुपदर्शनाच्या पार्श्वभूमीवरच साहित्यातीलक्रांतिमूल विद्रोह वीरोचित व सुंदर ठरतो. कारण तो असुंदर, अनुचित व अपायकारक मूल्यांविरुद्ध अन्यायाविरुद्ध असतो. हे दुःखमय, लाचार, अपमानित जीवन सन्मानित व्हावे, स्वतंत्र, सुंदर व प्रतिष्ठित व्हावे यासाठीच तो असतो. म्हणून हा विद्रोह विध्वंसक ठरत नसून विधायकतेच्य परिमाणाने प्रमाणित व अंतःकरणाने जीवनाला सुशोभित करणारा असतो.

ऊ) परंतु दलित साहित्यातील नकार-विद्रोहाचे एकांगी आकलन करून जीवन साक्षीभूत न ठेवताच निव्वळ परिवर्तनाची आणि क्रांतीची वेळोवेळी आवेशपूर्ण भाषा वापरल्याने या साहित्यात अभिनिवेश शिरण्याचा संभव असतो. किंबहुना पुढे तोच शिल्लक राहतो. शब्द गुळगुळीत होतात. त्याची अर्थमूल्यवत्ता टिकून राहत नाही. निव्वळ अभिनिवेशाने आलेले निषेध-नकार आणि विद्रोह किंवा 'क्रांती', 'परिवर्तन' हे शब्द मूळ संदर्भ हरवून बसतात. ते खऱ्या अर्थाने क्रांतीचे परिवर्तनाचे अर्थवाहक राहत नाहीत. हे आपण लक्षात घ्यायला हवे.

सारांश, जीवनाचे मूळ भान विसरून किंवा मूळ संदर्भ हरवून नकार, विद्रोह व तज्जन्य संताप, चीड, आवेश यांचा अविवेकी उठाव सामाजिक चळवळीच्या तसे साहित्याच्याही अंतर्विकासाला मारक ठरतो. दलित साहित्यातील क्रांती विद्रोहाची जाणीव जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करणारी म्हणजे व्यापक असेल, तरच ती या साहित्याला विशालता व प्रगल्भता प्राप्त करून देईल. असा सर्वस्पशी सृजनात्मक विद्रोहच सर्वंकष क्रांतीची शक्ती ठरले.

समाज जीवनाबद्दलच्या सर्वस्पर्शी तत्त्वज्ञानातून उदय पावलेल्या व्यापक, वेधक नि स्वयंतेजस्वी दृष्टीतच बंडे झेलण्याची ताकद असते. ती ताकद हाताबाहेर गेली तर नंतरच्या लढ्याआंदोलनात उरणारी

तथाकथित क्रांतिमूल जाणीव एकतर आपोआप शिथील होते, नाहीतर मारली तरी जाते किंवा भ्रष्ट केली जाते. हे आपण पक्के लक्षात ठेवले पाहिजे. तथापि, ही स्वयंतेजस्वी व्यापक दृष्टी दलित साहित्याला बंडखोर आंबेडकरी विचाराने मात्र दिलेली आहे. त्याला लाभलेली विद्रोह विज्ञाननिष्ठ, विश्वात्मक मूल्यांची लढाऊ बैठक ही आंबेडकर प्रणीत बुद्ध तत्वज्ञानातून आलेली आहे. तेव्हा दलित साहित्य हे वेगळे नसून या समाजापुढील उद्याच्या बौद्ध साहित्याचेच आजचे एक क्रांतिरूप आहे. ते संपुर्णतः आंबेडकरी प्रेरणेचे वाङमय आहे, हे पुन्हा इथे वेगळे सांगायला नको.

पण नेमके आंबेडकरी प्रेरणेच्या आकलनात काही दलित विचारवंत (?) कुठेतरी गल्लत करतात. मूळ दलित साहित्यालाच कोण्या उपऱ्या समांतर प्रवाहामध्ये बसवून त्याला जाती वर्ण वा वर्ग-वादी म्हणणे केवळ अज्ञानमूलक आहे. यातून ते दलित साहित्याबद्दल अनाठायी विषर्यास व विभ्रम तिर्माण करतात. विकृत एकांगी विपर्यासपुढे विभाजनाला कारण होत असतो. त्यांच्यामधील हा एकप्रकारचा वैचारिक गोंधळ, साहित्याबद्दलचे अज्ञान व अपसमज दूर व्हावेत म्हणून दृष्टी डोळसपणे त्यांनी या साहित्याला त्याच्या अंतरंग स्वरूपाला समजून घेण्याची पहिल्यादा गरज आहे. संपूर्ण आंबेडकरी विचाराचेही (साहित्य व तत्त्वज्ञानाचे) पुन्हा आकलन करुन घेणे हवेच आहे.

शेवटी या समाजातील भेदभाव व मूलक धर्मरुढीवाद, अंधश्रद्धा, वर्ण जातियवाद व तद्नुषंगिक शोषण, पिळवणूक, अन्याय, विषमता व या सर्वाविरुद्ध लढ्याची–संघर्षाची क्रांतिमूल प्रेरणा देणारे द. साहित्य हे आजच्या दलित चळवळीचे एक महत्त्वाचे प्रभावी साधन सिद्ध झाले आहे. दलित साहित्य हे पहिल्यांदा दलित समाजाचे, दलित समाजासाठी दलितांनी लिहिलेले साहित्य आहे. (पण किती कोण वाचतो ? व्यथा आमच्या व कथाही आमच्याच असताना ?) दलित साहित्य हे दलित चळवळीचे एक प्रभावी साधन आणि प्रेरक सामर्थ्य म्हणून जेव्हा हे साहित्यच चळवळ होते, तेव्हा या साहित्याचा सामाजिक चळवळीच्या संदर्भातील मूल्याविचार फिरून आपणास इथे समजून घ्यावा लागेल.

o o o



दलित साहित्यातील विद्रोह संपला आहे काय ?

दलित साहित्यातील विद्रोह संपला आहे, असे जे म्हणतात त्यांना आजचा हा विषय म्हणजे एक उलट सवालच आहे. दलित साहित्यातील विद्रोह संपलेला नाही.संपणार नाही.दलित साहित्य संपण्यासाठी जन्माला आलेले नाही. कारण त्याच्या प्रवास–प्रेरणा भक्कम नि वैश्विक आहेत.

गती–संक्रमण आणि परिवर्तनाची प्रक्रिया समाजमानसात भिनवत भिनवत द. साहित्याचा प्रवास चाललेला आहे. तो मुळातच परिवर्तनाच्या पूर्वेकडे उगवला. प्रचंड लाटेची सळसळ घेऊन गतिमान झाला. मधल्या अवस्थेत तो कुठेतरी अंतर्मुखही झाला. कोणत्याही चळवळीला त्यात साहित्याला अंतर्मुख होणे आवश्यक असते. अज्ञानता हातून घडलेले काही प्रमाद टाळण्याच्या दृष्टीने, जुने संचय निवळण्याच्या दृष्टिने आणि पुढील प्रवासाच्या नव्या वाटा शोधण्यासाठी म्हणून ही अंतर्मुखता अपरिहार्य असते. ती एकप्रकारची संक्रमणावस्था

असते, संक्रमणावस्था ही काय आहे ?

तर ही एकप्रकारची ढगाळी अवस्था असते. ढग येतात, बरसतात निघून जातात. कधी ते मुसळधार पाऊस पाडतात. आणि जमीनीवरील घाण धुवून जातात. संक्रमणावस्था ही संधीप्रकाशासारखी असते. अंधार उजेडाच्या मधली अवस्था– अंतर्मुख करणारी– विचार करावयास लावणारी, याचा अर्थ दलित साहित्य थांबले, त्यातील विद्रोह संपला– असा होत नाही; तर तो अधिक भक्कम तेजस्वी व सामर्थ्यवान होत आहे. हा त्यामागे असलेला खरा अर्थसंकेत आहे, त्याचे कारणच मुळी या साहित्याच्या– मानव्यनिष्ठा, बुद्धिप्रामान्य, विज्ञाननिष्ठा ह्या मूलधारणा आहेत. आणि विद्रोह ही तर दलित साहित्याची प्राणधाराच आहे. मुख्य गाभा आहे. तेव्हा विद्रोह संपणे म्हणजे दलित साहित्यच संपणे, हे म्हणणे बीनबुडाचे आणि अज्ञान-मूलच म्हटले पाहिजे. विद्रोह हा युगपरिवर्तनाचा एक तेजस्वी नि बंडखोर 'विचार' आहे. विचार हा कधीच मरत नसतो. अर्थात द. साहित्य संपण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

हे खरे आहे की दलित साहित्यामधील प्रारंभीचा विद्रोह जरा अधिक बोलका होता. आणि अभिनिवेशी स्वरूपाचा होता. प्रारंभास अभिनिवेश असतोच. असायलाही हवा होता. लढाईच्या सुरूवातीला अभिनिवेश हवाच असतो. कारण तो एक आवश्यक वातावरणनिर्मिती करतो. अभिनिवेश हे एक प्रारंभ स्फूरण असते. एक प्रचेतन असते. तो लढाईची नांदीच. पण म्हणून अभिनिवेशातला आवाज अंतिम विजय मिळेतोवर टिकून राहत नाही. कारण तो बहुधा भावनांवर उभा असतो. विकार–भावनांना, कल्पनांना साहित्यात मोठे महत्त्व, मूल्य असतेच. पण केवळ भावनांचे वादळ व्यापकरूप कधीच धारण करीत नाही. साहित्यकृतीला चिरंतनत्त्व प्राप्त करून देत नाही.

दलित साहित्याला असे केवळ भावनांचे वादळ उठवायचे नाहीये तर समाजप्रबोधन व परिवर्तनाचे पाठबळ व्हायचे आहे. ह्या लख्ख बुद्धिवादाचे आणि प्रखर मानवतावादाचे डोळे डॉ. बाबासाहेबांमुळे दलित साहित्याला लाभलेत. दलित साहित्यामागील या डोळस

जाणिवेचे मूल्य वाहन करणारा विद्रोह म्हणजे या साहित्याचं एक व्यापक नि्. तेजस्वी रूप आहे. एक लढाऊ शस्त्रधारा आहे. आणि एक स्थायी व तेजस्वी असे समाज व साहित्यमूल्यच आहे. जीवनमूल्य आहे. विद्रोह हा नुसता भावनात्मक व तात्कालिक स्वरूपाचा नसावा, नसतोच. दलित साहित्यातील विद्रोह विश्वात्मक व विज्ञाननिष्ठ असे स्थायी मूल्य आहे.

हा विद्रोह द्रोहाविरुद्ध आहे. या धर्म-संस्कृतीने आणि वर्ण-जाती-व्यवस्थेने या देशात एवढा भयंकर मानवद्रोह, समाजद्रोह केला आहे, की त्या द्रोहाविरुद्ध आजवर दलित साहित्यातून उफाळलेला विद्रोह अपुराच पडावा. तथापि, दलित विद्रोहाने काही प्रस्थापितांची,सनातनी प्रवृत्तीची झोप उडविली आहे. हे खरे आहे. परंतु इथे झोपमोडीचाही अर्थ आपण पुन्हा नीट समजून घेतला पाहिजे. समाजात चांगली आणि वाईट, सुष्ट व दुष्ट अशा दोन प्रवृत्ती वावरत असतात. त्या जेव्हा जाग्या होतात, तेव्हा त्यांची चांगली किंवा वाईटाची जाणीव तीव्र होत जाते. इथे समता–न्यायाचे माणुसकीचे जलचर गिळून सुस्त पडलेली धर्मरूढिग्रस्त मगर–प्रवृत्ती जेव्हा जागी होते, तेव्हा दलित, विद्रोहाला अधिच्याहून अधिक सजग, अधिक सावध व सतर्क व्हावे लागते. एका विधायक पातळीवर व्यापक व सामर्थ्यवान बनावे लागते. अशाच प्रकारे येथील जाग आलेल्या प्रतिक्रांती–प्रतिक्रियावादी प्रवृत्तीने दलित समाजापुढे व साहित्यापुढे जेव्हा काही भेसूर नि् बदसूर आव्हाने उभी केलीत, तेव्हा दलित–विद्रोहाने ' वार ' करून तिला सरळ परिवर्तनाच्या शार्प चाकावर आणून आडवे केले. साहजिकच तिने चिडणे आणि अपप्रचाराचे विष फैलावणे आलेच.

मुळात परिवर्तन नको असणाऱ्यांना आपले परिवर्तन करून घेणे कसे झेपेल ? वर्ण–जात टाळल्याने तसे व्यक्तिशः कोणांचे काही नुकसान जरी नसले, तरी सामाजिक अधिकाराची आणि वर्चस्वपदाची भूषणे भोगण्याची, मिरविण्याची लालसा मारावी लागणे फायद्याचे नसते म्हणून मग सामाजिक आणि साहित्यिक, वैचारिक पातळीवर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष किंवा उघडपणे वा आडून झगडे–भांडणं लावली

जातात. हादरे दोन्ही काठाला बसतात. वर्चस्ववादी अन्यायी प्रवृत्तीला ही बसतात तरी ती न्याय नाकारीत असते. सतत अमानुष्कीचे ओझे वाहूनही तो माणूस लाजीशरमीने वाकत–झुकत कसा नाही ?

साहित्य चळवळीच्या संदर्भातही असेच घडत असल्याचे दिसते. दलित साहित्याची चळवळ मारण्याकरिता म्हणून काही प्रस्थापित सहेतूकपणे काही वेगळ्याच साहित्य प्रवाहाची चळवळ रूप 'टूम' काढतात. तिच्या मागे वास्तविक सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणांचे बळ अथवा सैद्धांतिक सामर्थ्याची पार्श्वभूमी अशी नसते. कारण स्वतः तो, ते प्रस्थापित व त्यांचा नवा साहित्यप्रपंच थाटणारा लेखकवर्ग आणि लोकजीवनाचा बहुजन समूह हा पूर्णपणे देव-धर्म-रुढीशरण्य आणि परंपराभिमानी असतो. तरी आपली टूम, चळवळ पुढे नेता यावी म्हणून दलित साहित्याला मागे ओढण्याचा निष्फळ प्रयत्न, प्रयोग करतात. ते काहीतरी निराधार असे व्यर्थच आरोप करतात की, दलित साहित्य हे व्यक्तिवर्तुळवादी, गटवादी साहित्य आहे. म्हणून त्याच्या व्यापकतेला मर्यादा पडल्या आहेत. त्याचा परिघ संकुचित राहिला आहे. दलित साहित्यातील विद्रोह आता संपला आहे.

अर्थात् हे सगळे आरोप, आक्षेप वर्ण–जातीय भावनेच्या अत्यंत संकुचित मनोवृत्तीचे आणि पूर्वग्रहाने दूषित दृष्टिकोणाचे द्योतक आहेत. हे उघड आहे. खरी गोष्ट ही आहे, की दलित अनुभूती, अनुभवांच्या सहभाव सहजाणिवेतून या प्रस्थापित साहित्यिक-विचारवंतांना स्वतःला 'दलित साहित्यिक' म्हणून दलित साहित्य चळवळीत सामील होता येत नाही. ही त्यांच्या मनातली खरी खंत आहे. ती ते बोलूनही दाखवितात. त्याचवेळी दलित साहित्याचे प्रेरणा–सामर्थ्य, सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व–मूल्य, आशयगर्भ जीवनमूल्य श्रेष्ठ असल्याचेही ते मान्य करतातच. आहे की नाही ही गंमत !

दलित साहित्य श्रेष्ठ ठरते आहे, ते विद्रोहाच्या सामर्थ्यामुळेच होय. हा विद्रोह व्यापक व सर्ववेधक आहे. म्हणूनच द. साहित्य व्यापक व आज सर्वस्पर्शी झाले आहे. कारण अन्याय–विषमते–विरुद्ध, पिळवणुकीविरुद्ध आज जगभर उठलेल्या युगपरिवर्तनाच्या विद्रोही

लाटांचा आवाज दलित–विद्रोहामध्ये एकवटलेला आहे. म्हणून दलित साहित्य वैश्विक चौकटीत बसणारे एक सामर्थ्यशाली वाङ्मय ठरले आहे. इथल्या कलावाद्यांच्या म्हणण्यानुसार हे साहित्य कदाचित श्रेष्ठ नसेल, पण ते उत्कृष्ट व आशयसुंदर साहित्य आहे. कारण ते समता–न्याय–नीतिमत्तेच्या आणि मानवतेच्या प्रस्थापनेसाठी युद्ध–प्रेरणा देणाऱ्या विद्रोहाने अलंकृत आहे. दलित साहित्याचा सर्वात मोठा अलंकार विद्रोहच होय. तो बहुमोल अलंकार डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारातून द. साहित्याला लाभला आहे.

इथे एक मुद्दा असा की– बहुप्रेरणांचे कडबोळे घेऊन आले जन, ग्रामीण–वाङ्मयवाले आणि 'टूम' वाले कितीही उलटचासुलटचा बोंबामारू देत, पण दलित साहित्याची कोणी अन्य प्रेरणा ठरत नसून अनेक अर्थाने व सर्वंच दृष्टीने दलित साहित्याची एकमेव मूलात्म प्रेरणा ' डॉ. आंबेडकर ' हीच आहे. निर्विवाद सत्य आहे. कारण 'आंबेडकर' ही केवळ व्यक्ती ठरलेली नसुन जगाला प्रेरक ठरलेले एक महान व्यक्तिमत्त्व आहे. आंबेडकर म्हणजे या क्रांतीयुगाचा परिवर्तनवादी ' विचार ' आहे. न्यायसमतेचं–मानवतेचं वैश्विक तत्त्वज्ञान आहे. आणि ते संघर्ष प्रेरक आहे. हा आज सर्वमान्य झालेला विचार आहे. आणि अशा विश्वव्यापक विचारांचं, प्रेरणेचं हे दलित साहित्य त्यातील विद्रोह मर्यादित, संकुचित कसा काय ठरू शकतो? तो एकदम सरतो वा आटून कसा जाऊ शकतो? पण ही नसती आवई उठवून हाकाटी पिटणारी तोंडनकली, दुटप्पी, ढोंगी आहेत. ढोंगाला कधीच जाग येत नसते. हेच खरे.

हे खरे आहे, की सुरुवातीला दलित साहित्यात विद्रोहाची वादळी (भावनात्मक) झकाळी अधिक होती. उगमाला अशी सळसळती खळबळ असणे स्वाभाविकच होते. पण आता या साहित्य सरितेचे पात्र निश्चितपणे वाढले–विस्तारले आहे. हा प्रवाह आता धीरगंभीर, व्यापक आणि सर्वंव्यापक बनत आहे. दोन्ही काठावर नवनिर्माणाच्या बागा फुलवित जात आहे. कारण दलित साहित्यातील विद्रोह हा मुळातच विध्वंसक नसून विध्वंसक मूल्यांविरुद्ध तो आहे. तो विधायक

आहे. सृजनशील आहे. आणि समाजसर्जक आहे.

दलित लेखक–कवींनीसुद्धा सुरुवातीला बरीच दगडमार केली. आता नुसती दगडं फेकावयाची नाहीत तर त्याचे धारदार आधुनिक शस्त्र करावयाचे. आणि या समाजपुरुषाचा सडलेला भाग 'कट ॲण्ड ऑपरेट' करावयाचा. दलित-विद्रोहाचे हे कार्य राहणार आहे.

ही विद्रोहाची प्रेरणा घेऊन सामाजिक वैचारिक आणि परिवर्तनाची प्रक्रिया समाजमनात निर्माण करणारी एक कवी लेखकांची पिढीच आता निर्माण झाली आहे. ती वाङमयीन व सामाजिक पातळीवर संघर्षरत आहे. हे दलित साहित्यातील विद्रोहाचे कार्य दुर्लक्षिता येणार नाही.

विद्रोहाची लढाई ही बुद्धापासून ते फुले-आंबेडकरापर्यंतच्या काळापर्यंत सतत चालू आहे. आज आणि उद्याही ती राहणार आहे. तेव्हा विद्रोह संपला, असे म्हणणे हा वदतोव्याघात आहे. काय, ही लढाई कधी संपत असते ? दलित-विद्रोहाला काही परिवर्तनाचे फळ आले तर समाजात पुढे प्रस्थापित होऊ घातलेल्या न्याय-समतेचे-माणुसकीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठीसुद्धा दलित साहित्याची (विद्रोहाची) गरज राहणारच आहे.

o o o

दलित साहित्य : काही विचार वैशिष्ट्ये :

१. सामाजिक जाणिवा आणि क्रांतिप्रवणता :

दलित साहित्यातून समाजमन व्यक्त होते आणि हे समाजमन परिवर्तनाच्या पातळीवर येऊन गतिमान होत असते. या समाजमनाला उद्युक्त करणारे केंद्र म्हणजे ही विषम समाजव्यवस्था. एकंदरच या विषमतामूल समाजव्यवस्थेला नाकारण्याची दलित साहित्याची प्रवृत्ती आहे ती सामाजिक समता, स्वातंत्र्य, न्यायादी मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेची प्रेरणा देत आहे. आणि सामाजिक विषमता– अन्याया-विरूद्ध संघर्षाची जाणीव जनमानसात चेतवून समाजातील अनिष्टकारी अनर्थांना शोधण्याचे, माणूस घडविण्याचे आणि त्याला क्रांतिप्रवृत्त करण्याचे कार्य दलित साहित्य करीत आहे.

दलित साहित्याला असे समाजपरिवर्तनाचे व प्रबोधनाचे निश्चित ध्येय आहे. याचा अर्थ, समाजजीवन बदलण्याची प्रेरणा प्रसृत

करणाऱ्या दलित साहित्यातील क्रांतीचे स्वरूप केवळ वाङमयीन क्रांतीचे नसून पहिल्यांदा सामाजिक क्रांतीचे आहे. या वाङमयनिर्मितीचा केंद्रवर्ती आशय सामाजिक आहे. समाजमनावर अपेक्षित परिणाम व्हावा, या दृष्टीतून होणारी त्याची निर्मिती–प्रेरणाच सामाजिक आहे.

दलित जाणीव एक सामाजिक जाणीव आहे आणि संघर्ष वा क्रांतिप्रवणता त्या जाणिवेचा गाभा आहे. सामाजिक जाणिवेची मूल्यगर्भता लाभलेले दलित साहित्य म्हणूनच दलितांना आपल्या खालच्या पातळीवरून वरच्या पातळीवर नेणारी क्रांतिप्रेरक शक्ती ठरते. अर्थात, दलित साहित्य हे परिवर्तनाचे मूल्य उद्घोषित करणारे येथील पहिले क्रांतिप्रवण साहित्य होय.

२. सामाजिक चळवळीचे प्रतिबिंब : सामाजिक घटना

सामाजिक परिवर्तनास विरोध करणारे तत्त्वच जेव्हा प्रस्थापित करण्याचा पुनःपुन्हा प्रयत्न होतो, त्यावेळी परिवर्तनेच्छू वृत्ती आणि स्थितीप्रिय समाज यांच्यामध्ये एक अनिष्ट पोकळी, एक दुरावा निर्माण होत असतो. त्या दोहोमध्ये प्रकट–अप्रकटपणे एकसारखा संघर्ष चाललेला असतो. सामाजिक, मानसिक पातळीवरील त्या संघर्षमय दुराव्याची वेदनामय जाणीवच अशा विद्रोही साहित्याला जन्म देते. उदा. वर्णजाति-वर्चस्ववादी आणि वर्णजातिविहीन समाजरचनावादी यांच्यामध्ये सामाजिक-सांस्कृतिक पातळीवर जो संघर्ष चाललेला आहे. त्याचेच एक रूप म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्य हे दलितांच्या सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचे संघर्षप्रेरक प्रतिबिंब असते, त्याचवेळी ती एक सामाजिक घटनाही असते. तेव्हा या साहित्याकडे साहित्य म्हणून पाहण्याबरोबरच समाजात घडणाऱ्या एकूण परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक जाणिवेतून त्याचे स्वरूप न्याहाळावे लागेल. नाहीतर दलितांच्या सामाजिक चळवळीला साधनभूत ठरलेल्या दलित साहित्यातील वाङमयीन व समाज जीवनाचे संदर्भ आपल्याला आढळणार नाहीत.

३. सामाजिकता : सामाजिक आशय आणि अपूर्वत्व

दलित साहित्य हे सामूहिक मनाचा आविष्कार असल्याने ते

पूर्णतः व्यक्तिनिष्ठ, व्यक्तिवादी वा व्यक्तिकेंद्री साहित्य असू शकत नाही. तरीसुद्धा साहित्य हे व्यक्तिनिर्मित असल्यामुळे तिच्या मानसिकतेची आशय-स्पंदने व आत्मगत आविष्काराच्या छटा लेखकाला टाकता येत नसतात, हे खरे पण दलिताच्या सामाजिक जीवनाचा आणि व्यक्तिजीवनाचा किंवा निर्मितीशील मनाचा येथे संबंध असल्यामुळे दलित लेखकाची मानसिकता ही त्याच्या कलाकृतीतून सामाजिकताच होऊन येते. येथे निर्मितीमन असे समाजमन बनणे, हे दलित-निर्मितीचे वैशिष्ट्य असल्यामुळे हे साहित्य व्यक्तिकेंद्री, व्यक्तिनिष्ठ वा व्यक्तिसापेक्ष असण्यापेक्षा ते अगोदर समाजसापेक्ष आणि समाजाभिमुख असलेले साहित्य असते. नंतर व्यक्तिनिष्ठ असू शकते. कारण व्यक्तिगत पातळीवरसुद्धा त्याला जीवनात झुंज द्यावीच लागते. त्याची प्रथम व्यक्तिनिष्ठ अभिव्यक्ती नंतर समुहमनाची अभिव्यक्ती ठरते. असे व्यक्तिनिष्ठ जीवन संदर्भ आणि समुहसंवेदन या दोहोच्या प्रकटिकरणामुळेच दलित कलाकृतीला एकाचवेळी सामान्यत्वा-बरोबर अपूर्वत्वही प्राप्त झालेले दिसते. हे अपूर्वत्व दलित साहित्यातील सामाजिक आशयामुळे. कारण सामाजिक आशय हा शेवटी विश्व संदर्भाच्या व्यापक नि भव्य चौकटीला भिडलेला असतो.

४. 'दलित' दर्शनाबरोबर दिग्दर्शनाचे कार्य :

दलित साहित्यातून आजवर अस्पर्श राहिलेल्या जीवनाचे आगळे वेगळे, उघडे-नागडे, भयाण नि भीषण स्वरुपाचे अनुभव व्यक्त होणे स्वाभाविक आहे. त्यात 'दलित'ची स्थितीची अनेक प्रत्ययकारी चित्रे दलित जीवनवास्तवाच्या अनुभूतीतून साकारलेली दिसतात. याचा अर्थ, दलित साहित्य हे दलित जीवनाचे नुसते प्रतिबिंब नाही, तर त्या जीवनाचे वास्तव दर्शन आहे. 'कलाकृती ही छायेचीही प्रतिछाया (नक्कल) असते' (प्लेटो) ही वाङ्मयासंबंधीची आदीम संकल्पना दलित वाङ्मयाने नितांत खोटी ठरविली आहे. दलित साहित्य सांगते, की साहित्य हे जीवनाचेच वास्तव चित्रण असते, आणि असावे. ते जीवनाचे आशयघन संदर्भमूल्य, जीवनमूल्यच असते. म्हणून साहित्यकृती ही फक्त मनोरंजनाची चीज किंवा फक्त तात्त्विक

पातळीवरची गोष्ट न राहता ती मानवी जीवनातली कृतिप्रेरक घटना ठरावी, असे सार्त्रचेही म्हणणे आहे. दलित साहित्य हे कृतिप्रवणशील, सर्जनात्मक वाङ्मय आहे, हे त्याच्या समाजसंबंधित्वातून किंवा सामाजिक, सांस्कृतिक चळवळी निगडित असलेल्या स्वरूपावरूनही सिद्ध होते. म्हणजे असे, की दलित जीवनाच्या स्थित्यंतराच्या आणि आजच्या त्याच्या परिवर्तनशील अवस्थेच्या संदर्भात कृतिशीलतेचे महत्त्व प्राप्त होते.– ते समाजजीवनात हवे ते परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने जाणाऱ्या दलित चळवळीला दलित साहित्याने प्रेरणा दिली, यातून. यावरून दलित साहित्य हे दलित दर्शन तर आहेच, पण एकूण सामाजिक जीवनाला दिग्दर्शन करणारे आणि चळवळीला दिशा प्रेरक ठरणारे वाङ्मय आहे, यात शंका नाही.

५. नव्या जीवन-जाणीवा आणि नव्या प्रवृत्ती प्रेरणांचा अविष्कार

दलित जाणीव, जीवनदृष्टी आणि दलित प्रवृत्ती यांचा विचार दलित साहित्याला रूढ साहित्यापासून वेगळे करतो. त्याला वेगळी वैशिष्टचे आणि नवे वाङ्मयीन मूल्य प्राप्त करून देतो.प्रथापित मराठी वाङ्मय आपल्या रूपबंधांचा ' केवळ-कला ' दृष्टीतून विचार मांडते; तर दलित वाङ्मय सामाजिक जाणीव, जीवन दृष्टी व जीवनविषयक आशय मूल्याचे महत्त्व मानते व प्रतिपादिते आणि त्याप्रमाणे जीवनानुभवांचा आशयप्रधान आविष्कार घडविते. नव्या वाङ्मयीन रूपात त्या अनुभवांचा अर्थ विशद करते आणि त्यातून ते माणूस शोधते.

प्रस्थापित वाङ्मयातून यापूर्वी न आलेले दलित जीवन दलित साहित्यातून नव्यानेच अभिव्यक्त होत असल्यामुळे नव्या जीवन जाणिवांचा आणि वाङ्मयीन प्रवृत्तींचा त्यातून सहजच आढळ होतो आहे. प्रस्थापित जीवनदृष्टीने आणि स्थितीप्रिस प्रवृत्तीने ज्या गोष्टी कधीही दिल्या नाहीत, त्या दलित दृष्टी व प्रवृत्तीने या साहित्यातून स्वरूपबद्ध केल्या आहेत. त्या गोष्टी कोणत्या ? तर सामाजिक– आर्थिक शोषणाची यंत्रणा कायम करणाऱ्या व्यवस्थेचा आणि स्थितीशीलतेचा पुरस्कार करणाऱ्या पारंपरिक वाङ्मयीन संकल्पना, प्रवृत्ती, संकेत, आदर्शादी मूल्यांविरूद्ध नकार–विद्रोहाची

भूमिका मांडणे आणि समता– न्याय– मानवतेच्या प्रस्थापनेची प्रेरणा देणे तसेच माणसामध्ये प्रेम, करुणा व माणुसकीवरील श्रद्धा निर्माण करणे आणि जीवन आणि समाजपरिवर्तनाची मूल्ये समाजमनात प्रसृत करणे इ. या गोष्टी म्हणजे दलित साहित्याची उद्दिष्ट अंगे होत. ही प्रकट अंगे म्हणजे नव्या जीवन जाणिवांचा आणि नव्या प्रवृत्ती-प्रेरणांचा प्रत्ययभूत अविष्कारच होय.

परिणामत: समाजजीवनात जे जे बदल घडून येतात, ते ते बदल वा घटना अनुभवांकित होऊन पुन्हा दलित साहित्याचा आशय–विषय ते व्यापक करतात. समृद्ध करतात. येथे दलित साहित्यातून व्यक्त होणारी सामाजिक परिस्थितीच्या संभाव्य परिवर्तनाची जी प्रतिबिंबित नवी रुप–अवस्था– ती दलित साहित्याची एकाचवेळी सामाजिक तशा वाङमयीन क्रांतीची अवस्था असते. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

६. नव्या जीवनाची सौंदर्य–प्रेरणा :

आपल्या जीवन–मरणाची दोरी वेड्याप्रमाणे कुण्या अदृष्ट अज्ञाताच्या हाती सोपवून सारे जीवन टांगते ठेवण्यास सांगणारे मृतात्म्याचे तत्त्वज्ञान स्वीकारून हा माणूस कसातरी जगत आला. जीवन हे असे कसेतरी जगण्यासाठी नसून ते जिवंतपणे व सुंदरपणे जगण्यासाठी आहे, ही प्रेरणा देऊन मराठी दलित साहित्याने एकूण प्रस्थापित मराठी वाङमयसृष्टीतील निराशा–विफलतेची, क्षणभंगुरतेची आणि व्यक्ति, आत्मकेंद्रिततेची जाणीव व्यर्थ ठरवून फेकून दिली. आणि ज्या तत्त्वज्ञानाने व प्रवृत्तीने माणुसकीचे हनन करून एक अत्यंत निकृष्ट व मूल्यहीन जीणे या समाजाच्या पदरात टाकले, –त्या तत्त्वज्ञानाशी– प्रवृत्तीशी माणसाने मर्दपणाने दोन हात करावे, अशी संघर्षाची भावना निर्माण केली आणि हे जीवन याची डोळा याची हाता शक्यतोवर सुखमय व सन्मानित करण्याचा यत्न माणसाने करावा हा प्रेरणामंत्र याच साहित्याने पहिल्यांदा दिला.

दलित माणसाला जीवनात व जगण्यात रस वाटतो म्हणूनच पारंपारिक वाङमयातील सर्व निरक्षता व वैफल्य काढून टाकून

जगण्यात जिवंतपणा आणला. अशा जीवनाचे हे साहित्य म्हणूनच आशावादी नि बंडखोर प्रवृत्तीचे साहित्य बनले आहे. त्याला सुंदर जीवनाचे ध्येयस्वप्न आणि तेवढ्याच सुंदर मानवी आकांक्षा आहेत.

थोडक्यात, दलित जीवन आणि पर्यायाने एकूण समाजजीवन समता, स्वातंत्र्य, न्याय आदी मूल्यांनी सुशोभित व प्रतिष्ठित व्हावे, यासाठी प्रचलित समाजरचनेला व कालबाह्य संस्कृतिपरंपरेला नाकारण्याची, नव्या समाजरचनेचे स्वप्न साकारण्याची आणि सामाजिक परिवर्तनासाठी विद्रोह पुकारण्याची दलित साहित्य प्रेरणा देते. एकूण नकार, विद्रोह आणि सौंदर्याकांक्षा असे त्रिविध मूल्यभाव म्हणजे दलित साहित्याची प्रकट अशी स्वरूपलक्षणे होत. यामुळेच दलित साहित्याची ही केवळ वाङमयीन प्रवृत्ती न राहता ती एक नवनिर्माणक्षम जीवनप्रवृत्ती झाली आहे.

७. मानवी समता स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे साहित्य

दलित जाणीव ही दलित समाजाच्या संघर्षशील अवस्थेची परिचायक आहे. दलित लढ्यामागची ती सामाजिक जाणिवच आहे. ती 'दलित' अवस्थेचे भान देते. या संघर्षशील अवस्थेचे कारण या साहित्याच्या उद्दिष्टात आहे. अर्थात दलित साहित्याचे अंतिमतः ध्येय माणसाला त्याच्या 'दलितपणातून' मुक्त करणे, त्याला स्वातंत्र्य प्रदान करणे– हे आहे. दलित जाणिवेमागील प्रेरणाही मानवी स्वातंत्र्य व सामाजिक समता – हीच आहे. त्यामागील ते एकमेव गर्भित मूल्य आहे.

सारांश सामाजिक न्याय व समतेसाठी आणि मानवी स्वातंत्र्यासाठी पुकारल्या जाणाऱ्या लढ्यामागील दलित जाणीव ही मूलतः विद्रोहात्मक म्हणून क्रांतिकारी जाणीव आहे. दलित विद्रोहामागे 'दलित मुक्तीचे' उद्दिष्ट आहे. आर्थिक, सामाजिक व्यवस्थेच्या कोंडीत बंदिस्त झालेल्यांना दलित साहित्यापासून मिळणारी दलितांच्या मुक्तीची प्रेरणा ही मानवी स्वातंत्र्याची मूलभूत प्रेरणा होय. माणसाला बंधमुक्त नि भयमुक्त करणारी ही सर्व प्रेरणा आज तरी खऱ्या अर्थाने दलित साहित्यच देत आहे.

o o o

दलित साहित्य आणि कलावाद

पारंपरिक मराठी साहित्याहून मराठी दलित साहित्य हे आपल्या जीवनधर्माने, प्रेरणा–प्रवृत्तीने व प्रकृतीने मुळातच वेगळे आहे. हे वेगळे असण्याचे कारण पारंपरिक संस्कृती आणि साहित्यामध्ये वंचित व आविष्कारहीन राहिलेले दलित जीवनच वेगळे आहे. हे जीवन आपल्या कलाकृतीतून अभिव्यक्त करताना दलित–मन साहजिकच विद्रोही बनते. हा विद्रोह अन्यायाच्या संतापातून येतो. सामाजिक समता, न्यायाची, समाजपरिवर्तनाची व माणुसकीच्या विश्वमूल्यांची मागणी करणारी दलित साहित्याची वृत्ती ही बेडर व बंडखोर बनत जाते. हे जीवनाचे व समाजजीवनाचे साहित्य असल्याने ते सामाजिक बांधिलकीशी पूर्णतः परिबद्ध आहे. म्हणून सामाजिक बांधिलकी न मानणाऱ्या, दलित जीवनाला अव्हेरणाऱ्या आणि एकूण समाज–जीवनाचा विचार करण्यास तयार नसलेल्या प्रचलित सौंदर्यवादी कला–निकषांचे तयार साचे दलितांचे विद्रोही वाङमय–मन उधळून लावताना दिसते. " एका निराळ्या तेजाच्या झळाळीने हे साहित्य

मराठी भाषेला समृद्ध करू लागलेले आहे. त्या साहित्याची प्रकृती आणि आकृती विलक्षण आहे. प्रकृतीला अगतिकता मान्य नाही. आणि आकृतीने भाषेच्या तथाकथित सौंदर्याचे आणि कलेचे रेडिमेड नकाशे फेकून दिले आहेत. " हे खरे आहे.

दलित साहित्याच्या या नव्या प्रवाहाने वाङ्मयाच्या नव्या निकषांची, त्याच्या नव्याने मूल्यमापनाची गरज निर्माण केली आहे. नव्या वाङ्मयीन जाणिवेतून व जीवनदृष्टीतून या साहित्याची ओळख करून घेतल्याशिवाय त्याची बंडखोर प्रकृती व प्रवृत्ती कलासौंदर्यवादी समीक्षेला कळणार नाही. पण कलावादी मंडळी आपले जुनेच तयार साचे पुढे करून दलित साहित्याकडे बघत आहेत.

प्रस्थापित सौंदर्यवादी कला-समीक्षा पद्धतीच्या या दृष्टीवर प्रकाश टाकताना दलित साहित्याने मराठी समीक्षकांच्यापुढे ठेवलेल्या काही मूलभूत मुद्यांचा विचार करावा लागतो. कलावाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे जर वाङ्मयीन कलाकृतीचा समाजाशी व व्यक्ती, समाजजीवनाशी संबंध नसतो. ती स्वायत्त व स्वत:पूर्ण असते आणि कला फक्त 'कलेसाठी कला'च असते, तर शेवटी कलाकृती ही कोणासाठी, कशासाठी निर्माण केली जाते ? या प्रश्नाला त्यांचेही उत्तर, "माणसासाठी व त्याच्या वैयक्तिक रंजनासाठी, आनंदासाठी," असे असेल तर असे म्हणता येईल की माणसासाठी सर्वथा असलेल्या कलेला मग मनुष्यजीवन कसे वगळता येईल ? जीवन सोडून कोणत्याही साहित्याचा संभवच कसा होऊ शकेल ?

दुसरे, मनुष्य हा सामाजिक प्राणी म्हणून व्यक्तिजीवनाबरोबर सामाजिक जीवन हे साहित्यातून येणारच. उलट आज व्यक्तीचे वाढते समाजसंबंधित्त्व लक्षात घेता, सामाजिक जीवनाच्या अभिव्यक्तीशिवाय नुसत्या आत्मनिष्ठ वा व्यक्तिनिष्ठ अविष्काराला समाजसृजनाचे अर्थमूल्य प्राप्त होत नसते. तो अविष्कार केवळ व्यक्तिनिष्ठ म्हणून तोकडा, अपूर्ण राहतो. तरीसुद्धा कला ही स्वत:सिद्ध व स्वयंपूर्ण असते, असा आग्रह कलावादी धरतात. तर समाज व जीवनाचेमूल्य नसलेल्या साहित्यकलेला दुसरे कोणते आणि कशाचे मूल्य असते ? कशाचेही

मूल्य नसले, तरी ती 'कला' ठरत असेल, तर अशी वाङ्मयीन कलाकृती आणि तिला श्रेष्ठ–सुंदर कला म्हणून गौरविणारे प्रचलित कलासौंदर्यवादी निकष दलित साहित्याला नामंजूर आहेत, असे दिसते. हे साहित्य जीवनमूल्ये व वाङ्मयमूल्ये ह्यांच्यामध्ये मूल्यगर्भ असा संबंध आहे.असे मानते आणि तो संबंध शोधण्याची आवश्यकता ते प्रतिपादिते.

जीवनाची मूल्ये न जोपासणारी आणि रूप आकृतिबंधालाच महत्त्व देणारी एखादी साहित्यकृती केवळ कलावादी मूल्यांनी श्रेष्ठ जोखली जात असेल, तर तिचे श्रेष्ठत्व ठरविणाऱ्या प्रचलित कला-समीक्षेची प्रत व पद्धत दलित साहित्य तकलादू आणि जीवनबाह्य मानते. अशी समाज व जीवनविन्मुख कलाकृती ही व्यक्तिनिष्ठ म्हणून व्यक्तिमूल्याधिष्ठित असू शकते. परंतु ती शेवटी व्यक्तिवर्तुळवाद जोपासणारी असल्याने भारतीय समाजजीवनाचा तळसंदर्भ शोधणारी असू शकत नाही. कारण ती सामाजिक बांधिलकीच्या परिबंधाला मानणारी नसते, असे दलितधारेला वाटते. भारतीय जीवनाचा विचार केला तर " व्यक्तीला परंपरेने जी बंधने असतात त्यातील कितीतरी बंधने तिच्याबरोबर जन्मतःच आलेली असतात. जात, धर्म ही अशा बंधनापैकी होत. भारतातील व्यक्तीचे स्वातंत्र्य व्यक्तिमूल्याधिष्ठित कधीही नसते. त्याची अनुभव घेण्याची पद्धत, त्यासंबंधीची त्याची प्रतिक्रिया, त्याची निर्णयशक्ती इत्यादी सर्वच समाजजीवनाने प्रभावित असतात. कलावंत ही समाजात जगणारी अशीच व्यक्ती असते. या व्यक्तीला समाजापासून वेगळी स्वतंत्र कल्पिणे हे मूलतःच चुकीचे असते. [२] अर्थात् मानवी जीवनाशिवाय कला शक्य नसते. कलावंत व्यक्तीने समाजात राहून सामाजिक किंवा असामाजिक (?) परंतु जीवनाच्याच तत्त्वानुभूतींनी मिळून कलाकृती घडविली असेल, तर कोणतीही वाङ्मयकला निव्वळ 'कलेकरिता कला' कशी राहू शकते, हे समजत नाही.

तरीसुद्धा कलावादी समीक्षेने साहित्यकला ही समाज व जीवन-निरपेक्ष असू शकते आणि तरीही ती कलाच असते, असे ठरविले आहे. कारण ती जीवननिरपेक्ष म्हणजेच स्वतंत्र, स्वयंपूर्ण असते; एवढेच नव्हे तर ती साधन नसून साध्यच असते, असे कलावाद्यांचे म्हणणे

आहे. मर्ढेकरांनी लिहिलेच आहे– " कला ही स्वयंसिद्ध असते. तिचे रूप स्वयंपूर्ण व स्वयंशासित असते. ती साधन नसून स्वतःच साध्य आहे. रसरशीत व चैतन्ययुक्त भावानुभव स्व–तंत्राने स्वतःचा घाट, संरचना (Form) स्वतःच शोधतो आणि नाटच, कादंबरी, कविता इत्यादींचे रूप घेतो. भावानुभव स्वयंसिद्ध व जिवंत असल्यामुळे लेखकाला कलात्मक तटस्थता बाळगावी लागते." [३] कलेतील भावानुभव लेखकप्रेरित वा व्यक्तिसन्निध असण्याअगोदर तो 'चैतन्ययुक्त, स्वयंसिद्ध' वगैरे असतो, असे ते म्हणतात. मानवी भावानुभव स्वतःसिद्ध असल्यावर त्या भावानुभवांनी बनलेली कलाकृती ही स्वतःच ' साध्य ' असायला हरकत नव्हती. परंतु खरा प्रश्न इथेच उभा राहतो, की मानवी भावानुभवाला साध्यरूप असे पूर्ण वस्तुनिष्ठरूप देता येणे शक्य तरी असते काय ? लेखकाच्या कलाकृतीतून ' स्व ' चे संपूर्ण विरेचन संभवनीय आहे काय ? जिथे या प्रश्नांची उत्तरे समाधानकारकपणे देता येत नाहीत, तिथे ' भावनानुभव स्वयंसिद्ध असतो. कला स्वतःच साध्य असते' हे कसे सिद्ध करता येईल ? "भावस्थितीची सार्वत्रिकता, निरपेक्षता, वस्तुनिष्ठता व ही होण्याचो प्रक्रिया पूर्णपणे स्पष्ट करता येत नाही. म्हणून आध्यात्मासारखी वरकरणी सोपी परंतु गूढ परिभाषा वापरली जाते." [४] हेच खरे.

कलात्मक तटस्थतेचा मुद्दाही मर्ढेकरी 'चैतन्ययुक्त कलानंदाशी' वेगळचाच तऱ्हेने जुळलेला दिसतो. जीवनवादी साहित्यनिर्मितीलाही कलात्मक तटस्थता हवी असते. " वाङमयीन तटस्थता म्हणजे समाज-जीवन तोडणारा दुरावा नव्हे. परंतु कलात्मक तटस्थतेच्या नावावर समाजजीवनाशी दुरान्वय साधून मानवी स्वातंत्र्याचा व प्रगतीच्या संभवनीयतेचा त्यात विचार करण्यात येत नाही. [५] तो विचार करण्यात यावा, असे दलित साहित्याला वाटते. माणसाला केंद्रवर्ती मानून मानव जीवनाच्या प्रगतीची प्रेरणा देणारी वाङमयाकृती ही ' साध्य ' नसून एक ' साधन ' आहे, असे दलितवृत्ती मानते. म्हणूनच दलित साहित्याचे मूल्यमापन वाङमयकलेला ' साध्य ' मानणाऱ्या कोणत्याही सौंदर्यशास्त्रीय समीक्षामुल्यांनी करता येणार नाही.

व्यक्तीचे, समाजाचे ' उत्थान ' हेच खरे ' साध्य ' होय. पण तसे न मानता कलेलाच साध्य मानल्यामुळे अशा सौंदर्यवादी कलेचा जीवनाशी त्याच्या लौकिक जीवनाशी असलेला ऋणानुबंधच शेवटी अमान्य केला जातो आणि तेथे अलौकिक संबंध आणणारा अध्यात्मवाद, नियतीवाद, अस्तित्त्ववाद, अतिव्यक्तिवाद हे वाद उपस्थित होतात. या वादांनी परोक्षअपरोक्षपणे कलावादालाच पोसलेले असते. वाङमयकला ही आधीच स्वयंपूर्ण-स्वयंसिद्ध म्हणजे ' साध्य ' म्हणून निर्धारिली गेलेली असते. तिची समीक्षा–प्रत्यक्ष जीवनातले सौंदर्य ज्या साहित्यातून अविष्कृत होते, त्यातून शोधण्याचा प्रयत्न होत नाही. तर ' सत्यं ' – शिवं-सुंदरम्'ची किंवा सच्चिदानंदाची अनुभूती अभिव्यक्त करणाऱ्या साहित्याचेच कला-गुण ती समीक्षा गाते. म्हणूनच कला ही स्वयंभू, स्वयंशासित,रसरशीत आणि चैतन्ययुक्त आनंदाचे सहोदरच असते, असे कला सौंदर्यवादी समीक्षा आवर्जून सांगते.

कलावादी आणि कलात्मक साहित्य

' कला ही स्वयंशासित, स्वयंभू–स्वयंपूर्ण असते, कलाकेवळ रंजनपर असते; कलेने कलानंद तेवढा द्यावा, बाकीच्या गोष्टींशी तिचे सोयरसुतक नाही' असे मानणाऱ्या कलासौंदर्यवादी कलेने मानवी जीवनाचा व समाजाचा विचार दुर्लक्षिल्यामुळे, तो कलाबाह्य मानल्यामुळे पूर्वापार चालत आलेले सामाजिक अन्याय, जातिभेद, विषमता, शोषण पिळवणूक आणि धार्मिक अंधरूढी व अंधश्रद्धांनी भरलेल्या संकेत–तत्त्वांना जिवंत राहण्यास प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे सहाय्यच केले आहे, असे दलित लेखकाला वाटते. कला व त्यातूनही वाङमयकला अजिबात आनंद-रंजनदायी नसावी, असे दलिताचे निर्मितीक्षम मन म्हणत नाही. पण ती केवळ आनंद रंजनपर किंवा नुसती वाचण्या-ऐकण्याची वा पाहण्याची-अवलोकण्याची शोभेच्या वस्तूसारखी नसावी. म्हणजे ती कलेसाठी कलेच्या मोहमयी सुंदर रूपाने नटणारी नसावी, तर कला ही प्रत्ययकारी असल्याने ती अनुभवण्याची सुद्धा गोष्ट असली पाहिजे. म्हणून ती परिकथेतल्या पंखधारिणी जलपरीसारखी आकाशविहरिणी नसावी, तर धरतीवर राहणारी अन् या मातीचा गंध लेवून ' जीवन

गाणारी कला असावी. कला ही जीवनाची खरी सर्जक असली पाहिजे. मार्गदर्शक असली तर हवीच, मानवतावर्धक मात्र असावी, असे दलित साहित्यिकाला वाटते.

कला ही मनुष्य जीवनाशी निगडित असते, हे मान्य केल्यावर " कला रंजक असावीच लागते. पण हे रंजन ' फॅसिस्ट ' नसावे. क्रांतिजाणिवेला, बुद्धिवादाला लुबाडणारे, गुंगवणारे ते रंजन नसते. रंजन म्हणजे प्रत्ययकारकता. रंजन नुसतेच वांझ नसावे. अफू देणारेही नसावे. ईश्वराधीनता किंवा विषमतेची भक्ती शिकविणारे नसावे. हे रंजनही सर्जक असावे. "[६] रंजन म्हणजे प्रत्ययकारकता, म्हणून कलाकृतीमधून प्रत्यय आणून देणारे अनुभव हे जीवन सोडून असू शकत नाहीत. याचा अर्थ अनुभूतीतून निर्माण झालेले साहित्य ही एक ' कला ' च असते. आणि म्हणून ते कलात्मकही असते. साहित्य ही कला म्हणून कलात्मक असलेले दलित साहित्य पारंपारिक कलावादी वाङ्मयाचा व त्याच्या कला समीक्षेचा धिक्कार का करते, हे निराळे सांगायला नको.

कलावादी वाङ्मय जीवनाचा विचार करीत नाही, म्हणजे ते जीवनाकरिता नसून ' कलेकरिता कला ' म्हणून अवतरते, त्यामुळेच जीवननिष्ठ दलित साहित्य कलावादाला नाकारते. तरी दलित साहित्य कलात्मतेला टाळत नाही. साहित्य निव्वळ कलावादी असणे आणि ते कलात्मक असणे यातील भेद स्पष्ट आहे. " कलात्मकता ही स्वतंत्र गोष्ट आहे. आणि कलावाद ही तीहून निराळी गोष्ट आहे. उच्चवर्णीय साहित्यिकही कलावाद नाकारू शकतो. उदा. खांडेकरांचे, केतकरांचे, माटचांचे साहित्य 'कलावाद' नाकारणारे आहे, मात्र 'कला' कोणालाही नाकारता येत नाही "[७] अर्थात कलात्मक साहित्य केवळ कलावादी असण्याची अजिबात गरज नाही. गरज आहे ती–ते जीवननिष्ठ व समाजसन्मुख असण्याची. परंतु समाजाभिमुख नसलेल्या कलावादी समीक्षेला जीवननिष्ठ साहित्याच्या कलात्मक मूल्यांचे भान नसते, असे दिसते. " कलावादी समीक्षा हीच मान्यवर पद्धती आहे, अशी त्यांची समजूत असते समाजनिष्ठ जाणिवेच्या कलात्मक शक्यतांची जाणीव

त्यांना नसते व त्या मार्गाने ते विचारही करीत. नाहीत याचा परिणाम कलावादी जाणीव दृढ करण्यात होतो. कलाक्षेत्रातील समाजनिष्ठ जाणिवेला ते हानीकारक ठरते"[८] पण त्याच्याशी कलावाद्यांचे काही कर्तव्य आहे, असे दिसत नाही.

मराठी समीक्षेचा दृष्टीकोण

कोणतीही वाङ्मयकृती ही शेवटी एक कलाच असते. परंतु प्रस्थापित कलावादी समीक्षेच्या दृष्टीत दलित साहित्य कलात्मक ठरत नसून ते प्रचारात्मक साहित्य आहे आणि हे साहित्य अमुक साच्यात बसत नाही अथवा अमुकाच्या कसोटीवर पुरेसे उतरत नाही, असे म्हटले जाते. पण तरी त्याचे वेगळे समाज जीवनमूल्य, वाङ्मयमूल्य अमान्यही केले जात नाही-असे का ? कारण या साहित्याला स्वतःचा चेहरा आहे, अस्मिता आहे. या साहित्यातून साकारलेला विद्रोहाचा अंगार आणि वेदनेचा पीळ मराठी वाङ्मयात अक्षरशः अपूर्व आहे. रूपागुणाने प्रस्थापित मराठी साहित्याहून ते आगळे वेगळे आहे, आशयसमृद्ध व आशयसुंदर आहे. दलित साहित्याला असे वेगळेपणाचे मूल्य तर आहेच. शिवाय दलित साहित्य ही युगपरिवर्तनकारी क्रांतिगर्भ सामाजिक जाणीव आहे. एक सामाजिक 'घटना' आहे. दलित कलावंतांनी सर्जिलेली ती ज्वलंत जीवन जाणिवच आहे. माणुसकीच्या मूल्यप्रतिष्ठेची, समाजपरिवर्तनाची, भयमुक्त-बंधमुक्तकरून माणूस घडविण्याची आणि मानवी स्वातंत्र्याची प्रेरणा देणारी ती एक साधनशक्ती आहे. प्रस्थापित कला–सौंदर्यवादी मराठी साहित्याला हे सर्वं नवे आहे. मराठी सांहित्याने कलावादाच्या आरशात (आकृती–रूपवादाच्या फॉर्ममध्ये) आपले बाह्य देखणेपण तेवढे खूप गोंजारले. पण पुरोगामी विद्रोही धारेच्या साहित्याची आंतरशक्ती ओळखली नसल्यामुळे त्यांच्या दृष्टीत दलित साहित्य 'काहीतरी प्रचंड,' आगळे वेगळे आणि नवे वाटते. पण कलात्मक वाटत नाही.

दलित साहित्याला निव्वळ देखण्या, रेखीव कलेचा पाठपुरावा करून कलात्मकतेच्या मागेही सारखे धावावयाचे नाही. लढाई ही सुंदर वळणावळणाने व हळूहळू होत नसते. तिची आंतरशक्ती मात्र

जबरदस्त असावी लागते. साधने पुढारलेली असावी लागतात. पण साहित्याला 'साधना' ऐवजी 'साध्य' मानणाऱ्या कलावाद्यांच्या ('दलित साहित्य कलात्मक नाही, प्रचारी आहे, त्याचे मूल्यमापन कलेच्या स्वयंभू व स्वतंत्र कसोटयांवरच करावे लागेल') या दृष्टिकोणामागे समाजजीवनाचा वाङमयाशी असलेला संबंध टाळण्याचाच हेतू स्पष्ट दिसतो, " जीवनाशी कलेचा संबंध नाही. ती स्वायत्त आहे. स्वयंभू आहे. तिला माणसांच्या समाजाशी काही एक कर्तव्य नाही. कला जीवनाची आईही नव्हे आणि-सखी-हितैषीही नव्हे, कुणीकुणीच नव्हे असे जीवन जगणाऱ्या माणसांच्या समाजात लाख संबंधानी जगणाऱ्या आणि जगत जगत कलानिर्मिती करणाऱ्या, कलेसंबंधी बोलणाऱ्या लोकांनी म्हणावे यात जगण्याची प्रक्रिया नाकारली जाण्याशिवाय आणखी काय शक्य झाले आहे ? " [९] जगण्याची प्रक्रिया तशी कोणी नाकारीत नाही, तर त्या प्रक्रियेशी संबंध असलेल्या साहित्याचा संबंध ते टाळताहेत.

कलापूजकांमधल्याच काही लेखक-समीक्षकांना–दलित साहित्यातील सामाजिक जाणीवा व क्रांतिप्रेरणा मान्य आहेत. त्याचे वेगळे सामाजिक व वाङमयीन मूल्यही ते मान्यच करतात. पण तरी ते दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी पारंपारिक वाङमयीन कसोटयांचाच आग्रह धरतात. उदा. " दलित साहित्यामागील सामाजिक प्रेरणा अधिक जिवंत आणि खऱ्या आहेत. त्यामागे हिंदुसमाज रचनेतील भयानक विषमता आणि अन्यायाबद्दलची धगधगीत चीड आहे. परंतु सामाजिक न्याय आणि अन्याय यातून निर्माण झालेल्या अनुभवाला स्वयंभू किंवा श्रेष्ठ सौंदर्यमूल्य नाही. सामाजिक न्याय हे महान मूल्य आहे. परंतु ते सुद्धा शेवटी बाकीच्या आणखी महान मूल्यांपैकी एक आहे. दलित साहित्य दलित म्हणूनच कलेचे वेगळे निकष मागू शकत नाही. त्याचे मूल्यमापन कलेच्या स्वयंभू आणि स्वतंत्र कसोटयांवरच पारखावे लागेल."[१०]

दुसरे एक मत आहे-"केवळ नवे लेखक व त्यांचे (नव्या थरातील) अनुभव यांची भरती होऊन हा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. ग्रामीण

कथेच्या बाबतीत तिला चिकटणाऱ्या मातीलाच फार महत्त्व देण्याची चूक घडली व घडत आहे... आणि या तऱ्हेच्या कलेचा मागोवा केवळ जीवनाच्या आधारे घेतला जातो. कलेच्या तत्त्वानुसार तिच्या सौंदर्याचा आस्वाद घेतला जात नाही." [11]

कलेच्या ज्या काही गृहित कसोट्या वा तत्त्वे असतील, त्यांच्या साच्याबरहुकूम कलाकृती घडविली गेली पाहिजे, असेच हे म्हणणे नाही का? येथे त्या 'ज्या काही' तथाकथित सौंदर्यस्वाद घेणाऱ्या कलावादी समीक्षा-तत्त्वांनाच महत्त्व दिले, तर त्याप्रमाणे घडलेल्या कलाकृतीचे मूल्य शून्य समजले पाहिजे आणि अशा समीक्षेचा दूरान्वयानेही विचार न करता निर्माण झालेली कलाकृती जर महत्त्वाची असली, तर मग त्या निर्धारित समीक्षामूल्यांनाच कायमचा हरताळ तरी फासला पाहिजे. कलाकृती समीक्षेला जन्म देते, समीक्षा कलाकृतीला नव्हे. समीक्षेचे हे दुय्यम स्थान कला सौंदर्यवाद्यांनीही लक्षात घेण्यासारखे आहे, मग ते कोणत्या समीक्षामूल्यांचा– तत्त्वांचा– कसोट्यांचा आग्रह धरतात आणि का ? ती कोणी ठरविलेली आहेत? ती स्थिर–चिरंतन असतात का ? –की कालानुरूप आणि कलाकृतीनुसार त्यांना बदलावे लागते ? " कला ही संकल्पनाच अस्थिर व बदलणारी आहे. कलेचे स्वरुप अमर्याद असल्यामुळे तिची निश्चित कसोटी देणे कठीण असते." [12] म्हणूनच अशा आखीव– रेखीव व ठरीव नियमानुसार केलेला वाङ्मयविचार हा वाङ्मयाच्या मूल्यमापनाला उपकारक ठरत नाही, तसाच तो वाङ्मयासंबंधीची आपली समजही निर्दोष ठेवीत नाही. तथापि, त्या कसोट्यांचा आग्रह म्हणजे पारंपरिक वाङ्मयीन संकेतांचे पुनश्च प्रस्थापन व्हावे, ही दृष्टी त्यामागे दिसते. अशी समीक्षा स्थितिशीलतेचे पोषण करते आणि गतिशीलतेचा गळा आवळून धरते त्यामुळे मानवी जीवनाचे परिवर्तन व सामाजिक परिवर्तन अनिरुद्धपणे होणे अवघड होते. "साहित्य ही एक अखंड विकासक्षम अशी चिद्वस्तू आहे. तेव्हा तिचे एकदाच नियमन व्हावे कसे ? म्हणूनच साहित्याचे, साहित्यसमीळेचे काटेकोर शास्त्र निर्माण होऊ शकत नाही. तत्संबंधीचे मोजमाप करणारी कायमची सोयीस्कर

अशी कोष्टके तयार होत नाहीत. ही कोष्टके तयार होताच हाती लागते ते साहित्य नव्हे, साहित्याचे कलेवर, " [13]

पारंपारिक कलासमीक्षेचा हात धरून दलित साहित्याच्या स्वतंत्र धारेला वाहता यावयाचे नाही. तिने आखून ठेवलेल्या नियम-कोष्टकात आपली रचना बसवून दलित लेखकाला आपल्या ' कलेचे कलेवर ' पाहावयाचे नाही. परिवर्तनवादी दलित साहित्याच्या स्वतंत्र अंत-विकासाला हे अपोषक आहे. एक प्रश्न आहे, की–जर दलित साहित्य ' कलेचे वेगळे निकष मागू शकत नाही, ' तर प्रस्थापित कलेच्या कोणत्या स्वयंभू आणि स्वतंत्र कसोट्यांवर दलित कलाकृतीला खऱ्या अर्थाने पारखले जाऊ शकते. ज्यांच्यामुळे तिच्या औचित्य-विचाराला, भावानुभूतीला आणि अनुभवश्रीमंत आशयमूल्याला न्याय मिळू शकेल ? ' हे मात्र कलावादी दृष्टीतून बघणारे कोणीच सांगत नाहीत, अशा जीवन, समाजविन्मुख कलावाद्यांना दलित साहित्य समाजद्रोही व शब्दद्रोहीच मानते.

" ज्याला हृदय नाही, ध्येय नाही, तळमळ नाही असा साहित्यिकच 'कलेकरिता कला' म्हणून सामाजिक संघर्षापासून दूर पळतो. मागे जिवंत जिव्हाळा असला, की तो केवळ कलेने स्वतःची करमणूक करीत बसत नाही. कुंचला टाकून बंदुका घेतो व शत्रूवर झाडतो. "[१४]– याची अनेक उदाहरणे सांगता येतील. जुलूम, राजेशाहीविरुद्ध बंड करून स्वातंत्र्य–समता–बंधुतेचा जगात उदय करणाऱ्या ' फ्रेन्च क्रांती ' ची प्रेरणा फ्रान्सच्या व्हॉलटेअर ह्युगोच्या क्रांतिकारी वाङमयापासून मिळाली. स्वातंत्र्याची कवने लिहिणारा कवी शेले इटलीच्या स्वातंत्र्यासाठी जातीने लढला. बायरनने ग्रीसच्या स्वातंत्र्ययुद्धात स्वतःचा बळी दिला. रशियन समाजक्रांतीचा पाया टॉलस्टॉय व गोर्कीच्या लिखाणाने घातला. मार्क्स–एंगेल्सच्या शास्त्रीय लिखाणाद्वारे अन्याय–शोषणा विरुद्ध क्रांतीचे पुरोगामी तत्त्वज्ञान आज जगाला मार्गदर्शक ठरले आहे.तिकडे रिचर्ड राईट, जेम्स बोल्डविन ह्या निग्रो लेखकांच्या वाङमयाने निग्रो समाजात क्रांती केली; तर येथे राहुल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी, मानवेंद्रनाथ रॉय या थोर

लेखकांच्या वाङमयाने सामाजिक उत्तरदायित्वाची क्रांतिमय चेतना दिली आणि साऱ्या दलित जीवनाच्या सांस्कृतिक, सामाजिक क्रांतीची प्रेरणा ठरलेल्या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथसंपदेचा–विचारवाणीचा वणवा इथे पेटलेला आपण पाहतोच आहोत. त्यांचीच युगकारी व विद्रोहांकित क्रांतिकारी प्रेरणा म्हणजे दलित साहित्य. आज दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनामागची प्रेरणा हे साहित्य झाले आहे. एक साधन ठरले आहे.

जीवनवादी प्रवाह–भेद :

तेव्हा साहित्य हा केवळ करणुणीकीखातर असलेला किंवा तो कलेचा कलानंद तेवढा घ्यावयाचा विचार आहे, असे म्हणणे हे साहित्याची थट्टा करण्यासारखे वाटते. साहित्य ही जशी अनुभवायची गोष्ट तशी ती गंभीरपणे विचार करायला लावणारी महत्त्वाची बाब आहे. परंतु कलेच्या नावावर समाजजीवनाच्या गर्भाला जिने गुदमरून ठेवले, त्या पारंपारिक संस्कृती-साहित्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे वर्णजातिवर्चस्वभावना, भेदभाव–विषमता, हिंसाचार, तिरस्कार, सूड–द्वेष आदी जोपासता आले, हे नाकारता येत नाही. आजवरचे साहित्य भारतीय समाजजीवनाच्या वर्णजातीगण वर्तुळाचे, विशेषतः पांढरपेशी मध्यमवर्गीय जीवनाचे गुणगान करणारे आणि तळजीवनाचे कृष्णरूप मांडणारे होते, असे दिसते. म्हणून आपणास जीवननिष्ठ साहित्याच्या वेगवेगळ्या प्रवाहांमध्येसुद्धा भेद असलेला दिसतो. प्रस्थापित जीवनवादी साहित्य एका विवक्षित जीवनाचाच विचार करीत असल्याने त्या समाजजीवनाचा जो एक निश्चित स्तर असेल, त्या स्तरीय व स्थिर जीवनाशीच ते साहित्य एकनिष्ठ राहिले. (उदा. मध्यमवर्गीयाचे साहित्य) अशी स्तरसापेक्ष जीवनवादी वाङमयसमीक्षासुद्धा शेवटी कलावादाकडे झुकणारी असल्यामुळे मानवतावादी आधुनिक पुरोगामी वाङमयाचे न्यायपूर्वक मूल्यमापन करण्यात ती समीक्षा कमी पडते. किंवा मुळात ती दृष्टिशुद्ध वा हेतुशुद्ध तरी राहत नाही. म्हणूनच स्थितिप्रिय जीवनवादी वाङमय आणि परिवर्तनप्रिय जीवननिष्ठ वाङमय या दोन प्रवाहात आणि त्यांच्या समीक्षामूल्यांमध्येही

आपल्याला निश्चितच भेद करावा लागतो.

" जीवनाशी कला प्रतिबद्ध आहे असे म्हणणाऱ्यांनी कलेत बोलू तसे व्यवहारात वागण्याची जोखीम आमच्यावर नाही, असे प्रतिपादण्याचा झुंडपणा करता कामा नये. तसे झाल्यास साहित्यविषयक आमची भाषणे व आमचे प्रस्ताव शुद्ध कपटक्रिया ठरतील. निर्मितीकृती निव्वळ बोजड अलंकरणे ठरतील. मैत्री, करुणा, मुदिता यांची मानवी अंतःकरणात पेरणी होणे आदिम महत्त्वाचे आहे. हे आम्ही जीवाभावाने स्वीकारल्याशिवाय वर्णवर्चस्व, हिंसाचार व सूडद्वेष यांची छुपी वा उघड उलाढाल आमच्यातून नाहीशी कशी होईल ?" [15] हा गंभीर इशारा प्रस्थापित मराठी साहित्यकार-कलावंत ध्यानी घेवोत न घेवोत, ही 'उलाढाल' संपलेली मात्र नाही. पारंपारिक वाङमयधारणेने अशा विपरित मूल्यांना समाजजीवनात प्रसृत केले आहे. त्यांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष उचलून धरणाऱ्या तथाकथित शुद्ध कलासौंदर्यवादी समीक्षा–मूल्यांचाही त्या साहित्यासकट पुरोगामी दलित वृत्तीने त्याग करणे स्वाभाविक आहे. मग 'ज्ञानेश्वरी' पासून विनोबा भावे यांच्या 'ईशस्तवना' पर्यंत आणि वेद–उपनिषद–मनुस्मृतीपासून गुरुजींच्या 'विचारधना' पर्यंतचे वाङमय असो, ते सामाजिक बांधिलकी असलेले सगळे वाङमय त्याच्या आपल्या वर्णजातिधारी व्यवस्थासन्निध जीवन–प्रणालीशी प्रतिबद्ध असलेले वाङमय होय, असे दलित साहित्याला वाटते. अर्थात त्या सर्वांनी परंपरा-पोथिनिष्ठा जपत स्थितिशीलतेचे भरणपोषणच केले आहे. समाजाला पुढे नेण्याचा प्रयत्न करण्याची आजवरच्या या वाङमयकलेला गरजच भासली नाही. साहित्य हे जीवनासह चालते. जीवनाला ते पुढे नेऊ शकते. सर्व जीवनाला घेऊन न चालणारे वाङमय त्याला मागे नेते किंवा जागीच डांबून तरी ठेवते. " वैदिक वाङमयाने, संत वाङमयाने प्रतिगामी मूल्ये शतकानुशतके वंदनीय रूपात टिकविली. हे सामर्थ्य प्रस्थापित कलेचे आहे. ती समाजाला जागीच स्थिर करते; मागेही नेते. तेव्हा समाजाला कला पुढे नेऊ शकत नाही, या म्हणण्यात अर्थ नाही. " [16] हा तर्क बिनतोड आहे. तरीही समाजाचा, जीवनाचा संबंध नाकारणाऱ्या वाङमयसमी–

क्षेला साहित्याची ही अंगभूत शक्ती माहितच नाही की काय ? ती ते अमान्य मात्र करतात किंवा डोळेझाक तरी करतात.

जीवनमूल्य

साऱ्या जगातले पुरोगामी वाङमय आज विद्रोहक्रांतीच्या एकाच लाटेवर आरूढ झालेले दिसते. ते काही ना काही ध्येयवत्ता, स्वप्नशीलता, कृतीप्रवणता घेऊन निर्माण झाले आहे व होत आहे. आपले वाङमय मात्र रोम जळत असताना निवांत डोंगरावर बासरी वाजवीत नीरोच्या सूरकठोर वादनासारखे आजही कलेचा तो जुनाच सूर आळवीत बसले आहे. हे जीवनापासून पलायन नव्हे तर काय? सामाजिक संघर्ष, दुःख कल्लोळापासून, प्रत्यक्ष जीवनसंग्रामापासून माणसांच्या जीवनाच्या साहित्याने असे अलिप्त राहावे काय ? मानवी हृदय असलेले कोणतेही कलावंत मन समाज–घटितांपासून अलिप्त राहू शकत नाही. त्याला सामान्यापेक्षा अधिक पाहता येते तो डोळस असतो, संवेदनशील असतो. समाजजीवनात घडणारे जुलूम-अन्याय पाहून तो अस्वस्थ होतोच आणि त्याचे साहित्य मग कृतीशिलतेची भावनिक वा वैचारिक पातळीवर आणि विद्रोहाची प्रेरणा देते. आजच्या दलित वाङमयाचे बीज हीच प्रेरणाशक्ती घेऊन अंकुरले आहे. म्हणून त्याला समाजमूल्य, जीवनाचे मूल्य प्राप्त झाले आहे. ते एक जीवनमूल्यच आहे.

हे समाज जीवनमूल्य दुर्लक्षिल्यामुळे पारंपारिक मराठी साहित्याला येथील दलित पीडित बहुजनजीवनाला गती देता आली नाही. उलट त्या जीवनाची कलावाद्यांशी हातमिळवणी केल्याप्रमाणे समाजबाह्य, वाङमयबाह्य, उपेक्षित व आविष्कारवंचितच ठेवण्यात आले. असे जीवनाजीवनात भेदप्रपंच मांडणारे परंपरावादी मराठी साहित्य हे समाज,जीवनभेदाचे, माणूसभेदाचे वाङमय ठरले आहे. समाजजीवनातील हे भेदाभेद तोडू पाहणाऱ्या दलित साहित्याच्या विद्रोही प्रकृतीच्या आणि वेदनानुभव, प्रवृत्ती-जाणिवा व आशयप्रत्ययाच्या निराळेपणामुळे त्याचे मूल्य कलेच्या ठरीव साचाच्या निकषांनी मोजता येणारे नाही. " दलित साहित्याला रूढ समीक्षा मान्य नाही. कारण अभिव्यक्ती ही त्याचा अंतःकोष आहे. म्हणून रूपवादी, कलावादी समीक्षा अव्हेरिली

पाहिजे. दलित साहित्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहिरनामा आहे." [17] असे हे स्वतंत्र प्रवृत्तीचे व मनोधर्माचे साहित्य म्हणून त्याच्या समीक्षेचे मूल्य–निकषही निराळे आणि स्वतंत्रच असले पाहिजे, असे दलित लेखकाला वाटते.

कलात्मकता आणि प्रचारात्मकता

बांधिलकी असलेले साहित्य नाही म्हटले तरी प्रचारकी असते. ज्ञानेश्वर–रामदासांचे, चोखोबा–तुकोबांचे काव्य काय, किंवा माटचांचे गोखल्यांचे कथासाहित्य काय-सगळे त्यांच्या त्यांच्या काळाच्या सामाजिक बांधिलकीतून आलेले आणि काही तत्त्वमूल्यांच्या प्रचारासाठी झटणारे प्रचारात्मक साहित्य आहे, तरीही 'ज्ञानेश्वरी' ला कलात्मकतेचे उच्च परिणाम लाभलेले आहे. तेव्हा प्रचारी साहित्य कलात्मक नसते, असे नाही. " अशी कलाकृती कलात्मकही असते. वास्तविक असा वास्तववादी जीवन दृष्टिकोण व्यक्त करणाऱ्या ललित वाङमयाला कलेच्या मर्यादा कशा काय पडू शकतात ? श्रेष्ठ दर्जाच्या वाङमयीन कलाकृतीची कसोटी लावताना ती जिवंत, रसरशीत अनुभूती असली पाहिजे, तिला वास्तवतेचा आधार पाहिजे. " [18] अशी वास्तव जीवनाचा विचार मांडण्यासाठी जन्मास आलेली कलाकृतीही उत्कट, सच्ची, जिवंत रसरशीत असली तर ती कलात्मकच असते. आणि श्रेष्ठही असू शकते.

" दलित साहित्याने समीक्षाभिमुख राहण्यापेक्षा जीवनाभिमुख राहणे त्याच्या निकोप वाढीस आवश्यक आहे. शेवटी साहित्यच समीक्षेला परिवर्तनाचे आव्हान देत असते. " [19] हे मूलतत्त्व कोणीही नाकारू शकत नाही. दलित सहित्याने आकृतिवादी कलासौंदर्यवादी समीक्षेला हे आव्हान दिलेच आहे. तिच्या सौंदर्याच्या कृत्रिम व कृतक संकल्पना आणि जुनाट वाङमयीन मूल्ये आता मोडीत काढली जावी, असे दलित साहित्याला वाटते.

दलित साहित्याची ताकद काय आहे ? या साहित्यात विशेषत्वाने आढळणारी आणि प्रस्थापित कलावादी वाङमयात अपवादभूत असलेली वेदनानुभुतींची तीव्रता, अनुभवसमृद्धता, आशयसंपन्नता,

जगण्यातील उत्कटता, दुःख प्रक्षोभाची प्रखरता, माणुसकीची तळमळ, मैत्री–प्रेम–करुणा, आदी मानवी जीवनाच्या रूपांचा प्रखर अविष्कार हीच त्याची खरी शक्ती होय, हे जग बदलण्याची आणि जीवन सुंदरपणे जगण्याची प्रेरणा देणाऱ्या दलित साहित्याला सामाजिक आशयमूल्याचे व सामाजिक जाणीव मूल्याचे सृजनसुंदर परिमाण लाभलेले आहे. ही सारी सामाजिक जाणीव आणि परिवर्तनाचे नव–निर्माणमूल्य हीच दलित कलाकृतीची सौंदर्यदृष्टी होय आणि हेच तिचे खरे कला, सौंदर्यमूल्यही आहे.

परंतु या साऱ्या आविष्करणासाठी कटिबद्ध असलेले दलित वाङ्मय हे प्रस्थापित कलावाद्यांच्या एकसाची एकमापी (अलीकडे मर्ढेकरी मापाच्या–) कलाकारी दृष्टीतून अपुरे–उणे नाहीतर केवळ प्रचारी आणि अकलात्मक होत असेल, तर त्याला तसे ठरविणारी प्रचलित ' पंचविघ्नी ' समीक्षामूल्ये खरोखर समाजद्रोही, अक्षरद्रोही आणि समाजसृजनाला विघातकच आहेत, असे दलित–दृष्टीला वाटल्यास नवल नाही. म्हणूनच सांस्कृतिक–सामाजिक जीवनमूल्यांना पायदळी तुडवून किंवा त्यांचा आधार न घेता नुसत्या ' कलेकरिता कलावादी ' मूल्यांचाच बडेजाव मिरविणाऱ्या प्रस्थापित वाङ्मयसमीक्षेची दलित लेखकाला बूज राखण्याचे कारण नाही.

कारण समाज, जीवनभूमी हीच दलित कविताकथेच्या उपज-वाढीची प्राणवत् जागा आहे. दलित जीवन हा काव्याचा ज्वलंत विषय आहे, नव्हे ते एकप्रकारचं काव्यच आहे. त्यांच्या कथाकवितेत धावणारे जीवन–वास्तव असते. कलावादी समीक्षेने ठरविलेल्या साच्याप्रमाणे जीवन कधीच साचेबंद नसते. म्हणून त्या साच्याप्रमाणे साहित्य-कृती घडत नसते. तिची जीवनाशीच सांगड असावी लागते. दलित प्रतिभेला कलेसाठी राबावे लागत नाही, तर ती कलाच प्रतिभेचा हात धरून जीवनाबरोबर धावत येते. तेव्हा नुसत्या बाह्य कलात्मक सौंदर्याच्या पाठीस लागून दलित लेखक जीवनाच्या आशय–अनुभवार्थामध्ये बिघाड आणीत नाही. जीवनाच्या वास्तव रूपांची मोडतोड करून आपल्या कलेला तो कृत्रिम करीत नाही. ती मोडतोड

तो प्रस्थापित कलामूल्यांच्या आणि स्थितीशील वाङमयाच्या चौकटीची करतो. मनुष्य जीवनाची विद्रूपे, दुःखे मांडत असताना पूर्वसुरींच्या कलेच्या कुरुपांना, संकेतांना तो उधळतो. शब्द-भाषा-संकेत व त्यातील छुपा भावार्थ, समाजहिताला व त्याला हानीकारक असलेल्या मूल्य-जाणीवा, विचार–संकल्पना, जुने संकेतादर्श व संचिते आदी निषिद्ध मानून, मोडून तोडून त्याऐवजी विज्ञाननिष्ठ पुरोगामित्त्वाच्या नव्या युगसंकल्पना, नव्या जीवनजाणिवा, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य-समता-बंधुता ही समाजमूल्ये–राष्ट्रमूल्ये आपल्या नव्या वाङमयीन रूपात मांडण्याचा प्रयत्न करतो. तसेच भाषा, शब्दांची नवनवी रूपेसुद्धा शोधण्याचा दलित साहित्यिक एकाचवेळी प्रयत्न करतो.

तात्पर्य हे की, जीवन सोडून केलेली किंवा दलित जीवनासंबंधी ग्रहदूषित वा तुष्टा दृष्टिकोण ठेवून अथवा कानाडोळा करून वरवरून केलेली आतापर्यंतची ' कलामयी ' वाङमयीन चर्चाच दलित साहित्याने संशयास्पद ठरविली आहे. शेवटी समाज जीवनाचे प्रतिबिंब असलेले दलित वाङमय सामाजिक परिवर्तनाच्या मूल्याला महत्त्व देते. म्हणून ते प्रस्थापित साहित्य व समीक्षेलाही साचेबद्ध वा स्थिर राहू देत नाही. तिच्या बदलण्याची अपेक्षा करते. बदलत्या जीवनमूल्यांच्या अविष्कारा-नुसार कलासौंदर्यवादी, रूपवादी मराठी समीक्षेलाही नव्या जीवनाच्या सौंदर्यमूल्यांच्या संदर्भात बदलावे लागते. काळाची गरज ओळखून आणि मराठीचे अंतर्बाह्य क्षेत्र–हृदयव्यापक नि समृद्ध व्हावे म्हणूनही तिने आता बदललेच पाहिजे.

संदर्भ

१. पु. ल. देशपांडे ' दलित साहित्य : एक अभ्यास ' (सं. अर्जून डांगळे) (लेखसंग्रह) मधून पृ. १५९
२. प्रभाकर मांडे ' दलित साहित्याचे निराळेपण (स्वकृती) पृ. १२.
३. बी. सी. मर्ढेकर ' साहित्य आणि सौंदर्य ' दि. अं. चा ७६ चा ' निकाय ' (उद्धृत) पृ. ४३.
४. प्रभाकर मांडे ' द. सा. चे. नि. ' पृ. १३.
५. शरच्चंद्र मुक्तिबोध ' युगांतर ' एप्रिल ७८(द. सा. विशेषांक)पृ. ३७-३८
६. यशवंत मनोहर ' दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप ' (स्वकृती) पृ. १२६

७. रा. ग. जाधव ' कलावादाची फलश्रुती ' (परिसंवाद) ' निकाय ' दि. अं. ७६ (उद्धृत) पृ. ६१–६२.
८. शरच्चंद्र मुक्तिबोध ' अस्मितादर्श ' दि. अं. ७७, (स. गं. पानतावणे) (उद्धृत) पृ. ४३.
९. यशवंत मनोहर ' द. सा. सि. आणि स्व. ' पृ. ७८.
१०. विद्याधर पुंडलिक ' मागोवा ' दि. अं. ७३ (उद्धृत) पृ. ९१.
११. शंकर पाटील ' वीणा ' ऑगस्ट ६० (उद्धृत)
१२. शरच्चंद्र मुक्तिबोध ' दलित साहित्य–एक विचार ' (लेख) ' अस्मितादर्श ' दि. अं. ७१ (उद्धृत) पृ. ५.
१३. वा. ल. कुळकर्णी ' दलित साहित्य प्रेरणा आणि प्रवृत्ती ' लेखक शंकरराव खरात (उद्धृत) पृ. १९८.
१४. भाई माधवराव बागल ' अस्मितादर्श ' दि. अं. ७७ (उद्धृत) पृ. २७–२८
१५. त्र्यं. वि. सरदेशमुख उक्त (उद्धृत) पृ. ९
१६. यशवंत मनोहर ' द. सा. सि. आणि स्व. ' पृ. १२६.
१७. गंगाधर पानतावणे ' अस्मितादर्श ' ऑ. नो. डि. ७४ पृ. २१.
१८. शंकरराव खरात ' दलित साहित्य प्रेरणा आणि प्रवृत्ती ' पृ. १६७–६८.
१९. म. भि. चिटणीस ' अस्मितादर्श ' - जा. फे. मा. ७४ अस्मि. मेळावा उद्घाटकीय भाषणातून.

o o o

दलित साहित्य : सौंदर्यदृष्टी-कलात्मकता

दलित साहित्य हे दलित जीवनाचे साहित्य आहे. दलिताला जीवनात व जगण्यात अर्थ वाटतो, म्हणून तो एका जिद्दीने जीवनसंघर्षाला सामोरे जातो. त्याची ही संघर्षशील बंडखोर वृत्ती दलित साहित्यातून अविष्कृत होते. ती विरोधत्वातून पल्लवीत होत असल्याचे दिसते. जीवनात त्याला परिवर्तन हवे आहे. जगात व जीवनात परिवर्तन करू इच्छिणारी मने बंडखोरच असतात. त्याची साहित्यातील बंडखोरीही म्हणून क्रांतिप्रेरक असते. क्रांतिकारी दलित वाङ्मयवृत्तीने आपल्या बंडखोरपणामुळे प्रस्थापित मराठी साहित्याचे संकेतादर्शच झुगारले नाहीत, तर रूढ रूपवादी कलावादी समीक्षामूल्यांनाही बाजूला सारून आपला स्वतंत्र, मानवतावादी, अविष्कार घडविला. आजच्या समाजाभिमुख व जीवननिष्ठ वाङ्मयप्रवाहाशी संवादी असणार असलेल्या समीक्षामूल्यांची दलित साहित्याने गरज निर्माण केली. हे

त्याच्या प्रखरतम सामाजिक जाणिवेतून, त्याच्या शून्यवाद, नैराश्यवाद व विफलतेऐवजी मनुष्यजीवनावरील उत्कट श्रद्धा–प्रेमातून घडले आहे. दलितत्वाला मातीआड करून माणूसपणाचे व सन्मानाचे सुंदर जीवन जगण्याच्या प्रेरणा–उर्मीतून घडवलेली, परिवर्तनाची मागणी करणारी दलित अभिव्यक्ती इथे बंडखोरच ठरते.

इथे बंडखोर वृत्तीच्या दलित वाङ्मयीन दृष्टीमधील–नवनिर्माणाची आणि सुंदर जीवनाची जाणीव अंतरंगाने सौंदर्यक्षम असलेल्या साहित्याला जन्म घालीत असते. म्हणूनच दलित साहित्यात एकाच वेळी सामाजिक जाणीव आणि सौंदर्यदृष्टी या दोहोंचाही आढळ होतो. त्यातील जीवनजाणिवेच्या प्रत्ययानुभूतींमधून उमटणारी दलित कलाकृतीची सौंदर्यात्मक कलात्मकता संशोधत असताना किंवा त्याचवेळी दलित साहित्यिकाच्या मनोभूमिकेचाही वेध समीक्षकाने घ्यावा लागतो. असा वेध मराठी समीक्षकाने घेतला असता तर दलित लेखकाच्या व्यक्तित्वाशी निगडित दलित दृष्टिकोणाच्या आणि दलित (सामाजिक) जाणिवेच्या रूपसिद्धीचे कलात्मक वाङ्मयीन स्वरूप आणि त्यातील सौंदर्यदृष्टी यांचा त्यास साकल्याने बोध करून घेता आला असता किंवा घेता येण्यासारखे होते.

परंतु मराठी समीक्षकांची कलासौंदर्यवादी दृष्टी दलित जीवनाशी अनभिज्ञ कदाचित नसेल, पण ती त्या जीवनाच्या अभिव्यक्तीच्या अंगापासून जाणून न जाणून दूरच राहिल्यामुळे दलित आविष्काराचे तिने मनापासून स्वागत केलेले दिसत नाही. त्याचे कारण एकतर मध्यमवर्गीय मनोरंजनाच्या त्यांच्या उच्चस्तरीय अभिरुचीमुळे या एकदम वेगळ्या प्रेरणा–प्रवृत्तीच्या व वेगळ्या जीवनाशयाच्या अंतःकोषात ते शिरू शकले नाहीत. किंवा त्यातील नव्या अनुभव-आशयाचे सुसाट वादळी स्वरूप पाहून ते दिङ्मूढ होऊन राहिले असावेत. दुसरे म्हणजे मराठी समीक्षक मध्यमवर्गीय जीवनमूल्यांनी व जाणिवांनी घडलेले–वेढलेले असल्यामुळे साहजिकच ते वाङ्मयीन अविष्काराच्या प्रचलित तंत्र-आकलनाच्या पलीकडे जाऊ शकले नाहीत. अर्थातच दलित कलाकृतीचा तिच्या आंतरपदरांसह त्यांना मूल्यवेध घेता आला नाही.

नामदेव ढसाळांच्या ' गोलपिठा ' पासून ' उत्थानगुंफा ' (यशवंत मनोहर), ' जुगलबंदी ' (केशव मेश्राम)– पर्यंतच्या दलित काव्य संग्रहांनी मराठीतील काव्यपरंपरेच्या जाणिवेला, संकेतांना एक जबरदस्त छेद दिला आहे. दलित काव्याप्रमाणेच 'सूड' , ' जेव्हा मी जात चोरली होती ' , ' आठवणीचे पक्षी ' , ' मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे ' , ' पोखरण ' , ' बलुतं ' , ' घोटभर पाणी ' , ' उद्रेक ' इत्यादी दलित कलाकृतींनी मराठी वाङ्मयात जीवनजाणिवा, सामाजिक आशय, भाषारूपे व त्यांची कलात्मक पृथगात्म शैली वा रचनाविशेष इत्यादी बाबतीत नवी व मोलाची भर टाकली आहे. ही सारी अभिव्यक्ती प्रस्थापित मराठीला नवी आहे. त्यामुळेच पारंपारिक समिक्षेच्या कला–निकषांनी दलित वाङ्मयाला आस्वादिता येणार नाही.

व्यक्तिगत अनुभवातून होणाऱ्या सामूहिक जाणिवेचे स्पंदन दलित कथा–काव्यातून प्रभावीपणे व प्रखरपणे व्यक्त होते, दुसऱ्या शब्दात, दलित काव्य हे जसे व्यक्तित्वनिष्ठ संवेदनानुभूतीचे आविष्करण असते तसेच व त्याचवेळी ते मुख्यतः सामाजिक जाणिवेने ओतप्रोत एका समूहमनाचे विद्रोहयुक्त आणि त्याच्या यातनावेदनांचे करुणसुंदर ' कोरस ' असते. त्यातील सूर हा सुगम संगीतासारखा सहज कलानंद देणारा नसतो, तर निग्रोंच्या ' जाझ ' संगीतासारखा रसिक मनाला झपाटणारा अफाटसुरी असतो. म्हणूनच दलित कलाकृतीला दलित जाणिवेतून पहिल्यांदा अभ्यासल्याशिवाय आपल्या समीक्षकांना दलित साहित्याची खरी आंतरपोत आकळणार नाही.

" कलाकृतीची मूळ प्रकृतीच आकळली नाही, तर तिच्यातील लय, अनुभवाचा घाट, आकृतिबंध, अनुभवांची प्रसरणशीलता इत्या–दींचे कसे आकलन होणार ? " 1

हा मूळ प्रश्न आहे. दलित साहित्याच्या संदर्भात तो दलित जाणिवे-तून समजून घ्यावा लागतो. पण तसे होत नसल्यामुळे इथल्या मूळ मातीतून उगवणाऱ्या या साहित्याची समीक्षा करण्याचे मग टाळले जाते. किंवा खोटच्या आडाख्याच्या तराजूत बसवून त्याला उणे वा

अपुरे तरी जोखले जाते. असे का घडते ? याचा अर्थ दलित जाणिवे-मागे उभा असलेला जो संदर्भ – म्हणजे ही समाजव्यवस्था, वर्ण–जातिव्यवस्था–तिच्यामधील अंतर्विरोध, आजचे ग्रामीण जीवनातील आर्थिक–सामाजिक पिळवणुकीचे भेसूर चित्र, एकूण भारतीय मन व संस्कृतीचा संदर्भ असतो, तो उकलून दावण्यास हे मध्यमवर्गीय पांढर-पेशी समीक्षक कचरतात. म्हणून ते दलित साहित्याची खरी समीक्षा करण्याचे टाळतात. असे म्हटले पाहिजे.

खरे तर भारतातल्या मूळ मातीचा अस्सल गंध असलेल्या या समाजसंवेद्य आणि जीवननिष्ठ वाङमयाबद्दल ही अरुची वा अनास्था दिसायला नको होती. पण आपल्या ह्या समीक्षकांवर परप्रेरित रूप-वादी आकृतिबंधाचा आणि सामाजिक संदर्भच टाळणाऱ्या केवळ कलावादी मूल्यांचा पगडा अधिक बसलेला दिसतो. अथवा इथल्या सामाजिक व समाजशास्त्रीय दृष्टिकोणाचा त्यांच्यात अभाव तरी असला पाहिजे. त्यांच्या मते वाङमयीन कलाकृती ही सामाजिक जीवनसंदर्भ असलेली असलीच पाहिजे, असे नाही. तर त्यांच्या दृष्टीने ' कलेकरिता कला ' असणारी ती कृती समाज–वर्गातील, कालातीत, स्थलकाल–परिस्थिती–निरपेक्ष म्हणजे विश्वसंदर्भ वगैरे लाभलेली असली पाहिजे. तर ती श्रेष्ठ वाङमयकृती. नाहीतर खोटी. हा आपल्या या कला-सौंदर्यवादी समीक्षकांचा आवडता समज असलेला दिसतो. त्यातूनच तो समीक्षेच्या तयार कसोटया येथील साहित्यकृतीला लावतो. " साहित्य म्हणजे काय, साहित्य वर्गविशिष्ट असते तरी काय, साहित्याचे आवाहन वर्गीय असते काय, साहित्यातील सार्वत्रिकत्व म्हणजे काय, यांसारख्या प्रश्नांची चर्चा करून दलित साहित्याच्या प्रश्नांचे प्रश्नत्वच संपुष्टात आणले जाते. . . . आजचे समाजमन दलितांचे प्रश्न जाणून घेण्यास अनुकूल नाही, असे म्हणावेसे वाटते." [2] समाजमन अनुकूल असेल वा नसेल, कलावादी समीक्षक मात्र दलित साहित्याला अनुकूल दिसत नाहीत, हे खरे. ते वरील स्वरूपाचे प्रश्न उपस्थित करतात, त्यामागे येथील जीवनविषयक सामाजिक प्रश्नांना डावलण्याच्या किंवा त्यांना धुसरता आणण्याच्या विचारानेच असावे. खरे तर

साहित्यातून प्रकट होणारे दुःख, क्रोध, चीड, प्रेम, करूणा, मैत्री आदी मानवी विकार हे सार्वत्रिक स्वरूपाचे म्हणजेच स्थलकालनिरपेक्ष आणि म्हणून वैश्विक असतात.

या वैश्विक विकार–भावनांचा तर दलित साहित्यातून विशेष आढळ होतो व होताना आढळतो. मग त्यांचे श्रेष्ठपण वा त्यातील श्रेष्ठ मानवी मूल्य समीक्षकांनी मान्य का करू नये ? पण नाही. वाङमयीन कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाला या समीक्षकांच्या जीवन, समाज-विरहित अशा केवल कलावादी निराळ्या कसोटया आहेत आणि त्यांच्यात माणूस–समाजाचे साहित्यप्रसृत मानवी मूल्य मात्र बसत नाही, यात आश्चर्य नाही. कारण मानवी समाज, जीवनविषयक साहित्याचा विचारच त्यांच्या कलासौंदर्यवादामध्ये निराळा पडतो.

कलावादी साहित्याच्या विरुद्ध संदर्भात दलित साहित्य हे जीवनाचे साहित्य असल्याने जीवन वाङमयीन कला यांचा अन्योन्य संबंध आपल्याला लक्षात घ्यावा लागतो. त्यातून तात्पर्यतः पुढील स्वरूपाचे ठळक निष्कर्ष आपल्याला मांडता येतील.

–दलित साहित्य सामाजिक बांधिलकी असलेले विद्रोही वाङमय (Literature of Protest) आहे आणि ते मानवतावादी आहे. मानवतेच्या पातळीवर वावरू शकणाऱ्या कलेचे भान दलित कलावंताला आहे. म्हणून दलित ललित वाङमय हे कलात्मक वाङमय आहे– असू शकते. पण ते कलावादी वाङमय असू शकत नाही. होऊ शकत नाही. यातील भेद मराठी समीक्षकांनी लक्षात घेतला पाहिजे.

– जीवनसन्मुख आणि 'माणूस' केंद्रवर्ती असलेले दलित वाङमय म्हणून व्यक्तिकेन्द्री वा व्यक्तिवादी नाही. कारण "मानवी जीवनाच्या आकलनात व्यक्ती ही केंद्रस्थानी राहत नसून 'सामाजिक मानव' तिथे असतो. ह्या आकलनात त्याची भौतिक अभिव्यक्ती कितीही सीमित असली तरी मानवी निष्ठांचे, मूल्यांचे तिला एक अभंग भान असते."[3] हे भानच व्यापक व व्यामिश्र स्वरूपाच्या वाङमयाला जन्म देत असते. आणि ते कलात्मक असते. त्याशिवाय साहित्याची व्यापकता सिद्ध होत नसते. व्यापक पातळीवरून आबाल-

वृद्धांना आवाहन करणारे कलात्मक साहित्य हे सामाजिक जाणिवेचे व जीवनाचेच एक ज्वलंत प्रत्यंतर असते. सामाजिक जीवनजाणिवेतून श्रेष्ठ वाङमय निर्माण होण्याची शक्यता व संभवनीयता नाकारता येत नाही.

–साहित्याचा एकमेव विषय असलेल्या मानवी जीवनाच्या नव्या संकल्पनांशी, अनुभूती–आशयाशी आणि त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपाशी आजची समीक्षा संवादी राहावी. विसंवाद साहित्यात विपर्यास आणि जीवनात विभाजन (विषमता) निर्माण करतो. किंवा आधीचे कायम तरी ठेवतो. दुसऱ्या अर्थाने, कलावादी समीक्षेचे जीवनसन्मुख नसलेले स्वरूप समाजविन्मुखही असल्यामुळे तिच्यातील ' कलेकरिता कला ' वाद आणि जीवननिष्ठ साहित्यातील अनुभूती–संवेदनात्मक ' आशयवाद ' यातील भेद ' समाजातील श्रेष्ठ–कनिष्ठ वर्गाच्या फारकतीचे वैचारिक प्रतिबिंब ठरले आहे.

–म्हणूनच वाङमयाचा 'कलेकरिता कला' या दृष्टीतून विचार न होता त्याचा जीवनासाठी कला– या दृष्टीतून विचार व्हावा, असे दलित प्रवृत्तीला वाटते. वाङमयकला ही व्यक्तीच्या समाजसंबंधित्वातून व जीवनातूनच अवतरते. जीवन सोडून ती निर्माण होऊच शकत नाही. " प्रत्यक्ष कला–निर्मितीच्या प्रक्रियेत व कलाकृतीत अनुभव आणि कलारूपाचे अद्वैत झालेले असते. अनुभवाच्या संदर्भात कलारूपाचा व कलारूपाच्या संदर्भात अनुभवाचा विचार तेथे अपरिहार्य ठरतो." [4] परंतु कलेत जीवनाचा हा अनुभव लक्षात न घेता कलावादी मानवी जीवनाचे व जगण्याचे वर्गविशिष्ट संस्कार देणाऱ्या समाजसंस्कृतीचे संदर्भ टाळतात. ते असे टाळले जाऊ नयेत – असे दलित साहित्याला वाटते.

– सामाजिक जाणिवेतून जीवनवास्तवाचा जिवंत वेध घेणारे म्हणून जीवनाची मूल्ये ही दलित साहित्याची मूल्ये ठरली आहेत. ती जीवनानुभवातून आकारताना कलारूप घेतात. त्यांना या जीवनाच्या वेदनासंवेदनांचे आणि अनुभूति–प्रत्ययांचे सौंदर्य प्राप्त होते आणि दलित कलाकृती सिद्ध होते. " अनुभूती म्हणजे प्रत्यय. प्रत्यय म्हणजेच

आशय. त्याचाच आविष्कार म्हणजे कला होय. त्या आशयाचा उत्कट प्रत्यय म्हणजे सौंदर्यप्रत्यय होय. हेच सौंदर्य दलित कलेचा अंतिम निकष ठरते." कलेच्या अंतरंगाचे हे सौंदर्य म्हणजेच दलित कृतीची कलात्मकता होय.

– दलित साहित्याला जीवनाचे सौंदर्य लाभले आहे, याचा अर्थ त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपात ते आहे. दलित अभिव्यक्तीने प्रस्थापित कलामूल्ये – ती जीवनाच्या आविष्कृतीला न्याय न देणारी, गौणत्व देणारी, एकांगी म्हणून त्यागिली. याचे कारण दलित अभिव्यक्तीचे स्वरूप सर्वथा जीवनवादी, जीवनगामी,– जीवनसंवादी आहे, हे होय. त्यामुळे कलेच्या रचना, घाट, बांधणी व मांडणी यांच्या लयबद्ध व कलापूर्ण बाह्य रूपाला अथवा केवळ रचनासौंदर्याला दलित अभिव्यक्ती महत्त्व देत नसून घटनेच्या जीवनाभूतीपूर्ण आशयघनतेला, त्यातील भावगंध रसोत्कट सौंदर्यरूपाला महत्त्व देते. कवटाळते.

–हे जीवननिष्ठ व समाजाभिमुख वाङमय असल्याने समाजपरिवर्तनाचे मूल्य घोषित करते. कोणत्याही गतिवादी परिवर्तनेच्छू साहित्याला क्रांतीचे संदर्भ असतात. क्रांतीच्या प्रेरणेत जीवनसौंदर्याचे सर्व घाट अभिव्यक्तीमधून जीवनाशयाशी बांधलेले असतात. दलित वाङमयाच्या बाबतीत हेच दिसते. त्यात हे जीवन सुंदरपणे जगण्याची प्रेरणा व सौंदर्याकांक्षा असलेली आढळते. म्हणूनच हे साहित्य कलेच्या बाह्य रूपापेक्षा तिच्या प्रकृतीला जपते. महत्त्व देते. प्रकृतीचे स्वभावसौंदर्य मांडणे, जोपासणे हीच दलित साहित्याची खरी सौंदर्यजाणीव होय.

–सामाजिक जाणिवांचे सामर्थ्य नि जीवनाचे सौंदर्यमूल्य लाभलेले दलित साहित्य हे कलात्मक साहित्यच होय. अर्थात, कलेचे प्रस्थापित सन्मान्य मानदंड लावून दलित कलाकृतीचे मूल्यमापन करता येणार नाही. तर जीवनाचा आशय आणि अभिव्यक्ती यांचे नक्की नाते ओळखून या कलाकृतीचा अन्वयार्थ लावणारे नवे निकष शोधून समीक्षेच्या जीवनवादी कसोट्यांवर तिच्या गुणदोषांची चर्चा करता येईल. म्हणजेही ' साहित्यच समीक्षेला परिवर्तनाचे आव्हान

देत असते ' हे मान्य करून दलित कलाकृतीला समीक्षेच्या तयार साच्यात न बसविता कलाकृतीप्रमाणे अथवा तिला लागू होतील अशी कलामूल्ये वा नवे निकष शोधून काढावे लागतील. (तेही लवचिक वा परिवर्तनीय असतील). कारण समीक्षेप्रमाणे कलाकृती घडत नसते– कलाकृतीप्रमाणे समीक्षामूल्ये निर्धारावी लागतील.

थोडक्यात, मराठी दलित साहित्याचा प्रवाह पारंपारिक मराठी वाङमयाहून प्रेरणा–प्रवृत्तीने व प्रकृतीने, आशय–विषयाने, उद्दिष्ट-दृष्टिकोनाने आणि जाणिवेने मुळातच वेगळा व स्वतंत्र प्रवाह आहे. त्यामुळेच त्याच्या नव्या स्वरूपाचे आकलन आजच्या युगसाहित्याचे पडसाद टिपणाऱ्या जीवननिष्ठ समीक्षामूल्यांनीच करावे लागेल. आजचे समाजजीवनच परिवर्तनशील आहे. अर्थात या जीवनाचे दर्शन असलेल्या प्रचलित वाङमयातील जाणिवा, दृष्टिकोण, उद्दिष्टे व त्यांची एकूण स्वरूपमूल्ये आज बदलत आहेत. तेव्हा वाङमयीन समीक्षामूल्येही स्थिर असून चालणार नाही, असू नयेत, असे दलित धारेला वाटते.

दलित साहित्यातील अनुभव–आशय हा क्रांतिगर्भ असल्याने त्यामध्ये सृजनाचे, परिवर्तनाचे, समाजसर्जनाचे सामर्थ्य साकळलेले दिसते. ही परिवर्तनकारी क्रांतिवत्ता अर्थात साहित्यभूत कलात्मकता घेऊन येत असते, आणि तेच दलित कलाकृतीचे ' कला–सौंदर्य ' ठरते. शेवटी ते दलित जीवनाशी निगडित जीवनाचे सौंदर्यमूलच असते. जीवनमूल्यच असते.

संदर्भ

१. अर्जून डांगळे (संपादित) " दलित साहित्य एक अभ्यास "
(लेखसं. – प्र. आ.) ... पृ २१–२२
२. रा. ग. जाधव– ' निळी पहाट ' (प्र. आ.) ... ,, २१–२२
३. विश्वास कानडे– ' युगवाणी ' – दि. अं. १९७९ ... पृ. ९४
४. शरच्चंद्र मुक्तिबोध– ' अस्मितादर्श ' – ... दि. अं. १९७७ ... ,,, ४२
५. यशवंत मनोहर- ' दलित साहित्य : सिद्धांत .. ,,
आणि स्वरूप (प्र. आ) ... ,, १२५

० ० ०

दलित चळवळ : व्यापकता आणि मर्यादा

एखाद्या सामाजिक चळवळीचे अंत:स्वरूप ठरविणे, हे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक (धर्म वाङ्मय) परिस्थितीच्या सारासार आकलनावर अवलंबून असते. परिस्थितीच्या निकषातून निर्माण झालेल्या चळवळीला जी काही भूमिका असते आणि तिची व्यापकता असो, त्याचप्रमाणे तिला काही मर्यादाही आवश्यक असतात. सामाजिक बांधिलकीचा प्रश्न त्या मर्यादान्तर्गत चळवळीच्या स्वरूपाच्या अनुषंगाने उपस्थित होतो आणि तो सोडविलाही जातो. या सामाजिक बांधिलकी-मधून आविष्कृत सर्वंकष पुरोगामी मूल्यांच्या बैठकीवर उभारलेली डॉ. आंबेडकर-प्रणित आजची सामाजिक व वाङ्मयीन क्षेत्रातील दलित चळवळ आज चर्चेचा वादविषय ठरली आहे. या चर्चेचे स्वरूप असे असू शकेल.

" आंबेडकरवाद म्हणजे काय ? 'आंबेडकर' नावाचा वाद 'वाद' म्हणून अखेर काय आहे ? "

' आंबेडकर ' हे एक सामाजिक व्यक्तिमत्व म्हणून सिद्ध झालेले असेल तर आंबेडकरी विचारतत्त्व म्हणजेच आंबेडकरवाद हा निश्चितच तयारही असेल. पण आंबेडकरवाद अस्तित्वात असूनच चालत नाही, तर तो संपूर्ण सामाजिक अस्तित्वाला हसते, उत्फुल्ल व तेजस्वी करायला, एका संपूर्ण समाज जीवनाला प्रतिष्ठित व सन्मानित करायला क्रांतीप्रवण सिद्ध झाला आणि होत असेल, तर मुळात जे आहे–त्याला सिद्ध करण्याची वास्तविक गरज राहत नाही, परंतु वरील प्रश्नाच्या अनुरोखाने आंबेडकरवाद 'आहे–नाही' ची भूमिका किंवा तो वाद वादातीत आहे, अशी शंका घेतलेल्या अथवा तसे आपले मत बनविलेल्या मनात– ' तुम्ही आंबेडकर–आंबेडकरवाद काय लावला, तो म्हणजे तरी काय ? ' असा प्रश्न जेव्हा येतो – तोही एखाद्वेळी आंबेडकरी चळवळकर्त्या अनुयायांच्या (?) द्वारे तेव्हा सखेद आश्चर्य झाल्यावाचून राहत नाही.

ते म्हणणे असे, की– ' महात्मा फुल्यांपासूनच दलितोद्धाराच्या चळवळीला सुरुवात झाली. त्याही आधी फ्रेंच व रशियन क्रांती झाली. त्या क्रांत्यांमधून नव्या युग–मूल्यांचे प्रथमतःच प्रस्फुरण झाले. भारतात ब्रिटिशांनी त्या समता–न्याय–स्वातंत्र्यादी मूल्यांचे प्रसृतीकरण केले. त्यानंतर इथे राजाराम मोहन रॉय, शाहूमहाराज झाले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, सावरकर, चंदावरकर आदि समाजसुधारक पुढे आले. तेव्हापासून येथे समाजसुधारणेला, दलितोद्धाराच्या कार्याला सुरुवात झाली. एक लाट आली – ' त्यावर माझे म्हणणे – " समता–स्वातंत्र्य बंधुभाव–न्यायाची चळवळ तर इथे पुष्कळच आधी ख्रिस्तपूर्व पाचशेत बुद्धाने प्रक्षेपित केली, मग ? "

" हो, म्हणजे मी आंबेडकरवादाबद्दल त्यांच्या आधीच्या सामाजिक सुधारणेबद्दल बोलत होतो. ब्रिटिशांनी येथील शूद्र–अस्पृश्यांसाठी कायदे केले. शिक्षणात त्यांचा प्रवेश तेव्हापासून झाला. सतीची चाल त्यामुळे बंद पडली. विधवा विवाहाचे, बाल विवाह बंदीचे कायदे त्यांनीच अंमलात आणले. "

" होय. हे खरेच. मग ? " मी.

" मी हे म्हणतो, की बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक व त्यानंतर राजकीय क्षेत्रात प्रवेश झाला. त्यांनी दलित अस्पृश्यांसाठी, महारांसाठी फार काही केले, पण ह्या सगळ्या पार्श्वभूमीवरच त्यांना तसे करता आले. "

" कोणत्याही कार्याला कारण असते. ते कारण दृष्टिपथात नसेल किंवा अदृश्य रूपात असेल तर प्रथम शोधून काढावे लागते, म्हणजे त्यामागे काही एक पार्श्वभूमी तर असावीच लागते. पोकळी असल्याशिवाय– बाबासाहेबांच्या वेळी तर ती पोकळी भयंकर आणि दुष्ट होती, त्यांच्यावेळच्या अन्याय, अत्याचार, अनीतीमूलक, विषमतामूलक सामाजिक परिस्थितीनेच आंबेडकरांना पेटायला लावले. आजच्या दलित चळवळीची शक्ती ठरलेला विद्रोह–नकार हा त्यांच्याच जळजळीत विचारातून–कृतीतून घेतलेली प्रेरणा नव्हे काय ? "

" होय, दलित चळवळीची मूळ प्रेरणा डॉ. आंबेडकर हे आहेत. असे असले तरी आजच्या सामाजिक, साहित्यिक व आर्थिक आघाड्यांवरील लढ्यातील विद्रोही ताकद, हे तुमचे–आमचे, दलित लेखकांचे (काही प्रस्थापित द. लेखकांची नावे घेऊन) 'Contribution' आहे. ही आपली ' उपज ' आहे.'

"हं हं. " मी " पण बाबासाहेब झाले नसते, तर कदाचित तुम्ही–आम्ही–आपण झालो असतो की नाही. म्हणजे आम्ही आज जे आहोत, ते नसतो. आपल्या सामाजिक - वाङ्मयीन शक्ती - प्रतिभेचा, वैचारिकतेचा तसेच सगळ्या साहित्यनिर्मितीचा मुख्य प्रेरणास्त्रोत एकटे आंबेडकरच आहेत, यात अतिशयोक्ती आहे, असे मला वाटत नाही. "

" नसेल, तरीपण यात भावनात्मकता अधिक आहे. "

" नाही, ही वस्तुस्थिती आहे. तुम्हाला माहीत आहे, मान्य नसेल, ती गोष्ट वेगळी. "

" तरीपण वस्तुस्थितीचा तुम्ही विपर्यास करता. ' आंबेडकर आंबेडकर ' म्हणून त्यांचे वारंवार नाव घेतल्याने काही ते मोठे होत नाहीत किंवा न घेतल्याने लहान होत नाहीत. आंबेडकर हे नाव आज जगभर होत आहे, याचा अर्थ लक्षात घ्या. याचे श्रेय- "

आंबेडकरवाद

" स्वत: आंबेडकरच होते, म्हणजे त्यांचे विचार कर्तृत्व -"

" आजच्या दलित चळवळीलाही ते आहे, आम्ही तिला जी वाढवित– व्यापक करत आहोत. त्यामागे काही पुरोगामी वृत्ती, एक जागतिक तत्त्वज्ञान उभे आहे. आपली चळवळ जगभर पसरण्याच्या दृष्टीने ते हवे आहे. उदा. मार्क्सचे तत्त्वज्ञान -"

" मुळातल्या समस्या तशाच राहून चळवळ जगभर फोफावण्याची भाषा मला काही कळत नाही." मी म्हणालो, "हो, मार्क्सचे तत्त्वज्ञान मोठे आहे. ते मुळात गरीबांसाठी - मानवतावादी आहे, म्हणून श्रेष्ठही आहे. डॉ. आंबेडकरांचेही आहे ना ? आणि ते अधिकच जहाल आहे. त्यांनी केवळ तत्त्वज्ञान दर्शन मांडले किंवा आपले विचार सैद्धांतिक स्वरूपात नुसते लिहून ठेवले नाहीत. त्यांनी जे सांगितले ते केले, किंबहुना 'आधी केले मग सांगितले,' असेच त्यांच्या जीवनकार्याचे मूल्य-मापन करताना म्हणावे लागेल आणि हे सत्य नाकारता येणार नाही."

" तुमच्या म्हणण्यात जेवढे तथ्य असेल, तेवढाच भावाभिनिवेश आहे. यातूनच आज व्यक्तिपूजेचा जन्म होऊ पाहात आहे आणि ही चळवळीला विघातक गोष्ट आहे. बाबासाहेबांनी समाजासाठी काही केलं, कृती केली, कायदे केले, त्याचे ते कार्य अस्पृश्यता निवारणा-संबंधीचे,-माणुसकीच्या हक्काचे वगैरे कायदे म्हणजे आंबेडकरवाद काय? आंबेडकरवाद नेमके कशाला म्हणायचे, याची चौकस व डोळस-पणे शहानिशा अगोदर झाली पाहिजे."

" समाजातील अन्याय, विषमता, मूल परिस्थिती पोसणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपणाचे हक्क व प्रतिष्ठा मिळवून देऊ इच्छिणाऱ्या, वर्ण-जातीय समाजव्यवस्थेला तोडून नवी समाजरचना आणि मानवतेची प्रस्थापना करू पाहाणाऱ्या आजच्या दलित चळवळीला विद्रोह-बंड-नकारादी लाभलेली प्रेरक तत्त्वे प्रसृत करणारे एकूण आंबेडकरी विचारदर्शन म्हणजे आंबेडकरवाद! थोडक्यात, आंबेडकरपूर्व दलितसमाज आणि आंबेडकरकालीन व आंबेडकरोत्तर आजचा दलित समाज, समाजाच्या ह्या दोन अवस्थांतराला कारण ठरलेले जे संपूर्ण कार्यतत्त्व, तत्त्वज्ञान किंवा एक विचारप्रणाली म्हणजे

आंबेडकरवाद होय, असे सांगता येईल. तुम्हाला काय वाटते ? "

" ते तत्त्व त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा–जीवनक्रमाचा विचार करून फिरून संगतवार मांडायला पाहिजे. ते मी करणार आहे. आंबेडकरवादाचा विचार करताना आंबेडकरांची 'विलायतेहून पत्रे' तुम्ही वाचली असतील, ते वरती ' जयभवानी ' असे लिहित होते. दैववादी, श्रद्धाळू आंबेडकर मानावे, की जोतिषावर विश्वास बाळगणारे आंबेडकर मानावे,– की नंतरचे धर्मांतर करणारे बौद्ध आंबेडकर मानावे, यापैकी कोणते आंबेडकर आपण मानावे ? " असे प्रश्न तथाकथित दलितातील काही लेखक–विचारवंतांनी उपस्थित केले होते याची मला आठवण झाली.

" बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील हे स्थित्यंतर आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीच्या बौद्धिक व मानसिक प्रक्रियेमधून होत गेलेले हे परिवर्तन आहे. ' हिंदू ' आंबेडकर सुरुवातीला ' जयभवानी ' हे त्यांच्या ' कुलदेवतेचे ' नाव लिहित होते, हे खरे आहे. ते जोतिषी भविष्यावर सुद्धा विश्वास फार ठेवत होते. (एवढेच काय, ' हिंदू ' राहण्याचा त्यांनी ज्या अर्थाने व उद्देश्याने आणि तळमळीने धर्मांतराच्या घोषणेपर्यंत (१९३५) प्रयत्न केला होता, त्याचे मर्म इथे लक्षात घ्यावे.) पण पुढे ज्यांनी साऱ्या समाजाचेच भविष्य बदलून टाकले– होत्याचे नव्हते केले, दलित समाजाला– संपूर्ण दलित जीवनालाच रूढी परंपरेच्या गडद अंधारातून काढून एका उत्क्रांत उजेडी वाटेवर आणून सोडले, अशा त्या बुद्धिवादी, परिवर्तनप्रिय, बंडखोर आंबेडकरांच्या धगधगत्या जीवनातील– त्यांच्या पूर्वायुष्यातील तो एकेक टप्पा होता." मी पुढे.

"मला कळत नाही, आंबेडकरांमधील ही उणीव दाखवून किंवा अशी छिद्रान्वेषी दृष्टी ठेवून खरा 'आंबेडकर' कुणाला कसा उमगणार आहे ? अशांना एकतर आंबेडकरवाद कळला (?) असूनही तो जाणून डावलायचे मनात असावे, किंवा त्यामागे त्यांचा निराळाच हेतू तरी असावा हे उघड होते. डॉ. आंबेडकर 'तसे' (दैववादी, भविष्यवादी) होते, तर आपण कालपर्यंत कसे होतो ? आम्हीही 'इश्य' अभंगवाले, भावश्रद्ध

कवी–लेखक अथवा नुसतेच प्रेम–कवी बिवी कोणी तरी होतो, आता आतापर्यंत त्यातून तरुण,– हा दोष कुणाचा ? हे आपले पूर्वी ' तेच ' सर्वकाही असणे– होणे, त्या त्या परिस्थितीच्या परिवर्तनशील संदर्भात साहजिकच होते. मात्र आजचा तोच एखादा दलित विद्रोही कवी ज्वालांचे निःश्वास सोडत 'देवाच्याही नरडीचा घोट घेऊ' पाहतो आणि त्या कर्मविपाकी आत्म्या परमात्म्याला सरळ फासावर देतो, तर दुसरा विद्रोही तरुण कवी आपल्या एखाद्या प्रिय दलित तरुणीच्या ओठावर विद्रोहाचाच जळजळता पाझर बघतो आणि त्याला अवतीभवती चाललेल्या सामाजिक कुचंबणेचे भान असल्यामुळे तिचे चुंबन घेण्याचीही भिती वाटते. दोघेही इथे विद्रोहाचीच गीते गातात. दलित समाज असा बदलला, बदलत आहे.

ब्रिटिशांनी इथे समाजसुधारणेचे कायदे करून भारतीय मनोभूमीत नव्या युगाचे नवे तत्त्वज्ञान ओतून भारतीय संस्कृतीची 'मूस' बदलली म्हणजे इथे नक्की काय घडवून आणले ? इथली परंपराप्रिय हिंदू मनोवृत्ती नव्या युगाच्या नव्या अस्त्रशस्त्रानिशी नि तंत्रमंत्रानिशी कितीशी बदलली ? दलित समाज (इथे काही अपवाद) मात्र नव्या तंत्रमंत्रासकट बदलत आहे, चेतत–पेटत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रकाशयुगाचे क्रांतियुगाचे भारतात अवतरण झाले. त्याचे सर्व श्रेय फ्रेंच क्रांतीला, रशियन क्रांतीला किंवा भारतातील ब्रिटीश युगाला दिले. (आणि तसे दिलेही जाते)– तर आजच्या प्रत्येक पुरोगामी संघटनेने, दलित चळवळीनेही फ्रेंचवाद, ब्रिटिशवाद नाहीतर रशियनवाद (म्ह.कम्युनिझम वा मार्क्सवाद) – हाच केवळ–आपली अस्मिता विसरून स्विकारायला पाहिजे, हे ओघानेच येते. तथापि, भारतीय परिस्थितीत हिंदूवादापुढे यातून एखाद्या तरी क्रांतिवादाने आजतवर मूळ धरले आहे काय ?

ज्या कारणामुळे बुद्धाचा बुद्धिप्रामाण्यवाद वा जडवाद अस्सल भारतीय असून व तो क्रांतदर्शी पुरोगामी वाद असूनही इथे टिकू शकला नाही, दुर्भाग्याने भारत सोडून त्याला बाकीच्या जगभर पसरावे लागले, त्याच कारणामुळे (हिंदुत्व) रशियन मार्क्सवादासारखा

जगप्रसिद्ध पुरोगामी वादसुद्धा भारतीय धर्तीवर अनेक वर्षांपासून लाख प्रयत्न करूनही इथे मुक्त श्वास घेऊ शकला नाही. बाकीचे गुणदोष काही असोत, पण सवाल त्या व ह्या अंतर्बाह्य परिस्थितीच्या फरकाचा आहे. इथल्या वेगळ्या आर्थिक प्रश्नाहूनही जगावेगळ्या असलेल्या इथल्या विशिष्ट व विक्षिप्त सामाजिक समस्येचा विचार अत्यंत प्रभावी व प्रधान ठरला आहे. सर्वांगोदर ही समस्या अत्यंत चिंतनीय व गंभीर स्वरूपाची बाब होऊन बसल्यामुळे तिच्या सोडवणुकीकरिता म्हणूनच परत एखाद्या भारतीय पुरोगामी आणि तेवढ्याच प्रबळ नि सामर्थ्यवान ठरलेल्या हिंदुवादविरोधी तत्त्वज्ञानाचा विचार व स्वीकार आपल्याला प्रथम करावा लागतो. म्हणून इथल्या परिस्थितीत फिरून बुद्धवाद पुढे येतो, आणि त्याला नव्या युगाचे कालसापेक्ष नवे आयाम देऊन पुढे आणणाऱ्या, भारतीय अस्मितेची प्राणापलिकडे जोपासना करणाऱ्या आंबेडकरवादाचे महत्त्व म्हणून इथे अनन्य ठरते.

याची कारणे–१) बुद्धवाद हा अस्सल भारतीय आहे. २) भारतीय परिस्थितीत उगवलेला, वाढलेला, त्या परिस्थितीची डोळस जाणीव ठेवणारा व देणारा हा बुद्धिप्रामाण्यवादी मूल्यविचार आहे. समता, स्वातंत्र्य करुणा-मैत्री, न्याय ही त्यांची जीवनमूल्ये आहेत. ३) ते गति, संक्रमण व परिवर्तनशील तत्त्वज्ञान आहे. ४) मार्क्सवादाच्या अपेक्षेत इथल्या परिस्थितीत आंबेडकरप्रणित बुद्धवाद भारतीय मूळ समस्येच्या वर्ण व जातीव्यवस्थेच्या निर्मूलन व निराकरणास्तव लढणारा-झटणारा पहिला व प्रभावी क्रांतिकारी वाद आहे. ५) आर्थिक समस्येचा सुद्धा एकट्या बुद्धाने सर्वप्रथम विचार मांडला आहे. एवढेच नव्हे, संघ स्थापनेतून (आदर्श म्हणून) प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवला आहे. म्हणून तो सामाजिक प्रश्नाबरोबर आर्थिक शोषणावरही एक इलाज आहे. ६) बुद्धाने सामाजिक, आर्थिक व धर्मविषयक अशा सर्वांगीण पायावर आपले आंदोलन–शूद्र-अतिशूद्र अस्पृश्य आदि बहुजन समाजातील दलित लोकांच्या सहाय्याने उभारले होते. हीन दीन, दरिद्री, दलित जनांना आपल्या पोटाशी धरणारा तो पहिला थोर महात्मा होता.

डॉ. आंबेडकरांनी स्विकारलेला हा बुद्ध आणि बुद्ध काळापासून आदळत आपटत आलेले दलित जीवनाचे एक क्रूरभीषण स्वरूप बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यभर प्रत्यक्ष जगले होते म्हणूनच त्यांनी बुद्धाचे व त्याच्या क्रांति-तत्त्वाचे या भूमीवर यशस्वीरीत्या पुन्हा प्रवर्तन केले.

डॉ. आंबेडकर क्रांतिकारी व महान बंडखोर ठरले. त्यांच्यात आंत्यतिक बंडखोरपणा होता. याचे कारण वर्ण–विषमता व जातीयतेच्या आणि अस्पृश्यतेच्या विषारी परिस्थितीचा आंत्यतिक भडिमार त्यांनी सोसला होता. बुद्ध त्यांचे बळ आणि प्रेरकशक्ती होती. महात्मा फुल्यांना त्यांनी आपला गुरू केले. मात्र म. फुल्यांपेक्षाही (अर्थात काळाची मर्यादा आहेच.) नव्या ज्ञानविज्ञानाच्या शस्त्र-शास्त्रांच्या तंत्रमंत्रासह अंगिभूत अचाट सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी अधिकच प्रगत नि पुढचे पाऊल टाकले.

आंबेडकरवाद असा संपन्न, शक्तिशाली आणि दलित जीवनाच्या सर्वांगांना स्पर्शिता असल्यामुळे दलित चळवळीशी तो एकमेव प्राणप्रिय प्रेरणा झाला असून दलितांसाठी इतर कोणत्याही वादापेक्षा तो सर्वार्थाने समर्थ–सशस्त्र–क्रांतिकारी वाद सिद्ध झाला आहे. बुद्धाच्या भौतिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असल्याने तो तेवढाच व्यापक, श्रेष्ठ नि सम्यक् मूल्यविचार आहे. बुद्धवाद अंगिकारून आंबेडकरवाद खचितच उंच झाला आहे. भारतीय परिस्थितीत आंबेडकरवाद ही काळाचीच गरज आहे

तथापि आंबेडकरी विचारांच्या डोळस आकलनावरच आंबेडकर-वादाचे मूल्य मानता येईल. त्याला आंधळे भक्त नकोच आहेत, पण अलिकडे दलित चळवळीतल्याच काहींचे 'लक्ष्य' फुटारल्यासारखे झालेले दिसते. त्यांना आंबेडकरी विचार मानायचाच नसेल तर प्रश्न अलाहिदा. पण ते जेव्हा आंबेडकरवादाला अन्यवादाच्या तराजूमध्ये 'उणा' जोखू लागत त, तेव्हा खेद होतो आंबेडकरवादाला आंधळेपणाने स्वीकारणे हे चळवळीच्या दृष्टीने चांगले नाही, म्हणजेच ते विपरीतच लक्षण असेल आणि त्याने व्यक्तिमहात्म्य जोपासण्यासारखे होईल हे खरे, पण असे सरळ–आंबेडकरवादाला समजून व समजावून सांगणे वेगळे आणि

' दलित तरुणांमधला आंधळा आंबेडकरवाद नाहीसा होत आहे, त्यांना कार्लमार्क्सची कास धराविशी वाटत आहे. ' असा स्पष्ट निर्देश करून फुटीरवृत्तीला उत्तेजन देणे वेगळे. प्रा. गं. बा. सरदार पुन्हा ' दलितांमधील डोळस तरूणांना व त्यांच्यातल्या क्रांतिकारी प्रवृत्तींना जोपासले पाहिजे व त्यांना व्यापक चळवळीत ओढले पाहिजे. ' अशी जेव्हा प्रतिज्ञा करतात, तेव्हा प्रा. सरदारांसारख्या सात्त्विक व समतोल विचारवंत–मान्यवरांच्या ह्या उद्‌गाराबद्दल कमालीचे आश्चर्य वाटते आणि त्या तथाकथित दलितांतील ' डोळस तरुणां ' बद्दल थोडे वाईट वाटून जाते. तसे म्हणजे कुणालाही कुठेही जाण्यास कुणाची कधीच हरकत नसते, धरबध नसतो, पण धरसोडपणा करून ते जेव्हा कुणाकडून कुठेतरी ओढले जातात–प्रा सरदारांच्या वरील वचनात 'आंबेडकरवाद आंधळा' म्हणून तो सोडून दलितांनी सरळ मार्क्सवादाचो 'कास'धरावी आणि मार्क्सवादी व्यापक चळवळीत (दलित चळवळीचे मग काहीही होवो !) सामील व्हावे, हाच अर्थ तर नसावा !

सर्व वर्ण-जातीमध्ये कमी-अधिक प्रमाणात दारिद्र्य असते, आहे व ते राहणार आहे. परंतु जातीभेदाची भावना ही एकेका जातीचो जतन करून ठेवलेली बहुमोल 'ठेव' आहे तिला पहिल्यांदा नेस्तनाबूत करणे जरूरीचे आहे. कारण वर्ण-जातीवाद हा आपल्या सामाजिक उत्थानाचा पहिला व खरा शत्रू आहे. वर्गवाद ही इथे नक्कीच पुढची ' स्टेप ' आहे. वैदिक काळापासून भारतात वर्गव्यवस्थेच्या ऐवजी मूळापासून वर्ण-जातीव्यवस्थाच चालत आली, हा इतिहास आहे. यास्तव जिथे आज जातीयवादच सरला संपला नाही, तिथे वर्गवादावर लढा उभारणे, हा प्रकार साफ सोडून भूई धोपटण्यासारखा वाटतो.

याचा अर्थ समाजातील दारिद्र्याचा व आर्थिक पिळवणुकीच्या दुष्ट दृश्य उत्पातांचा गौरव होतो, असे नाही. अर्थातच मूळ मार्क्सवादाशी कुठल्याही माणसाचे वैर असण्याचे (किंवा मार्क्सवाद ' ऐकून पोटात मळमळण्याचे) कारण नाही. वैर इथल्या आर्थिक व्यवस्थेच्या अनिष्ट अपायकारक क्रूर यत्रणेशी आहे, पण ती यंत्रणा इथे वर्गवादी (केवळ गरीब–श्रीमंत भेदावर) ऐवजी वर्ण-जातीयवादी

वृत्तीनेच प्रामुख्याने चालविलेली-पोसलेली आहे. गरीब ब्राह्मण, मराठा वा कुणब्याला वाचवून (त्यांच्या रक्षणासाठीच) गरीब महारमांग बौद्धांवरच (किंवा दुसरे, दलितातील चांभार-भंगी इत्यादींवर) अन्याय अत्याचार वा हिंसाचार का करण्यात यावेत ? हे निर्घृण उत्पातवर्गीय नसून जातीयच कसे आहेत ? याचे मर्म लक्षात घेऊन, म्हणूनच मग दलित चळवळीला आपला पहिल्यांदा लढा वर्णजातीयव्यवस्थेला छिन्न-भिन्न करण्यावरच केंद्रित करावा लागतो. दलित चळवळीला तिच्या सामाजिक बांधिलकीमधूनच पडलेली ही अपरिहार्य मर्यादा आहे. प्राप्त समाज परिस्थितीच्या अनुषंगाने ती संक्रमक व गतिशील राहील.

दुसरा, इथल्या वर्णजातीचा अहंकार जोपासणाऱ्या प्रवृत्तीच्या संदर्भात भारतीय मार्क्सवाद हा हिंदुत्वाच्या पूज्य व पुण्य चरणावर अजूनही वाकूनच उभा आहे. नगरपालिका–सरकारात–समाजात तसे कारखान्या–गिरण्यात कॉमरेड भाईंचे सुद्धा पक्षपाती जातीवादी धोरण काय दाखविते ? या जिवंत वस्तुस्थितीचा प्रत्यय डोळसपणे लक्षात घेऊन एका सुप्रतिष्ठित मार्क्सवादी विचारवंतानेच म्हटल्याप्रमाणे– 'मार्क्सने जणू भारतीय मार्क्सवाद्यांना केवळ आर्थिक कार्यक्रम तेवढा आखून दिला. इतिहासाला गति देण्याऐवजी इतिहासानेच मार्क्सवादाला ढकलत ढकलत पुढे आणले आहे.' हे नाकारण्यात काही अर्थ नाही. असे नसते तर इथल्या मूळ समस्येच्या निवारणार्थ मुळातला मानवतावादी मार्क्सवाद दलित चळवळीकडे आपल्या सामर्थ्यांनिशी अगोदर वळला असता. पण डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवाद व मार्क्सिस्टांचे हे गुह्य बरोबर हेरले होते. ' जिथे श्रमाऐवजी श्रमिकांचेच विभाजन केले जाते त्या आपल्या भारत देशातील जातीयतेचा व अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यास मार्क्सवाद असमर्थ आहे. आम्हाला तो नको आहे. ' असे स्पष्टपणे त्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले.

दलित चळवळीला गतिशील व परिवर्तनवादी अशा उज्ज्वल बौद्ध धर्म–संस्कृतीचे अधिष्ठान लाभले आहे. त्यामुळे तिचे अंतिम ध्येय व्यापक व विश्वात्मक आहेच. बौद्ध धर्म म्हणजे दैनंदिन जीवनाची क्रमणा उजळ करीत जाणारे परिवर्तनवादी बुद्धाचे तत्त्वज्ञान होय. ते

तत्त्वज्ञान, ही श्रेष्ठ आचारसंहिताचे आहे. खरे म्हणजे पारंपारिक अर्थाचा (शब्दप्रामाण्यवादी) तो ' धर्म ' नसून बुद्धाच्या परिभाषेत ' धम्म ' आहे. धर्म हे नाव न घेताही विशुद्ध बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धाचे तत्त्वज्ञान अत्यंत प्रगत, गतिमय, विकसनशील व क्रांतिकारी तत्त्वज्ञान सिद्ध झाले आहे. ते जीवनमूल्य म्हणून ओळखले जाते. " " बुद्धधर्म हा केवळ अस्पृश्य महारांचा धर्म म्हणून ओळखला जातो. अर्थात दलित चळवळ ही मुळात (ते मूळ आंबेडकरवादच) वर्णजातीविरोधी सम्यक क्रांतिवादी चळवळ असूनही ती एका विशिष्ट गटाच्या-(महार) समाजाच्याच आकांक्षापूर्तीस्तव वापरात आणली जाते. एका विशिष्ट ज्ञातीसमाजासाठी चळवळीला बंदिस्त करून रूढी परंपरेविरुद्ध लढा देणे म्हणजे जातीवादाचे किल्ले मोडण्याऐवजी पारंपारिक जातीय भावनेच्या बुरूजांचे एकप्रकारे रक्षण व पोषण करणेच होय " असा आरोप.

" आपण ब्राह्मण - मराठ्यांचे, कुणब्या-माळ्यांचे सर्वांचे सहकार्य घेणे, नवे मित्र बनविणे, वाढविणे म्हणजे दलित चळवळीचे क्षेत्र व्यापक करणे तिचे सामर्थ्य वाढविणे होय. हे म्हणणे प्रथमतः मान्य करायला पाहिजे, नव्हे आपले व्यक्तिगत संकोचतत्त्व, दुराभिमान न्यून वा अहंगड वगैरे बाजूला काढून आपण ते मान्य केले पाहिजे. आणि दुसऱ्यांदा ते कसे कोणत्या पाठबळावर मान्य करावे, याचाही सारासार विचार झाला पाहिजे.

'दलित चळवळ' या नावातच हा विस्तार विचार अंतर्भूत आहे आणि तेच तिचे स्वयंभू ध्येयधोरणही आहे. दलित म्हणजे जे जे या जाती-वर्ण व्यवस्थेत चिरडले, भरडले, नागवले गेले ते ते सर्व लोक. त्यात अस्पृश्य महार मांगाप्रमाणेच तेली, तांबोळी, कुणबी, मराठा इ. सर्व जातीचे व वर्णाचे लोक मोडतात. तेव्हा ही चळवळ विशिष्ट जातीपुरती बंदिस्त होऊन आहे वगैरे आक्षेप व्यर्थच आहेत. "

" आपण सर्व जातीच्या महार, मांग, कुणब्याच्या शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या तसेच मराठा-ब्राह्मणांच्याही घरी जातो. त्यांच्यात वावरतो. तिथे जात नसते. तिथे एक मनमोकळा विचार असतो. तो विचार,

त्या वृत्तीची आज दलित चळवळीला गरज आहे, नाही का ? "

" हे तत्त्व चळवळीचे सम्यकत्व निर्देशित करते हे खरे, पण काही निश्चित मूठभर अपवाद सोडून सर्वसामान्य वस्तुस्थिती याहून वेगळी नाही काय ? ते सूपभर कसे केव्हा होतील ? हा प्रश्न आहे. दलितातील महार मांग समाज, आणि अलिकडे ब्राह्मण-मराठा यातील काही (केवळ शिक्षित नव्हे) सुसंस्कृत पुरोगामी वृत्तीच्या लोकांनीच नव्या युगाची क्रांतीची पावले ओळखली व उचलली असल्याचे आढळते. बाकीच्या बहुजन समाजातील तेली, तांबोळी, मराठा, कुणब्यात सुधारणावादाच्या, समाजक्रांतीच्या प्रक्रियेने अजूनपर्यंत तरी मूळ धरले आहे काय ? ते बहुतेक सर्व आजही वर्ण जातीय भेदभावाने ग्रस्त-रुढी-परंपरावादीच आहेत. याचे कारण जसे जाती व वर्ण अहंकार पोसणारे गफलतीचे स्वार्थी राजकारण हिंदूवादी राज्यसत्ता आहे, तसेच परकीय प्रेरणा घेऊन त्यांच्या तत्त्वज्ञानाचे अस्थानी अंधानुकरण करून दाखवेपणा करणाऱ्या तथाकथित पुरोगामी चळवळीचे साहित्य व समाजकारणही जबाबदार आहे, हे आपण वेळीच लक्षात घेतले पाहिजे. "

" आजचे दलित नेतृत्व प्रस्थापित झालेल्यांचे आहे. ते संधीसाधू आहे. सर्वच जातीमधून ही अवस्था असल्यामुळे त्यांना आपण का दोष द्यावा ? "

" ही वस्तुस्थिती कोण नाकारणार आहे ? "

" अितःपर बेशुद्धीत व बेसावध असलेल्यांचे आपल्या तुपल्या सगळ्यांचे, ते अंतःकरणाच्या प्रामाणिकतेने व हृदयाच्या सच्च्या साक्षीने दलित चळवळीत सामील होऊ शकले तर विशुद्ध (भारतीय) आंबेडकरी चळवळ कोणत्याही पुरोगामीवाद्यांचे नेहमीच मनापासून स्वागत करील. ' तुम्ही खऱ्या दिलाने या आम्ही तुमच्या खांद्याला खांदा देऊन सगळ्यांचे सर्व कार्य (समाजउत्थानाचे) एकच करू' अशीच दलित चळवळीची धारणा असणार ! "

पण प्रश्न तोच इथे नडतो आहे. जिथे आपलेही दुसरे होतात तिथे दुसरे आपणास दुसरेच मानून दलितांच्या सामाजिक, वाङमयीन चळवळीला ' दुसऱ्याची चळवळ ' समजणाऱ्या, तिच्याशी सहभाव व

सहकार्य न ठेवणाऱ्या, टाळणाऱ्या किंवा नुसता देखावा दाखवणाऱ्या अशा काही लोकांच्या संधीसाधू, दुटप्पी धोरणाची पर्वा न करता त्यांच्या अभिनिवेशपूर्ण तथाकथित 'दलित जाणिवे' शिवाय दलित चळवळीला म्हणून आपली अस्मिता राखून सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक लढा गतिमान व क्रांतिगामी ठेवण्यास मग अधिक जागरूक, तेजस्वी आणि समर्थ व्हावे लागते.

"प्रतिवाद-अडथळे चळवळीला नेहमी नवे सामर्थ्य आणि विद्रोहाची नवी जागरुकशक्ती देत असतात. दलित चळवळीच्या अंगिभूत क्रांतिगर्भ विद्रोही शक्तीमध्ये ही भरच ठरावी."

o o o

दलित चळवळ व मार्क्सवाद

दलित चळवळीच्या प्रारंभी पुसट असलेले पण पुढे पुढे स्पष्ट होत गेलेले दोन विचारप्रवाह अलिकडे भरधाव वाहू लागले आहेत. चळवळीच्या संदर्भात मतभेद होण्यातून वैचारिक घुसळण होते, ती एका मर्यादेपर्यंत चळवळीला धक्के देऊन गतिशील करण्यास मदत करते पण जेव्हा विचार विकार होतो तेव्हा त्या विकार–विकोपातून निर्माण होणारे आणि पुढे टाळता न येणारे अडथळे तिला गतिरोध करतात. त्याचे कारण ह्या चळवळीचा तिच्यातील भिन्न विचारवर्तुळांना कुठेतरी एकत्र सांधणारा एक मजबूत असा दुवाच त्यावेळी निखळून पडलेला असतो.

दलितांची समस्या इथल्या मातीतून उद्‌भवलेली; तिचे स्वरूप येथील समाज–संस्कृतीनिर्मित परिस्थितीशी सापेक्ष आहे. तरीसुद्धा दलित–समस्येच्या सोडवणुकीसाठी पुढे येणारा विचार हा समाज परिस्थितीनिरपेक्ष व स्थल–कालातीत असू शकतो. या दृष्टीतूनच जगातील मान्यताप्राप्त मानवी मूल्यांचा, तत्त्वाचा विचार केला जातो.

पराकोटीच्या दुष्ट भांडवलशाहीविरुद्ध कामगार संघटना बांधण्यासाठी श्रमविभागणीच्या तत्त्वावर कार्लमार्क्सने मूलभूत पायावर रचलेला अर्थविचार दिला. विशेषतः आर्थिक शोषणाविरुद्ध तो विचार त्यावेळच्या तिथल्या (अमेरिका–रशिया–इंग्लंड) भांडवलशाहीनिर्मित परिस्थितीचा मुकाबला करणारी एक जबरदस्त 'शक्ती' मूलमंत्रच ठरला. एवढा की, मार्क्सवाद रशियात पूर्णपणे रुजला. चीनमध्ये गेला– तेथेही फलद्रूप पावला. जगातील इतर काही देशातही त्याला यश आले. ह्याने भारतात पाऊल ठेवले, पण भारतभूमीवर ते पुरते उमटलेच नाही. मार्क्सवाद इथे अजूनपर्यंत रूजू शकला नाही, याचे कारण काय?

मार्क्सवाद इथे आला तसाच त्याची पहिल्यांदा सांगड येथील बलिष्ठ अशा हिंदुनिष्ठ मनोवृत्तीशी झाली. खरे तर मार्क्सवाद इथे येऊन बाटला. अपवित्र झाला. शुद्ध मार्क्सवाद राहिलाच नाही. याचे कारण डांगे–मिरजकर वगैरे बड्या कॉमरेड प्रभृतींनी भारतात विशुद्ध अशा सामाजिक व आर्थिक पायावर उभारलेल्या म. फुल्यांच्या सामाजिक – आर्थिक एकूणच (दलित, पीडित, शेतकरी कामगार कल्याणाच्या) चळवळीच्या पुरोगामी तत्त्वाचा पुरस्कार न करता त्यांनी कट्टर हिंदू धर्मनिष्ठ लो. टिळकांना गुरू केले. अर्थात्च हिंदू देव, धर्म व त्याचे शास्त्र जोपासणाऱ्या तथाकथित मार्क्सवाद्यांची परंपरा-वादी सनातनी प्रवृत्तीशी गाठभेट घालून देणारी धारणा खऱ्या ध्येया-पासून दूर गेली. निष्प्रभावी ठरली. तिला विज्ञाननिष्ठ मूल्ये प्रस्थापित करणाऱ्या नव्या क्रांती-प्रक्रियेची चाहूल घेताच आली नाही. क्रांतिसन्मुख होता आले नाही. थोडक्यात, ही भूमीच मार्क्सवादी विचारसरणीच्या पिकाला अनुकूल ठरली नाही. असे म्हणणे भाग पडते.

इथे मार्क्सवाद रूजू शकत नाही, याचा अर्थ मानवी समस्या उकलण्यास मार्क्सवाद असमर्थ आहे, असा आपण करीत नाही; तरी तो भारतीय समाजजीवनाच्या विकासोत्थानाची प्रेरणा होऊ शकणार नाही आणि 'दलित-समस्या' तर इथली एक प्रमुख सामाजिक समस्या (या संस्कृतीचा रोग-एक कायमचे दुखणे) असल्याने ती सोडविण्याकरिता म्हणूनच मार्क्सवादाचा इथे उपयोग होण्यासारखा

नाही. तो अस्थानी आल्यामुळे वा येऊ पहात असल्यामुळे इथे तो गुदमरून पडण्याचाच संभव अधिक आहे. याचे कारण उघड आहे की, भारतीय दलित जीवन हे येथील धर्म संस्कृतीने निर्धारित केलेले, ' नीच ' हिणकस दर्जाचे जीवन आहे आणि ते समुहविशिष्ट आहे. समाजाच्या एका विशाल अंगालाच सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक जीवनापासून झिडकारून दूर अंधकार अवदसेच्या गर्तेत ढकलले गेलेले, लोंबकळत ठेवलेले. या धर्मसंस्कृतीने एका माणसाला सर्वश्रेष्ठ, श्रेष्ठ, मध्यम असा जन्ममौजेचा वरचा दर्जा मिळवून दिलेला तर दुसऱ्यासाठी जन्माची अधःपतनावस्था कायम केलेली माणसाला दिलेला हा विषम दर्जा विषम अशा आर्थिकतेच्या वर्गीय पातळीवर असता, तर एकाला आपली ' तरक्की ' करून वरच्या वर्गात प्रयत्नाने जाताही आले असते. पण तो दर्जा या स्वरूपाचा नसून वर्णजातिश्रेष्ठत्वाच्या पक्क्या पायावर आधारलेला असल्यामुळे तो गुण कर्मानुसार श्रेष्ठ–कनिष्ठ व्यवसाय विठ्ठलरूप करून भक्ती करणारा सावतामाळी आपल्या जन्मजातीबद्दल जागरूक आहे. या साऱ्यापेक्षाही ज्याच्या अभंगातून दलितत्वाची बोच सतत जाणवते तो चोखामेळा व त्याचे कुटुंबीय अधिक लक्षात राहतात. चोखामेळाच्या अभंगातून उपेक्षितांची युगानुयुगीची चिरवेदना जाणवत असली तरी ती त्याची वैयक्तिक नाही. ती त्याच्या जमातीची वेदना आहे. उपेक्षितांची, पीडितांची शोषितांची वेदना चोखा व्यक्त करतो. 'उस डोंगा परी रस नोहे डोंगा' असा सवाल टाकतो. भक्तीच्या राऊळात आणि भागवताच्या मेळाव्यात तो आपली वेदना व्यक्त करीत होता. तेवढा अधिकार त्याला वारकरी संप्रदायामुळे प्राप्त झाला होता. वर्णव्यवस्थेमुळे, जातीयतेमुळे जी दुःखे त्यांना पचवावी लागली त्यावर उपाय नव्हता. भक्ती करून मनःशांती मिळविण्याचा त्याचा नेटका प्रयत्न होता. तत्कालीन रूढीचा परिणाम त्याच्या मनावर होता. आपल्या पूर्वसंचितामुळे या जातीत आपला जन्म झाला अशी चोखोबांची मनोभूमिका होती. सनातनी वृत्तीच्या लोकांनी हे सूत्र तत्कालीन सर्वसामान्य जनतेच्या मनावर अतिशय परिणामकारक रीतीने बिंबविले

होते. आपल्या संचित आणि क्रियमानामुळेच आपण या जातीत जन्मलो असा या लोकांचा दृढ विश्वास होता.

शुद्ध चोखा मेळा करी नामाचा सोहळा
यातिहीन मी महार पूर्वी नीळाचा अवतार
कृष्णनिंदा घडली होती म्हणोनि महार जन्मप्राप्ती
चोखा म्हणे विटाळ आम्हा पूर्वीचे जन्मीचे हे फळ

समाजात आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची फिर्याद चोखामेळा ईश्वराकडे करतो. कारण ईश्वराशिवाय ही फिर्याद ऐकण्यास कोणी तयार नव्हता. जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था याच्याभोवती फिरणारा समाज अस्पृश्यांना हीन प्रवृत्तीने वागविण्याचे महत्त्वाचे काम करीत होता. अशा वेळी ही वेदना, अतिदुःख चोखोबांनी ईश्वरापुढे मांडलं.

पारंपारिकतेने चालत आलेली आपली स्थिती चोखोबा अत्यंत हृदयद्रावकतेने सांगतात. मी केवळ महार नाही तर 'महाराचा महार' ह्या शब्दातच व्यथेला अर्थ प्राप्त होतो. आमची अशी उपेक्षा, हेटाळणी करावयाची होती तर ईश्वरा आम्हाला जन्म का दिलास ? असा रोकडा सवाल ते ईश्वराला विचारतात. पण समाजापुढे हा प्रश्न ठाकण्याचे धैर्य त्यांच्या ठिकाणी नव्हते. विद्रोहाची ठिणगी टाकण्याचा तो काळही नव्हता. विठोबाची चाकरी करीत देवळाबाहेर उभा राहण्यात तो स्वतःस समाधानी म्हणवत होता.

चोखोबांप्रमाणे आपल्या मनातील दुःख त्यांच्या कुटुंबियांनी ईश्वरापुढे मांडले. पत्नी, बहीण, मेहुणा चोखोबांच्या विचारांच्या सीमेवरून आपले गाऱ्हाणे मांडताना दिसतात. पण चोखोबाचा मुलगा कर्ममेळा मात्र तरुण वयामुळे आणि सळसळत्या रक्तामुळे आपली ही उपेक्षिततेची व्यथा अधिक परखडपणे स्पष्ट करतो.

आपल्या पित्यावर होणाऱ्या अन्यायाची जाण त्याला आहे. तो देवाला, आमुची केली हीन याती ' तुज का न कळे श्रीपती ' असा रोकडा सवाल ईश्वराला टाकतो. माणूस म्हणून आम्हाला जगता यायचे नाही काय ? या प्रश्नाची उत्तरे अनुत्तरित राहतात. दलितत्वाची वेदना कर्ममेळ्यास तीव्र वाटते आणि वेदनेची जागा विद्रोह घेतो. त्या

विद्रोहातून तो ईश्वराला कडक बोलतो. 'तुम्हाला मात्र दररोज पंचपक्वान्नांचे जेवण आणि आम्हाला मात्र उष्टं, हा काय तुझ्या दरबारातला न्याय आहे ? ही का तुझी समता ! जगाकडून तर, आम्ही उपेक्षित आणि दूर लोटलेलो आहोत. तुझ्याजवळ जागा मिळाली तरी आम्हास निर्भेळ समाधान नाही. आमच्या कपाळीचा हीनत्वाचा टिळा दूर होत नाही. लाजिरवाणे जीणे जगावे लागते. अंग चोरून वावरावे लागते. विठ्ठला, हा काय तुझ्या समतेचा न्याय ? इतरात आणि आमच्यात खोल दरी आहे. आम्ही हीन याती म्हणून पायरीच्या खाली उभे हे मनाला पटत नाही. पण त्याच परंपरेतून जावे लागत आहे. हा आमचा भोग आम्हाला भोगणे आहे. हा उदासवाणा विचार आज तरी विचार करावयास लावणारा वाटतो.

तेव्हा, तेराव्या शतकातील दलित संत साहित्यात डोकावले असता जाणवते ते हे की, इथे त्यांच्या उपेक्षिततेची जाणीव निर्माण झाली होती परंतु ती जाणीव कृतीरूप का झाली नाही ? ईश्वरापुढे गाऱ्हाणी नेऊन आपल्याला हवी असलेली सामाजिक समता मिळणार नाही हे का त्यांच्या लक्षात आले नव्हते ? का सनातनी परंपरावादी पंडितांच्या रौद्र अवतारापुढे आपल्या भावना व्यक्त करण्याचे धैर्य अंगी नव्हते ? असे म्हणता असण्यापेक्षा वर्ण-जाति-धर्माने आखून दिलेल्या उच्चत्त्व आणि हीनत्त्व भावनेतून माणसावर लादण्यात आला आहे. दलितांच्या वाट्याला आलेली ही जन्मोजन्मान्तराची हीन अवस्था म्हणजे अस्पृश्यता, धार्मिक, आर्थिक, मानसिक दास्य; (यात 'कर्म-विपाका' च्या कल्पीचे भय वेगळेच) या जीवनावर लादलेले सर्व प्रकारचे दळभद्रण; आणि हेच 'दलितपण'.

कार्ल मार्क्सच्यापुढे प्रामुख्याने आर्थिक पायावर उभी असलेली भांडवलशाहीच्या पिळवणूकीविरूद्ध वर्ग लढ्याची एकमेव पण स्वयंपूर्ण अशी यंत्रणा तयार होती. भारतीय सांस्कृतिक–सामाजिक परिस्थितीवर विचार करण्याचे त्याच्यापुढे कोणतेही कारण उपस्थित झाले नव्हते. शोषित, पिडीत, गरीब कामगार वर्गाला न्याय मिळावा, ही त्याची भूमिका होती. तळमळ होती. बौद्धिक प्रामाणिकता, ढोंग,

फसवणूक व भोंदूगिरी याबद्दल त्वेष, सामाजिक अन्यायाबद्दल चीड असे त्याचे व्यक्तिमत्व होते. तो एक जडवादी भौतिक पिंड होता. त्याच्या परिवर्तनेच्छू व्यक्तिमत्वाला नाकारण्याचे कारण नव्हते. ह्या विचारवंत व्यक्तिमनाला भारतातील जातिवर्गाधिष्ठित समाजव्यवस्थेचे त्यावेळी कदाचित आकलन झाले नसेल; गरजही पडली नसेल. तथापि ह्या परिवर्तनकारी युगाचे व जगाचे क्रांतिकारी प्रतिनिधीत्व करण्यास समर्थ म्हणून गौरविले गेलेल्या मार्क्सवादाला भारतीय समाजव्यवस्थेचा मूलगामी विचार करता आला नाही किंवा येऊ नये, ही बाब व्यक्तिदृष्टया मार्क्स किंवा त्याच्या वादाकडे बोट दावत नाही; तर भारतीय समाजव्यवस्था व संस्कृती–परंपरा ही किती जडमूढ, गूढ जगावेगळी व विक्षिप्त आहे. हेच दर्शविते. तेव्हा मार्क्सच्या (एक व्यक्ती म्हणून मर्यादा व स्थलकालसापेक्षाही लक्षात घ्यावी.) तत्वज्ञानाचा किंवा जगातील कोणत्याही क्रांतिमल विचारदर्शनाचा हा दोष नाही किंवा त्याची असमर्थताही नव्हे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाही एक ' न्यायदर्शन ' म्हणून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला विरोध नव्हता; पण मार्क्सवादाचा त्यांनी स्वीकारही केला नव्हता, हे खरे आहे. जगप्रसिद्ध ' मार्क्सवादा ' च्या सखोल अभ्यासचिंतनानंतर त्यांनी आपले एक मत बनविले आणि त्यानुसार आपल्या अनुयायांना मार्क्सवादापासून दोन हात दूरच राहायला सांगितले होते. त्यांनी असे का सांगितले ? त्याचे पहिले कारण – भारतातील सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीनिर्मित दलितांच्या समस्येवर मार्क्सवादा'तून त्यांना उत्तर मिळाले नाही हे आहे. मार्क्सवाद न स्वीकारण्याचे त्याचेच अनुषंगिक दुसरे कारण म्हणजे केवळ मार्क्सची ' अर्थ '–केन्द्रित तत्वदृष्टी आणि जगातल्या सर्व धर्मांना एकत्र गोवून मार्क्सने केलेला धर्मविरोध आणि त्याचा लोकशाहीविरोध हे डॉ. आंबेडकरांच्या विचारातील पुढील सूत्रावरून अधिक स्पष्ट होते.१) कामगार क्रांती → कामगार मुक्ती → कामगारांचे स्वातंत्र्य = कामगारांचे राज्य २) खाजगी मालमत्तेचे विसर्जन पण पुन्हा सत्ताधीश कामगारच मालमत्ताधीश → पर्यवसान हुकूमशाहीत = लोकशाहीचा नाश, डॉ.आंबेडकर

यांच्या मते [1] हे अटळ चित्र एक दुष्ट चक्रच होते.

दलितांचा प्रश्न नुसता आर्थिक नसून तो मूलतः आणि वस्तुतः सांस्कृतिक व सामाजिक स्वरूपाचाच आहे; आणि यावरचा उपाय मार्क्सवाद सुचवत नाही. दलित मुक्तीच्या लढ्याला तो उपयोगाचा नाही, अशी डॉ. आंबेडकरांची खात्री झाली होती. त्यांनी येथील मार्क्सिस्ट समाजवाद्यांना उद्देशून म्हटले होते– " देशातील एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर सत्ता गाजविण्यात कुठली न्यायबुद्धी आहे ?.... आर्थिक क्रांतीसाठी प्रथम समाजक्रांती अपरिहार्य आहे. सामाजिक बदल घडवून आणल्याशिवाय आर्थिक बदल घडणे शक्य आहे काय ?.... समाजातील एक वर्ग दुसऱ्याचे शोषण करतो, त्याला वाईट वागणूक देतो व हा प्रकार रूढी म्हणून संमत होतो, ही बाब समाजवाद्यांना मान्य आहे काय ? या प्रकारामुळे एका वर्गाला दुसऱ्या वर्गावर अन्याय व जुलूम अखंडपणे करण्याचा परवानाच मिळत असतो. असे असूनही त्यांना संमत आहे की, आर्थिक क्रांतीसाठी प्रथम कामगारक्रांती झाली पाहिजे, हे त्यांचे आश्वासन अपुरे आहे जोवर या देशातील प्रत्येक माणसाचा एकमेकाकडे पाहण्याचा व्यक्तिगत मानसिक दृष्टीकोण समतेचा व बंधुभावाचा असत नाही तोवर त्यांच्या आश्वासनाला अर्थ नाही " [2]

थोडक्यात म्हणजे भारतात वर्णजातीविरहित पण केवळ आर्थिक विषमतेवर उभी-'गरीब–श्रीमंत' स्वरूपाची वर्गव्यवस्था कधीच नव्हती व नाही; तर उच्चनीचता, भेदभाव, द्वेष, तुच्छता माणसामाणसात पेरणारी, माणुसकीलाच प्रश्नांकित करणारी जगात एकमेवाद्वितीय अशी समाजव्यवस्था इथे उघड माथ्याने नांदत आली आहे. तिची मुख्य इमारत बिनशिडीच्या चातुवर्ण्याची, जातिव्यवस्थेची म्हणून दलितांचे दुखणे आर्थिकतेतून येण्याअगोदर या वर्णजातिव्यवस्थेतून निर्माण झाले आहे. जात म्हणजे वर्ग नव्हे आणि वर्ग म्हणजे जात होत नाही तेव्हा आर्थिक प्रश्नावर आरूढलेला आणि वर्गकलहावर मूलमंत्र ठरलेला मार्क्सवाद येथील दलितांच्या राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक (साहित्यिकही) चळवळीला प्रेरक ठरू शकेल, असे वाटत नाही.

खरी गोष्ट ही आहे की, युरोपीय देशात औद्योगिक क्रांतीची

परिणती वर्गवादात होणे, ही एक अपरिहार्य बाब होती. भारतात वर्ण-जातिभेदाच्या व अस्पृश्यतेच्या अमानवीय धर्म रूढीने भारतातील ब्रिटिशकालापर्यंत औद्योगिक क्रांतीला जन्मूच दिले नव्हते. सध्या बडचा शहरात औद्योगिक विकास घडून आल्याचे चित्र दिसते. आम देशात मात्र जात मिटून (निदान माणसाला माणूस मानणाऱ्या) वर्गवादी विचाराचा प्रभाव पडत आहे. असे कदापीही आढळत नाही. याचेही कारण धर्मवर्णव्यवस्थेचा, जातीयतेचा टिकून असलेला व दिवसेंदिवस वाढता पगडा.

' जातीयवाद आणि वर्गवाद ' [3] या आपल्या ग्रंथात आजच्या विद्वान लेखिका श्रीमती नलिनी पंडित यांनी प्रस्तुत संदर्भात काढलेले काही निष्कर्ष मार्क्सवादी दृष्टीकोणावर प्रकाश टाकतात.

१) भारतातील सामाजिक घडामोडीचा अन्वयार्थ लावताना अनेकदा युरोपातील वर्गवादी विचारसरणी येथील विशिष्ट परिस्थितीचे भान न राखताच वापरली जाते. त्यामुळे प्रत्येक जात म्हणजे वर्गच होय, अशा भावनेने जातीय संघर्ष आणि वर्गविरोध याची गल्लत करण्यात येते. वस्तुतः जात आणि वर्ग या दोन अगदी स्वतंत्र कल्पना आहेत (प्रस्तावना)

२) पाश्चिमात्त्य देशात व्यक्तीला रुढीबंधनातून मुक्त करण्याच्या युगप्रवर्तनात भांडवलदार वर्गाने पुढाकार घेतला. भारतातील भांडवलदार वर्ग अत्यंत दुबळा म्हणून जन्मसिद्ध प्रतिष्ठेवर आधारलेल्या सामाजिक परंपरा नष्ट करण्याचे कार्य मध्यमवर्गीय बुद्धीजीवी वर्गाने पत्करले. पण वर्णसंस्थेवर निर्भर असल्याने हे कार्य त्याला तडीस नेता आले नाही म्हणून मध्ययुगीन अवशेष कायमचे नष्ट करण्याची जबाबदारी येथील दलित वर्गावर येऊन पडते. (पृ. १३०–३१)

३) भारतीय भांडवलदारीचा उदय जातिसंस्थेच्या चौकटीत झाला. त्यांच्या जातिव्यवस्थेतील विशिष्ट स्थानामुळे ते धर्म जाति-व्यवस्थेविरुद्ध लढू शकले नाही. साम्यवादी नेतृत्व टिळकप्रणित राष्ट्रवादी परंपरेतून आल्यामुळे ते एका बाजूला ब्राह्मणी वेदांत तत्त्वज्ञानाच्या प्रभावातून अजूनही मुक्त होऊ शकलेले नाही.

४) महाराष्ट्रातील वर्ग आणि जातीचे परस्पर संबंध तपासून पाहिल्यास कोणतीही जात वर्गदृष्टचा आज एकसंघ राहिलेली नाही. (पृ. ५२).

५) सतत वर्गलढा देऊनही वर्गीय जाणीव आर्थिक क्षेत्राच्या पलीकडे पसरत नाही. (पृ. १०३)

श्री. शरद पाटील एके ठिकाणी लिहितात– ' (युरोपातील) भौतिकवादाविरूद्ध (भारतातील) अध्यात्मवाद या तत्वज्ञानसंघर्षात श्रमिकाविरुद्ध शोषक असा वर्ग संघर्षाचे प्रत्यक्ष प्रतिबिंब पाहणे सर्वथैव चुकीचे आहे ' वर्ग समाजोदयापासूनचा मानव समाजाचा इतिहास हा वर्गलढचाचा इतिहास आहे. ' हा मार्क्सचा सिद्धांत भारताला गैरलागू आहे. [4]

सारांश, १) प्रत्येक व्यक्तीची सामाजिक जाणीव येथे जाती-पुरतीच मर्यादित राहिली आहे. २) येथे स्वाभाविक जाणीव जातीय आहे. ३)आजचा जातिवाद हा मध्ययुगीन संकल्पना व जातीय जाणिवा जोपासणाऱ्या भांडवलदार व मध्यमवर्गीय मनोवृत्तीचा परिपाक आहे. ४) मार्क्सवाद या परिस्थितीवर तोडगा ठरत नाही म्हणून तो भारताला गैरलागू आहे.

दलित समाज साहित्याची मूलात्म प्रेरणा आणि मार्क्सवाद.

दलितांच्या सामाजिक, वैचारिक क्षेत्रातल्याप्रमाणेच ' दलित साहित्य ' चळवळीतही मार्क्स साम्यवादी दृष्टीचा अलिकडे प्रादुर्भाव झालेला दिसून येतो. या साहित्याचे मूल्यक्षेत्र विश्वव्यापक बनावे दलित जाणिवांचे आकाश व्हावे, या दृष्टीने मार्क्सवादी दृष्टी व मूल्यसरणीचा अंतर्भाव करून घ्यावयाचा असेल तर इथे पहिला प्रश्न पुढे येतो की हिंदुनिष्ठ मार्क्सवादी (?) लेखनदृष्टीचा दलित साहित्याने स्वीकार करावा काय? दुसरा प्रश्न पडतो तो हा की– मार्क्सच्या आर्थिक वर्गीय निकषांवर भर देणाऱ्या साहित्य मूल्यांचा दलित दृष्टीने गौरव करावा काय ?

दलित साहित्य हे आधुनिक काळातील युगपरिवर्तनाच्या सगळ्या क्रांतिमोहरा घेऊन आलेले, संपूर्ण दलित जीवनाचा आविष्कार

घडविणारे साहित्य आहे. दलित साहित्याच्या अंत प्रेरणाचा विचार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा, मूल्यसंघर्षाचा किती एकजीव संबंध आहे, हे समजू शकते ' डॉ. आंबेडकर ही दलित साहित्याची मूलात्म प्रेरणा असल्याने 'आंबेडकर' या व्यक्तित्वमूल्यापासून, त्यांच्या विचारांपासून हे साहित्य फटकून राहू शकत नाही किंवा त्यापासून वेगळेही होऊ शकत नाही. तथापि, साहित्य हे साधारणतः कोणत्याही एका वादाशी परिबद्ध न राहता त्याच्या प्रकृतीधारेशी समांतर असणाऱ्या अन्य वादाशीही ते सांगड घालीत असते. पुरोगामी असलेल्या मार्क्सवादी दृष्टीकोणाचा दलित साहित्याच्या प्रेरणाप्रवृत्तीशी, जाणिवांशी संबंध जोडताना त्याच्या साधकबाधकतेचा विचार पहिल्यांदा आपणास इथे करावा लागतो, केला पाहिजे. इथल्या मार्क्सवादी लेखनदृष्टीचे स्वरूप व तिचा हेतू मार्क्सवादाच्या संबंधात मांडलेली विचारवंतांची मते न्याहाळण्यातून आपणास आकळता येतो. या संदर्भात मानवेन्द्रनाथ राय याची काही मौलिक विधाने आपल्या संकल्पाला पुष्टी देऊ शकतात.[5] ते आपल्या ' नवमानवतावाद ' मध्ये स्पष्ट लिहितात–

१) साम्यवाद्यांच्या दृष्टीने मार्क्सने नवी समाजरचना कशी उभारावयाची याविषयी काहीही सांगितले नाही; तिची सामान्य स्थूल रूपरेषाही त्याच्या लेखनात नाही; यामुळे साम्यवाद हे लेबल कशालाही लावणे शक्य झाले आहे. नव्या समाजव्यवस्थेत आर्थिक विषमता आणि तज्जन्य अन्याय राहणारच, असा याचा अर्थ आहे आणि या विषमतेचे व अन्यायाचे त्यामुळे समर्थनही होते.(पृ.१९)

२) मानवी स्वातंत्र्य प्रेरणेचा आविष्कार म्हणून जी सामाजिक व नैतिक मूल्ये निर्माण केली जातात ती सर्व हुकूमशाहीत विनाश पावतात. (पृ. ११)

३) मार्क्सवादातील सापेक्षतावाद दिसायला जरी बुद्धीवादी दिसला, तरी त्याचे स्वरूप आग्रही आहे... ' बळी तो कान पिळी ' हेच विधान सिद्ध करण्याकरिता हेगेलने अनीतीला बुद्धिवादाचा पेहराव चढविला. आजचा वर्तमानकालीन सत्ताधीश हा नीतिमानच होय,

अशी हेगेलची विचारसरणी होती. यामुळे आजच्या जर्जर व विस्कळीत अशा प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या इतरांना साम्यवादाचे आकर्षण वाटेनासे झाले आहे. (पृ ३३–३४)

४) आग्रही मार्क्सवादाने आर्थिक विचारांना अग्रस्थान दिले आणि सांस्कृतिक व नैतिक मूल्यांविषयी अश्रद्धा व संशयवृत्ती बाळगली. यामुळे मध्यम वर्ग मार्क्सवादापासून विन्मुख झाला आणि क्रांतीवादी शक्तीमध्ये बौद्धिक दौर्बल्य निर्माण झाले. स्वार्थी अर्थवादाने समाजवादाच्या नैतिक प्रेरणेवर मात केली. (पृ. ४३)

५) साम्यवादाची विचारसरणी वर्गीय आहे आणि कामगार हुकुमत स्थापनेशिवाय त्यांच्याजवळ दुसरा काहीच तोडगा नाही. त्यामुळे सर्व प्रगमनशील आणि क्रांतिकारक शक्तींना एकत्र आंदोलनात आणण्याच्या कार्यात साम्यवाद अपेशी ठरले आहेत. आणि साम्यवाद हा एक दुराग्रह वृत्तीचा पंथ बनला आहे. (पृ. ४९)

६) समाजवादी अर्थव्यवस्थेसंबंधी मार्क्सच्या लेखनात एक शब्दही काढण्यात आला नाही. असे उद्‌गार आपल्या ' नव्या आर्थिक धोरणा 'चे समर्थन करताना लेनिनने काढले. (पृ. १८)

दलितांच्या सामाजिक व साहित्यिक चळवळीच्या संदर्भात या सर्व मुद्यांचा विचार करता असे म्हणता येते की, अर्थाधिष्ठित वर्गवाद, वर्गभेद, वर्गविग्रह हे भारतीय समाजव्यवस्थेचे (पूर्वी व आताही) मुळात पूर्ण अस्तित्वात नसलेले रूप पुढे करण्यात दलित समाजापुढे असलेली मूळ व मुख्य समस्या दुर्लक्षित होते आहे, हे इथल्या मार्क्सवादी विचारसरणीच्या दलित व दलितेतर लेखक, विचारवंतांना, इथल्या समाजवाद्यांना कळत नसावे काय? – हा खरोखर गंभीर प्रश्न आहे.

' अस्पृश्यतेला गौणत्व देऊन ती नष्ट होणार आहे काय? आणि वस्तुस्थितीचा विपर्यास म्हणजे तिची व्याख्या ठरते काय ? ' दलित ' या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे, तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत. ते सर्व ' दलित ' या व्याख्येत समाविष्ट होतात, असे म्हणण्याने अन्याय करणारे आणि अन्यायाचा बळी ठरणारे

यांना एकत्र बांधण्यात येते.' हे श्री. राजा ढाले यांचे मत[6] विचार करण्यासारखे आहे. ते वस्तुस्थितीवर आधारलेले आहे. बेलछी-हत्त्याकांड, आग्र्याची हिंसक दंगल, वेलपुरम अत्याचार, वरळीची दंगल अथवा मराठवाड्याचे 'नामांतरकांड यातून दलिता'वर घडलेल्या व वेळोवेळी घडणाऱ्या हिंसाचार–अत्याचारात प्रत्यक्ष भाग घेणारे कोण होते ? कापाकापी करणारे कोण होते ? कोण असतात ? हा रास्त प्रश्न आहे. भारतीय वर्णजातीयवादी समाजव्यवस्था याला जबाबदार आहे आणि हे समजू न शकणारा भारतात प्रविष्टलेला बलाढ्य मार्क्सवाद इथे दुबळा ठरतो आहे. तो म्हणूनच इथल्या समाजजीवनाशी अंत:करणपूर्वक सहभागी होऊ शकेल, असे वाटत नाही. याचे कारण– 'भारतीय कामगार वर्ग स्वत:च जातिग्रस्त असल्यामुळे तो जातिव्यवस्थाविरुध्द लढ्याचा व परत्वे भारतीय समाजक्रांतीच्या लढ्याचा नेता बनू शकलेला नाही. जातिव्यवस्था–अंताची जबाबदारी येथील दलित वर्गावर येऊन पडली आहे.[7]

मार्क्सवाद भारताच्या राजकीय, सामाजिक बाबतीत आजवर फलद्रूप झालेला नाही. तो या भूमीसाठी गैरलागू आहे, असे वरील सर्व विचारवंताचे मत असलेले दिसून येते. साहित्य–कलांनाही त्यांच्या स्वतंत्र अत विकासाकरिता मार्क्सवाद फारसा अनुकूल नव्हता, असे म्हटले जाते. 'मानव आणि मानवी व्यवहार यांचा अत्यंत यांत्रिकपणे विचार करणाऱ्या अर्थाशिवाय बाकीच्या सर्व मूल्यांना निरर्थक मानणाऱ्या आणि साहित्यादि कलांना हुकमाचे ताबेदार करणाऱ्या मार्क्सवादापासून दलित साहित्याने दूर राहणेच हितावह होईल.'[8] दुसरे, ज्याला आपण पुरोगामी साहित्य म्हणतो. त्यात एकतर मुख्यत: भारतीय मार्क्सवादी लेखकांच्या मध्यमवर्गीय 'हिंदू' जीवननिष्ठांचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते, दुसरे, विद्रोही पुरोगामी म्हणवणारे साहित्यही निखळ भारतीय दलित जाणिवांऐवजी मार्क्सच्या आर्थिक वर्गीय जाणिवेनेच अधिक भारावलेले आढळते. कलच्या क्षेत्रात तर मार्क्सीय विचार वर वरचा राहिला. पुरोगामी लेखकांचे लक्ष फक्त आर्थिक लढ्यावर केंद्रीत करण्यात मार्क्सवादाने जणु लेखकांना एक विषयच नेमून

दिला आणि त्यामुळे भारतीय तळजीवनाचा वास्तव व स्वयंपूर्ण उद्‌गार बाहेर येऊ शकला नाही व मोठ्या दर्जाचे पुरोगामी वाङ्मयही निर्माण होऊ शकले नाही. इतिहासाला गती देण्याऐवजी इतिहासानेच भारतीय मार्क्सवादाला धक्के देत देत पुढे ढकलले आहे. असेच म्हणावे लागेल.'[9]

म्हणूनच भारतातील तथाकथित मार्क्सवादी पुरोगामी साहित्याबद्दल दलित साहित्यिकांचा आकस आहे. त्याचे कारण उघड आहे, की – या 'पुरोगामी साहित्याने आजवर इथल्या सामाजिक विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वांचा, देवदेवतांचा दलित साहित्याप्रमाणे प्रखर विरोध केलेला नाही. ... समाजवादी किंवा कम्युनिस्ट पक्षाच्या हातात जर अस्पृश्यता भारतात शिल्लक राहिली असेल, तर दलित साहित्य हे समाजवादी किंवा साम्यवादी संतांच्याही विरोधात उभे राहील.'[10] दलित साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण विद्रोह, विज्ञाननिष्ठा व मानवताभूत विश्वात्मक समानता हे आहे. पण दलित साहित्याशी सहजाणीव ठेवू इच्छिणारा दलितेतर भारतीय मार्क्सवादी, समाजवादी लेखक-विचारवंत येथील वर्णजाती विषमतेविरुद्ध आणि अस्पृश्यतेविरुद्ध विद्रोह वा बंड करून उठला नाही हे खरे आहे. येथे अशा लेखकांची विज्ञाननिष्ठा आंधळी, बुद्धिवाद लंगडा आणि दृष्टिकोण तोकडा, खुजाच ठरत नाही काय? 'दलित' व दलितांच्या सामाजिक, वाङ्मयीन चळवळीकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोण विकृत नसेल कदाचित, पण त्यांचा सहानुभूती सहजीवनाचा दावा कृतकच ठरतो.

मानवेन्द्रनाथ राय यांनी म्हटल्याप्रमाणे आग्रही मार्क्सवादाने आर्थिक विचारांना महत्त्व दिले आणि सांस्कृतिक व नैतिक मूल्यांविषयी अश्रद्धा व संशयवृत्ती बाळगली. ... साम्यवाद्यांची दृष्टी वर्गीय आहे... त्यामुळे सर्व प्रगमनशील आणि क्रांतिकारक शक्तींना एकत्र आंदोलनात आणण्याच्या कार्यात ते अपेशी ठरले आहे. म्हणूनच येथील सामाजिक संदर्भात असे म्हणावेसे वाटते, की मार्क्सवाद श्रेष्ठ असेल पण हिंदुनिष्ठ मार्क्सवादी लेखक दलितनिष्ठ होऊ शकेल, दलित आंदोलनात अंतःकरणाने सहभागी होईल. हे कसे शक्य आहे ?

येथे सामाजिक जाणिवेने झपाटले जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पण प्रत्यक्षात हृदयाच्या साक्षीने दलित चळवळीला साथ देणाऱ्यांची येथे उणीव आहे दलितविषयक दृष्टीकोणाच्या आणि सामाजिक जाणिवेच्या अभावामुळेच भारतीय मार्क्सवाद्यांचे व इतरही पुरोगामी म्हणवणाऱ्या महाभागांचे समाजपरिवर्तनाचे उर्फ क्रांतीचे बोल फोल ठरतात. त्यांची मखमली भाषा पॉलिश्ड म्हणून खोटीच असते. वरून तत्त्व मान्य पण त्याचा तपशील आतून अमान्यच असणाऱ्या अशा दुटप्पी--ढोंगी व स्वार्थी प्रवृत्तीमुळेच या भूमीत मार्क्सवाद रूजू शकला नाही. मार्क्सचे तत्त्वज्ञान आग्रही आर्थिक वर्गीय मर्यादांनी बंदिस्त असल्यामुळे मार्क्सवाद भारतीय दलित–समस्येवर सर्वकष विचार ठरत नसून तिच्या आर्थिक बाबतीत एका अंगाचा विचार करणारा असेल. म्हणून तो संपूर्ण व सर्वकष उपाय ठरू शकत नाही. यास्तव दलित समस्या सोडविण्यास मार्क्सवाद इथे अपेशीच ठरतो, अपुराही पडतो. मार्क्सवाद सर्वगामी असेल, पण तो इथे मूलगामी सिद्ध होत नाही, तो यामुळेच.

समाजपरिवर्तनाची–नवनिर्माणाची सारी जबाबदारी आज तरी दलितांच्या खांद्यावर आहे. दलितांच्या आज संघर्षरत्न असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक साहित्यिक चळवळीवर ती आहे. ती तशी शक्ती लावून पेललीही जात आहे. दलितांच्या साहित्यात समाजपरिवर्तनाचे फार मोठे सामर्थ्य असल्याचे आज सर्वमान्य आहे. कारण त्यांच्या सामाजिक चळवळीला आज तरी संघर्षलढ्याची प्रेरणा–उर्मी दलित साहित्यातूनच मिळत आहे. दलित साहित्य हेच मुळी चळवळकर्त्या 'निर्मितीशील कलावंतांची चळवळ' आहे. चळवळीचे धुरीण हे बहुतांशी लिहिणारे व लढणारे बंडखोर कार्यकर्ते आहेत. म्हणूनही दलित साहित्यातून वाङ्मयेतिहास घडविण्याऐवजी नवा विज्ञानमूल्यांकित युग–इतिहास निर्माण करण्याची जाणीव व जिद्द आढळून येते. हे सर्व आहे. पण अलिकडे दलितांच्या प्रत्यक्ष चळवळीमध्ये निर्माण झालेले वा होऊ पाहणारे व्यक्तिवर्तुळ भेद, विचार मतभेद, अहंमन्यता, व्यक्तिवाद आदि चळवळीला विघातक गोष्टीचे ताण पेलता–पेलता सर्वांचे समान उद्दिष्ट असल्याने तुकड्या तुकड्यानेही ते सर्व एक ध्येय प्राप्तीस्तव संघर्ष करीत आहेत, ही गोष्ट थोड्या समाधानाची पण

चिंतेची, मोठ्या खेदाची व गंभीर अशी बाब आहे.

आज दलितांच्या सामाजिक-साहित्यिक चळवळीमध्ये पडू पाहाणाऱ्या ह्या विपुलपणाच्या भेगा रूदावत जाण्यातून तिची संघर्ष मूलशक्ती क्षीण होण्याचा धोका आहे. त्याचे एक कारण दलित चळवळीचे मूल प्रेरणाकेंद्र बाजूला सारण्याचे–मारण्याचे प्रयत्न हे होय. हा इतरांचा प्रयत्न मारता येईल, जर दलित धुरिणांनी वेळेवर दखल घेऊन आपल्याही हातून आपल्या चळवळीचे हे केन्द्र सरकू दिले नाही तर, प्रेरणाभिन्न बनले नाही तर शेवटी दलित साहित्य हे आंबेडकरी प्रेरणेच्या संघर्षशील मनाचा आणि त्यांच्या क्रांतिसन्मुख सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील विचारमूल्यांचा व त्यातून घडलेल्या वैचारिक, मानसिक अभिव्यक्तीचा अवघा परिपाक आहे; आणि हे कुणालाही विसरता येऊ नये. हे विसरणे म्हणजे दलित साहित्यिकाने दलित जाणिव विक्रीला घालणे, आत्माभिमान गमावणे, प्राप्त संचित, स्वत्त्व व साहित्य–तत्त्वही हरविणे होय. आंबेडकर झाले नसते तर ? या प्रश्नात दलित साहित्याला लाभलेल्या आंबेडकरी प्रेरणेचे अनन्य-साधारण महत्त्व त्याचा प्राणच अंतर्भूत आहे. कार्ल मार्क्सच्या बाबतीत हा प्रश्न इथे उद्भवत नाही.

भारतीय वर्णजातिव्यवस्थेत असा अक्षरशः चिरडा गेलेला माणूस दलित समाज–साहित्याचे केंद्र आहे. ही भूमिका आंबेडकरी प्रेरणेची आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्रही तत्त्वज्ञानातूनच जन्माला आलेले दलित साहित्य, केवळ दलितांनी लिहिलेले नव्हे ते माणसाला केंद्र मानते,पण कोणत्या? क्रांतिविन्मुखता आणि क्रांतिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसाचा विचार करते. हा बंधमुक्त माणूस भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भातील आहे.[11] दलित साहित्याचा उदयच भारतातील या व्यवस्थानिर्मित सर्वांगीण शोषणाच्या अन्याय्य समाज परिस्थितीचे निर्दाळण करण्याच्या प्रेरणा-उर्मीतून दलित जीवनाच्या गर्भातच होतो. दलित दुःखाशी त्याच्या जन्माचीच अशी नाळ आवळून बांधली गेली आहे. माणसाला दुःखी कुरुप व बेढब करून सोडणाऱ्या येथील व्यवस्थेविरूद्ध या चळवळीचा म्हणूनच

पहिल्यांदा संघर्ष आहे. दलित साहित्य ' मानवत्त्वाची प्रतिष्ठा ' – हे सर्वश्रेष्ठ मूल्य शिरोधार्थ मानणाऱ्या एका विराट आंदोलनातून जन्मलेले आहे. आणि ते मानवी इतिहास, मानवाने निर्माण केलेल्या समाज-व्यवस्थेचे, धर्मव्यवस्थेचे मूल्यमापन करू इच्छित आहे. दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून उदयास आलेले साहित्य आहे! ' [12]

पण दलित चळवळीच्या महत्त्वपूर्ण साहित्य अंगाच्या बाबतीतही विचार–दृष्टीभेद डोकावू लागला आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील फक्त दलित अस्पृश्य फार तर भटके, रामोशी, आदिवासी–दलित ह्या जीवनाचे दर्शन ते दलित साहित्य, म्हटल्याने दलित साहित्याला मर्यादा पडते, त्याचा संकोच होतो, ते जातीयही बनते, आणि आंबेडकरी प्रेरणाही मग विशिष्टांची वर्तुळसीमित होऊन राहते, ही गोष्ट एकतर वाङमयाच्या अंतःविकासाला मारक ठरते, आणि दुसरे म्हणजे ' आंबेडकरांच्या व्यापक दृष्टीला त्याच्या विशाल व्यक्तित्वविचार तत्त्वज्ञानाला म्हणजे डॉ. आंबेडकरवाद'ला संकुचित करते, असा घेण्यात येतो. पण हा आक्षेपच संकुचित व दलित साहित्यचळवळीकडे बघण्याच्या ग्रहदूषित दृष्टीचा परिचायक आहे. असे मला वाटते. दलित साहित्याने पहिल्यांदा ' दलित ' जीवनाचे दर्शन घडविलेच पाहिजे. कोणत्याही साहित्यिकाला आपल्या व्यक्तित्त्वाचा, जीवनाचा, समाज देश परिस्थितीचा सांस्कृतिक–सामाजिक संदर्भ टाळताच येत नसतो. त्यातूनच त्याची एक जीवनदृष्टी, भूमिका वा जाणीव प्रकट होत असते.

दलित साहित्याने ही दलित जाणीव, जीवनदृष्टी व सामाजिक परिबंधाची संकल्पना स्वीकारली असल्यामुळे त्याला हे वैशिष्टच लाभते. दलित साहित्य हे समाजाचे प्रातिनिधीक स्वरूपाचे वाङमय असल्याने त्याला सार्वत्रिक स्वरूपही प्राप्त होते. दलित कष्टी व सामाजिक जाणीव त्याला आपल्या विशेषत्त्वाकडून व्यापकतेकडे, सामान्यत्वाकडून थोरत्वाकडे घेऊन जाते, विश्वव्यापक करते. तेव्हा तथाकथित विश्व-व्यापकतेच्या नावावर परप्रेरणांचा अस्थांनी फुगवटा करून दलितांच्या क्रांतिमूल्य विद्रोही वाङमयधारेला कुणालाही वाकवू म्हटल्याने वाकविता येणार नाही. दलित चळवळ आपली माऱ्याची छावणीची

जागा सोडणार नाही. हे खरे आहे, की आजचा सुशिक्षित सुविद्य दलित तरुण आर्थिक हितसंबंधासाठी वरच्या पायरीवर जाऊ इच्छितो. गेल्यावर तिथे तो गुंतलाही जातो. कधी कधी दलितांतील ब्राह्मण बनून त्यांच्यातच वावरतोही. मार्क्सवाद व ब्राह्मणासारखा पण एकंदरीने हा आम दलित माणूस 'वर' जाऊ बघतो–ते त्याच्या मनात एक जिद्द आहे म्हणून ती आर्थिक प्रश्नापेक्षाही बलवत्तर जिद्द म्हणजे समाज-जीवनात पूर्वी त्यास कधी न लाभलेली मानप्रतिष्ठा आणि सन्मानित व्यक्तिसुखाचा दर्जा मिळावा ही आहे. आणि हे स्वाभाविकच आहे. दलित चळवळीचे तरी 'माणसाला मानवत्त्वाची प्रतिष्ठा' मिळवून देणे यापरत्वे दुसरे कोणते सुंदर ध्येय असणार !

संदर्भ

१) डॉ. बी. आर. आंबेडकर 'बुद्धिझम आणि कम्युनिझम' (काटमांडू–जागतिक बौद्ध परिषदेतील भाषण–२० नोव्हेंबर १९५६)

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जातीव्यवस्थेचे निर्मूलन पृ. ६–१०सारांश (दलितांचे प्रबोधन प्रा गंगाधर पानतावणे)

३) श्रीमती नलिनी पंडित 'जातीयवाद आणि वर्गवाद' (सारांश–मुद्दे)

४) श्री. शरद पाटील– 'समाज प्रबोधन पत्रिका' नो. डि. पृ. ३९८–४००

५) श्री. मानवेंद्रनाथ रॉय 'नवमानवतावाद' (सारांश–मुद्दे)

६) श्री. राजा ढाले 'नाकेबंदी' प्रस्तावना

७) नलिनी पंडित 'जातिवाद आणि वर्गवाद' पृ. ११२

८) प्रा. बाळकृष्ण कवठेकर 'स. प्र. पत्रिका' मे–जून १९७९–पृ. १९९

९) प्रा. शरदच्चंद्र मुक्तिबोध 'द. वा. एक विचार' (युगांतर एप्रिल ७८ पृ. ३७ वरून उद्धृत)

१०) श्री. बाबुराव बागुल 'मायमराठी' डि. १९७५ पृ. ६८

११) प्रा. गंगाधर पानतावणे 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' –मनोगतातून

१२) प्रा. भालचंद्र फडके 'द. सा वेदना आणि विद्रोह'–पृ. १०

० ० ०

दलित चळवळ आणि जातीचे राजकारण

भारत हा जातिप्रधान देश आहे. जातिवैषम्य व जातिवितुष्टता हे या देशाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. येथील सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांत सामान्य माणसाला सर्वदृष्टीने अविकसित, संकुचित आणि ग्रहदूषित ठेवणाऱ्या जातिव्यवस्थेने भारतीय राजनीति क्षेत्रालाही दूषित करायचे सोडलेले नाही. भारताचे राजकीय क्षेत्र सुद्धा जातिनिरपेक्ष अजिबात राहिलेले नाही. याचे येथे होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीमध्ये अधिकच तीव्र प्रत्यंतर येते.

भारतीय समाज जाती–जातीने विभागलेला आहे. तथापि सामाजिक क्षेत्रात मात्र अलीकडे समाजवाद्यांच्या, कम्युनिस्टांच्या आणि दलितांच्या वर्ग / वर्ण / जाति विच्छेदक चळवळीही निर्माण झाल्या आहेत. त्या चळवळी या विषम समाज व्यवस्थेविरूद्ध उभ्या ठाकल्या आहेत. आपापल्या परीने त्या कार्यरत आहेत, हेही खरे पण दलित चळवळ वगळता तथाकथित भारतीय कम्युनिस्ट हे काही मार्क्सच्या

धोरणानुसार येथे 'जाती' ऐवजी 'वर्गलढ्याला प्राधान्य देतात किंवा दोहोचा समन्वय जोडून वर्ग–जाति अंताचा एकत्र लढा देऊन ते येथे नवी समाजरचना आणण्याचे स्वप्न बाळगतात तर येथील समाजवाद्यांचे लक्ष त्यांच्या दृष्टीने जुने ते चांगले आहे ते कायम ठेऊन जातिभेद दूर करण्यावर खिळले आहे. म्हणजे त्यांचा जातिनिर्मूलनाचा प्रयत्न हा आहे. त्या व्यवस्थेशी सामाजिक तडजोडीचा आहे. कम्युनिस्टांना निदान वाटते तसा–सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा नाही. दलितांची चळवळ मात्र त्यांच्या दृष्टीने सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी उभी ठाकली आहे. त्यांना जुन्या समाजव्यवस्थेशी तडजोड अजिबात मान्य नाही. कारण या माणसाचे सामाजिक शोषण व पिळवणूक करणारी, जुलूम–अन्याय करणारी आणि त्याचे सामाजिक, मानसिक, धार्मिक व आर्थिक अशा सर्वांगीण दास्याचे जीवन जगण्यास भाग पाडणारी आपली ही संपूर्ण समाजव्यवस्थाच माणूस घाती व क्रूर आहे, बेकाम आहे, असे दलितांना वाटते आहे. म्हणूनच तिला उलथून-उध्वस्त करून नवी व्यवस्था निर्माण करण्याचे दलित चळवळ ध्येय बाळगते. हे क्रांतीचे ध्येय आहे. कारण या चळवळीला लाभलेली आंबेडकरांची प्रेरणाच बलवान व त्रंडखोर असल्यामुळे तिने या समाजाची क्रांतीला हवी असलेली एक मानसिकता निर्माण केली आहे. समाजाच्या नवनिर्माणासाठी माणसाच्या सर्वांगीण अधःपतनास कारण ठरलेली ही जी वर्ण-जातिव्यवस्था तिचा अंत करण्यासाठी दलित चळवळीने येथे विद्रोहाविरुद्ध पहिल्यांदा विद्रोह पुकारला आहे. दलितांच्या दृष्टीतून गेल्या दोन हजार वर्षांपासून दलिताला ' दलित ' ठेवणारी, अस्पृश्याला अस्पृश्यच– आणि त्याला शारीरिक, मानसिक सर्व तऱ्हेने गुलाम करून ठेवणारी ही सामाजिक, धार्मिक व्यवस्थाच मुळात मग्रूर आहे, जिने समाजात जातियवादी वृत्तीचे, अन्याय–अहंकारी व वर्चस्ववादी वृत्तीचे पोषण केले आहे. तिचाच आधी विच्छेद केला पाहिजे, असे जे दलितांना वाटते, ते स्वाभाविक आहे, न्यायसंगत आहे असे वाटते. ज्यांना असे वाटत नाही, त्या प्रस्थापितांचा विरोध पत्करून आज दलित चळवळ क्रांतीचा मागोवा घेत डोळसपणे पुढे जात आहे, असे दिसते.

पण असे असले, तरी दलित चळवळीला पुढे जाण्यामध्ये अडथळा आणणारे विपर्यस्त तत्त्व याही चळवळीच्या अंतर्गत निर्माण झाले आहे आणि ते तत्त्व जातीय भावनेतूनच आले आहे, असे म्हटले जाते. म्हणजे जात मोडण्याकरिता जिने लढा उभारावा त्या चळवळीला जातीयतेच्या संसर्गजन्य रोगापासून मुक्त होता आले नाही. असा प्रस्थापितातील विरोधक प्रमाणे दलितातीलही काही समाजापासून दुरावलेले 'असंतुष्ट' गट ठप्पा ठेवताना दिसतात. तो असा की दलित चळवळीची जी प्रेरणा त्या डॉ. आंबेडकरांना महार समाजाने आपल्या समाजापुरतेच मर्यादित करून टाकले आहे. आंबेडकर म्हणजे त्यांची जशी खाजगी मालमत्ताच लागली आहे. त्या महापुरुषाला असे संकुचित करणे ही जातीय भावना नव्हे काय ? हे म्हणणे अर्धसत्य आहे. म्हणजे एकदम खोटे नाही आणि पूर्ण सत्यही नाही. दलित महार समाजाने दलितातीलच ढोर, चांभार, भंगी, मांग आदी समाजाला आपल्यापासून दूर लोटले आणि बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे फक्त आपलीच प्रगती करून घेतली. या तथाकथित 'असंतुष्ट'दलित गटाच्या म्हणण्यात ही जी खंत दिसते,त्याचे कारण असे-

दलित समाज हा आज एकसंघ संघटित राहिला नसून सामाजिक व राजकीय क्षेत्रात गटागटात विभागलेला आहे, हे खरेच आहे. राजकारणात तसे समाजकारणातही प्रत्येक गटाने डॉ. आंबेडकरांना 'माझा खरा आंबेडकर' केला आहे. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचे व्यक्तित्व, विचाराचे आणि त्यांच्या नावाचे भांडवल करून आपणच या समाजाचे, पार्टीचे खरे नेते, पुढारी कसे, याचा खटाटोप चालविला आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या मूलभूत व्यापक अशा सामाजिक राजनैतिक तत्वज्ञानाला येथे मुरड घातली जाते. आंबेडकरांना संकुचित केले जाते. हे खरे असेल, तर त्याभागच्या कारणाचा आपण अंतर्मुख होऊन विचार करायला पाहिजे. असे दिसते, की या समाजात इतरांच्या तुलनेत चढाओढ फार आहे. त्याचे कारण वर्षोनवर्षे हा दलित–अस्पृश्य समाज उपेक्षित नि आत्मवंचित ठेवला गेला आहे. त्यामुळे आता संधी येताच स्वभावतःच प्रत्येक व्यक्ती–व्यक्तीमध्ये, गटागटांमध्ये सर्वांच्या पुढे आपण कसे व केव्हा लवकर पोहचू, ही

आपसात अहमहमिकेची, चढाओढीची भावना निर्माण झाली आहे. आपसातील कुठलीच स्पर्धा कुणालाच (एकूण समाजाला) पुढे जाऊ देत नाही. पुढे घाईने जाऊ इच्छिणारे शेवटी व्यक्तिद्वेषाच्या नि हेव्यादाव्याच्या दावणीत अडकले जातात. त्यामुळे संघटनेसाठी हवा असलेला आपसातील सुसंवाद नाहीसा होऊन तेथे विसंवाद निर्माण होतो. विसंवादातून विपर्यात आणि त्यातून वाढत जाणारे कटू विपर्यास (विग्रह) शेवटी सामाजिक विघटनाला, विभाजनाला कारण होत असतात, हे दलित समाजाने समजून घेतले पाहिजे. मात्र या आपल्या आत्मघातक वृत्तीचे बलितांना अद्याप आकलन झालेले नाही, असेही नाही. हे कळते आहे–वळायला थोडा वेळ लागणार आहे.

येथे हा मुद्रा गृहीत धरला तरी त्याचा दलित समाज जातीयवादी आहे आणि त्याने जातीय भावनेतून डॉ. आंबेडकरांना संकुचित केले आहे,–असा अर्थ आपल्याला मुळीच करता येणार नाही. या विभाजित समाजाच्या दुभंगलेपणात सुद्धा एका समताधिष्ठित, जातिविहीन समाजाच्या नवनिर्माणाची आकांक्षा सर्वांच्यामध्ये समान आहे. सर्वांमध्ये ही एकवाक्यता आहे, या समाज जागरणाला त्याच्या सृजनशीलतेला आंबेडकरी जाणीवच सर्वांना सारखीच प्रेरक ठरली आहे. हे निर्विवाद सत्य आहे. ती जाणीव बंडखोर आहे. आंबेडकरी जाणिवेतूनच दलितांना नव्या समाजनिर्मितीसाठीच्या लढ्याचे नवे विद्रोही तत्व नि तंत्रमंत्र गवसले आहे. या अफाट दुःख अनुभवलेल्या अस्पृश्य माणसाला आता अस्पृश्यतेच्या दुःखाची धगधगती जाणीव झाली आहे. दुःखाच्या सर्व जाणिवेतच क्रांतीची बीजे असतात. माणुसकीच्या पोटीच अमानुष्कीविरुद्ध संघर्षाची चेतना असते, इतर कोणत्याही समाजात नसेल, ते या जुलूम–उपेक्षा–अन्याय सोसणाऱ्या समाजामध्ये न्यायाची चाड व अन्यायाची चीड तीव्र स्वरुपात असल्याचे आढळून येते. ही संघर्षाची, क्रांतीची जाणीव त्यांच्यात खरोखर ज्वलंत आहे. समता, न्याय मानवतेच्या हा अक्षरदुवा दलित समाजाने आपल्या दुभंगलेपणातही मजबूतपणे धरून ठेवलेले आहे, हे कोणालाही नाकारता यावयाचे नाही.

या दृष्टीतून–म्हणूनच येथे कोणी संकुचित म्हटल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुचित होत नाहीत– संकुचित केले जाऊ शकत नाही. माणुसकीच्या मूलभूत हक्कासाठी आणि समता–न्यायाच्या प्रतिष्ठापनेसाठी अन्याय विषमतेविरुद्ध डॉ. आंबेडकर प्रणीत सामाजिक लढ्याच्या क्रांतीप्रवण विचारांची आज सर्वांनाच गरज आहे. पण त्यांना काही 'असंतुष्टांनी' अजूनपर्यंत स्वीकारलेले दिसत नाही. आंबेडकरी विचारातील त्या क्रांतीमूल बीजतत्वाची ओळख आजही दलित समाज सोडून इतर समाजाला झालेली दिसत नाही. त्यात महारबौद्ध समाजाचे हे आकलन तर अधिक सूक्ष्म तेवढेच तीव्र आहे, हे खरे आहे. 'असंतुष्टांच्या' दृष्टीतून दलितांनी कदाचित डॉ. आंबेडकरांना संकुचित केले असेल, पण त्यांचे खरे पाणीही जोखले आहे. थेंबाथेंबावरून बाबासाहेब आंबेडकरातील महासागर दलितांनाच सर्वप्रथम ओलांडता येण्यासारखा आहे. इतरांना नव्हे ! म्हणून हे संकुचित म्हणणे–वगैरेच संकुचितपणाचे आहे. असे आक्षेप पाण्यात न शिरता न भिजतात काठावरून उडविलेले शितोडे आहेत. त्यातून दलित समाजातील त्या असंतुष्ट गट–जमातीचे भित्रे पलायनच सिद्ध होते.

दलितांतील ज्या काही गांधीमेड हरिजनांनी आंबेडकरांना अजूनपर्यंत स्वीकारलेले नाही. त्यांना 'आंबेडकर' कळणार कसे ? आंबेडकरांचे धर्मांतर रुचणार कसे ? हे लोक बुद्धिवादी असण्यापेक्षा देवधर्म–रूढिवादीच राहिलेले आहेत. बुद्धीने विचार केल्याशिवाय बुद्ध आणि बुद्धाचा धम्म आकळणार नाही, तो पारंपारिक देवादिकांच्या अद्‌भुत चमत्कारावर व अंधश्रद्धेवर पोसलेला ईश्वरी धर्म नाही, तर माणसाचा–अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी असलेला एक विशुद्ध मानवीय जीवनमार्ग आहे. हे केवळ देवधर्म–भावनेच्या भोवऱ्यात अडकून पडणाऱ्यांना कळणार नाही. देवधर्माची झापडं दूर सारून सामाजिक–धार्मिक रुढीच्या 'शोषण चक्रातून' त्यांना बाहेर पडताच आलेले नाही.काही अपवाद वगळता तसा त्यांनी प्रयत्न केला आहे, असेही आढळत नाही. दलित अस्पृश्यांमधील हे काही लोक (त्यात भंगी, चांभार, मांग जमातीचे लोक खरे म्हणजे चपलीच्या खिळ्याप्रमाणे

प्रस्थापित धर्मरुढीशी पक्के गाठले गेले आहेत. त्यांना ही रुढी परंपरा तोडण्याची आजपर्यंत गरजच भासली नाही, – इतके ते पारंपारिक धर्म–कर्मकांडाचे गुलाम होऊन आहेत. हे खरे कारण आहे. बिचारे ते या धार्मिक, सामाजिक व्यवस्थेच्या कैचीत सापडले आहेत. वरून खालून दाब पडला, की ते आता म्हणतात– ' दलित बौद्ध समाजाने आम्हाला जवळ केले नाही. स्वतः पुढे गेले. आम्हाला दूरचे दूरच ठेवले '. वरील संदर्भ लक्षात घेता या म्हणण्यात अर्थ उरत नाही, जुनी चाकोरी सोडून आणि नव्या विज्ञाननिष्ठ विचारांचा, नव्या जीवनमूल्यांचा, बुद्धिवादाचा स्वीकार करून दलित बौद्ध समाजाच्या जवळ येण्याचा आपण कधी प्रयत्न केला आहे काय, याचा अंतर्मुख होऊन त्यांनी विचार करायला पाहिजे.

हा विचार झालेला नाही– होत नाहिये. दलितांमध्ये पडलेल्या फाटाफुटीत ही आणखी भरच आहे. आपण म्हटल्याप्रमाणे दलित चळवळीत व्यक्तिस्पर्धेच्या भावनेतून किंवा पदलालसेतून आपसात मतभेद, प्रतिवाद असतील, पण वैचारिक तात्त्विक संबंधात मात्र चळवळकर्त्यांमध्ये एकवाक्यताच आढळून येते. त्यांच्यात एक मत–एक माणूस–एक मूल्य ' प्रमाण मानणारा समान ध्येयवाद आहे. पण या ध्येयवादापासून दूर राहिलेले ' हरिजन ' बांधव आणि दलित बौद्ध यांच्यामध्ये तात्त्विक वैचारिक मतभेदाबरोबरच मूळ सामाजिक व मानसिक मतभेद तीव्र आहेत. निदान अस्पृश्य म्हणून तरी त्यांच्यामध्ये एक भावनेतून मतैक्य असलेले दिसत नाही. अस्पृश्यातील भंगी, चांभार असो की महार, मांग असो, त्याची सर्वत्र सारखीच अपेक्षा केली जाते. सामाजिक काय किंवा राजकीय क्षेत्रात काय, कितीही लायक व्यक्ती असली तरी येथील हिंदूनिष्ठ प्रवृत्ती तिला पुढे येऊ देत नाही. हा एक इतिहासच आहे. त्या इतिहासाचा कटू अनुभव आपण लक्षात घेत नाही म्हणून त्या नको त्याच त्या इतिहासाची आज पुनरावृत्ती होते आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची घटना लिहून या देशाचे भवितव्य घडविले ज्यांनी या देशाला उज्ज्वल स्वप्नांचा साक्षीभूत आकार दिला, त्या भारताच्या

राजनीतिकुशल शिल्पकाराचा, एका दूरदृष्टीच्या सर्वंकष नेतृत्वाचा, त्या विद्वान महामानवाचा (आयुष्यभर छळ, अवमान तर केलाच) येथील जातीयवादी राजकारणाच्या प्रवृत्तीने १९५१च्या निवडणुकीमध्ये पराभव केला. डॉ. आंबेडकरांच्या महान समाज कार्याची, राष्ट्रकार्याची जिथे अशी अवहेलना, संभावना केली जाते, तिथे येरे माझ्या मागल्या पैकी अलबत्या गलबत्याची कथा ती काय ? तात्पर्य, येथील जातिवादी राजकारणाने अस्पृश्यातील कुणालाच अपमान अवहेलनेपासून वाचविलेले नाही.

आपल्या येथील श्री. जगजीवनरामांचीच गोष्ट घ्या. धार्मिक, सामाजिक बाबतीत ज्यांनी हिंदुत्वाशी आपले इमान जन्मभर कायम राखले आहे, उभी हयातभर ज्यांनी राजकीय सत्तासुखे व सत्तास्थानेही उपभोगिली आहेत, सत्ताधारी पक्ष निष्ठाही ज्यांनी प्राणपणाने जपल्यात त्या मा. जगजीवनरामांच्या याची डोळा याची जन्मी कोणते सन्मानाचे फळ पदरात पडले आहे. आणिबाणीच्या काळात तशीच हक्काची संधी आली असताना आणि अधिकृतरीत्या पात्र असतानाही जेष्ठ राजकारणी जगजीवनबाबूंना केवळ अस्पृश्य म्हणून एक महिन्याकरिता, काय एक दिवसाकरितासुद्धा पंतप्रधान होऊ दिले गेले नाही. ही गोष्ट काय दर्शविते ? त्यांचाच मागचा एक प्रसंग अतिशय बोलका आहे. मा. जगजीवन बाबूनी संपूर्णानंदा या पुतळचाचे उद्घाटन करून हार घातला होता. पण त्यांच्या पापी अस्पृश्य हातांनी तो पुतळा बाटला, धर्म बुडाला म्हणून त्यांच्यामागे लगेच हिंदूंनी पंचगव्य करून त्या पुतळचाचे शुद्धिकरण करून घेतले होते. या घटनेचे मर्म काय ? हिंदूंचा हिंदुधर्म मग हिंदुनिष्ठ जगजीवनरामाचा कोणता ? आणि तरीही जगजीवनराम (व अनुयायी) हिंदु धर्म संस्कृतीशी एकनिष्ठ आहेत ! हा सारा इतिहास ताजा आहे. तो आपण का विसरतो, कळत नाही.

या देशातील माणसाला माणसाचे जीणे नाकारणारी व भेदभावाची जननी असलेली अस्पृश्यता, जातीयता गेली आहे काय ? ती अजूनपर्यंत न संपण्याचे कारण काय ? डॉ. बाबासाहेबांनी आवर्जून

सांगितले आहे. की या जातिव्यवस्थेने माणसाला संकुचित, आंधळे, दुबळे करून टाकले आहे. इथला माणूस माणसावर प्रेम करीत नाही. आपल्या जातीवर करतो. कुठलाही समाजसेवक किंवा राजकारणी माणूस उघड गुपीत जातीचेच राजकारण खेळत असतो. त्याच्यापुढे समाजहितापेक्षा आपल्या जातीचे, जातिगटाचे हीत पहिल्यांदा उभे राहते. जातिवैषम्याच्या या दूषित भावनेपासून एकही समाज सुटलेला नाही. याचे कारण काय? याचे मूळ कारण या धर्मरुढीत नि वर्ण जातिव्यवस्थेत दडलेले आहे. आपल्या या धर्मसंस्कृतिपरंपरेने आणि समाज व्यवस्थेने विशिष्ट समाजाला उदारपणे बहाल केलेल्या वर्चस्ववादी वृत्तीमध्ये ते कारण आहे. आपल्या सामाजिक हक्काच्या, सामाजिक समता व न्यायाच्या प्रस्थापनेच्या किंवा राजकीय सत्ता (निवडणुकीद्वारे) संपादण्याच्या संदर्भात केवळ अस्पृश्यच नाही, तर अस्पृश्यांसकट आपण सर्व अल्पसंख्यांक मागास जमातीचे सर्व लोक आपसामधील माणूसभेद, समाजभेद गटभेद, पक्षभेद विसरून एकदिलाने व एकध्येयाने एकत्र येणे, एकजूट करणे नितांत आवश्यक आहे. ही आजची काळाचीच गरज आहे. असे झाले नाहीतर ही माजोर झालेली जातीयवादी वर्चस्ववृत्ती या भूमीतून कदापि हटणार नाही. परिणामतः आपली सामाजिक, धार्मिक आर्थिक व राजकीय क्षेत्रात चाललेली, होरपळ, निघणारी परखड पिळवणूक कधीच थांबणार नाही.

या समाजात आपल्या अल्पसंख्य गटाला एकएकटे पाडून सत्तेच्या पायाखाली चिरडणे, कुचलणे सत्ताधारी वर्गाला अतिशय सोपे असत. या दृष्टीने दलित समाजात आपापसात पडणारी फूट, दुही त्यांना हवीच असते. त्याशिवाय जातीय फाटाफुटीच्या किंवा 'फोडा व झोडा'च्या जातीयवादी राजकारणाच्या 'खेळी' हा सत्ताधारी वर्ग बेमालूमपणे खेळत असतो. हे बुद्धिपूर्वक लक्षात घेऊन आणि आपण सर्व एक होऊन आता सावध झालं पाहिजे. आपला (समाजाचा) आपण अंतर्मूखतेने विचार केला पाहिजे. वर्तमान सामाजिक व राजकीय परिस्थितीत आपण नेमके कुठे आहोत, यावर डोळसपणे आत्मपरिक्षण

व समाजनिरिक्षण झाले पाहिजे. एका कवीने वर्तमानाचा वेध घेऊन मोठा मार्मिक सुंदर इशारा दिला आहे पहा–

नव्याने जातधर्माची पुन्हा ही साथ आली रे
तयांचे ' नायटे ' थोडे नखांनी खाजवा आता . . . .
लुटारु मात्र देशाचे फुलांनी सजवा आता
गरीबी पाहिली नाही अशांना सांगतो थोडे
अमीरी दाखविण्यासाठी भिकारी गाजवा आता .

सुखाने नांदण्यासाठी नसे हा देश गांधीचा । म्हणोनी देश-द्रोह्यांनो दुही ही माजवा आता विरोधी बोलतो तेव्हा चिडाया लागले वैरी । म्हणाले ठार माराया सुरा तो पाजवा आता (रामदास कुहीटे)

यातील उपरोधगर्भ अर्थ आपण नीट समजून घेतला पाहिजे. कोणतीही गोष्ट अभ्यासपूर्वक बुद्धिपूर्वक समजून घेतल्याशिवाय केलेली टीका ही आपल्या मूर्खपणाची सोय असते किंवा अज्ञानग्रस्तेतून धरलेले अडाणढोंग तरी असते. अंधश्रद्धा, अज्ञान कधीतरी दूर करता येईल. झोपलेल्याला जागे करता येईल. पण झोपेचे बिनघोर सोंग घेणाराला उठविणे कठीण असते.

o o o

दलित साहित्य : एक हत्यार !

समाज बदलतो, याचा अर्थ समाजात राहणारा माणूस वाणी-करणीने व आचार-विचाराने बदलत असतो आजचा विचार उद्या बदलतो. पण आजचा विचार उद्या बदलतो–म्हणजे प्रत्येकाचा तो वाढतो-प्रगल्भ होतोच, असे नाही. (उलटच्या दिशेने वाढतो) तो वरवरून तसा प्रगल्भ, पुरोगामी, सामाजिक जाणिवेतून वगैरे केलेला दिसतो. एखाद्या वेळी तो नव्या समाजपरिवर्तनाच्या मूल्याचा, देशाच्या नवनिर्माणाचा 'व्यापक' (?) वगैरे नुसता 'उच्चार' असू शकतो. पण आतून हेतूपुरस्सरपणे आपल्या जुन्याच संकेतांच्या साच्यामध्ये तो नव्या परिवर्तनाचा विचार बसवू पाहतो. त्यातून शेवटी एक दुराग्रही विकृत दृष्टीकोणच प्रकट होतो.

याप्रकारे एखाद्या सामाजिक वा साहित्यिक चळवळीकडे प्रारंभी-पासूनच पाहण्याचा एखाद्याचा दृष्टीकोण विकृत वा तिरळा असतो व तो नंतरही तसाच कायम राहतो. याला कुणाचा इलाज नसतो.

त्या आपल्या दृष्टीकोणातून सामाजिक परिवर्तनाच्या किंवा

लोकशाहीच्या मूल्यांच्या–(प्रस्थापना व्हावी, हे तर द. सा. चे उद्दिष्टच) अशा मोठ्या संदर्भात दलित साहित्याला लहान, खुजे दाखविण्याचा आजचा हा प्रयत्न तसा नवा नाही. सुरुवातीपासूनच अशी दूषीत दृष्टी मधेमधे आपले तोंड पाखडीत आली आहे. अर्थात, मनात पोसलेल्या एका खुमखुमीतून– साऱ्या देशाच्या, समाजाच्या तथाकथित शुद्ध तळमळीने वा नुसत्याच खोट्या व कोरड्या तटस्थपणाने–कशी का असेना, ' नवी मूल्ये-नव्या परिवर्तना 'च्या संदर्भात आरोपक दलित साहित्याची दखल तर घेतात. म्हणजे– पहिल्यांदा त्यांना हे साहित्य एक नवे समाजमूल्य-नवे जीवनमूल्य आहे, हे नाकारताच येत नाही आणि आजच्या सामाजिक परिवर्तनाचे ते महत्त्वाचे प्रेरणामूल्यही आहे– एक हत्यारच आहे, हे मान्य करूनच त्यांना ही पहिली दखल घ्यावीच लागते.

या परिवर्तनवादी दलित साहित्याचे पुरोगामित्व सर्वसिद्ध व सर्वमान्य झाल्यानंतर त्याच्याकडे केवळ छिद्रान्वेशीपणाने पाहणारी दृष्टी समाजमनात काय पेरू इच्छिते, हे उघडच आहे. अर्थात, त्यातील वरवरून प्रगत, पुरोगामी वाटणारा विचार हा पिच्छेगामीच नेणारा मात्र आहे. एवढेच नव्हे, तर तो समाजमानसात विनाकारण वितुष्ट-पणाचा विष–खल निर्माण करणाराही आहे. नाहीतर ' वास्तवाच्या ' खऱ्याखोट्या नावावर (' दलित ' वास्तव समजून न घेताच) दलित कवितेला ' अनीतिमूलक व लोकशाहीविरोधी प्रवाह ' संबोधून ' मराठवाडा कांड, गुजराथचा हिंसाचार ' – तिथे अस्थानी कशाला फुकट मरायला उपटला असता ? –अरे, ह्या राजकारणाच्या भीषण बेतुक्या ' खेळी 'शी दलित कवितेचा संबंध काय ? तिने त्यांचे किती हत्ती–घोडे मारलेत ?

दलित कविता अगोदर एक कविता आहे. तिला कालच्या काय, आजच्या काय, जळजळत्या सामाजिक वास्तवाचे भान आहे. दुःखाची ज्वलंत जाणीव आहे. तिला कालचा–आजचा सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ आहे. हा सारा संदर्भ तिचा आशय आहे. विषय आहे. जीवनात ह्या कवि–मनाने जे अपार दुःख पाहिले, अनुभवले अथवा जाणिवेतून ते

जगले, त्या दुःखाला, व्यथावेदनेला पहिल्यांदा येथील देवधर्मरूढी प्रामुख्याने कारणीभूत आहे हे त्याने जाणले म्हणून हे कविमन पहिल्यांदा देवधर्मावर उखडते. रुढीचे धिंडवडे काढते. ' परमेश्वरा ' वर थुंकते. ' आत्म ' नाश करणाऱ्या ' आत्म्याला ' व ' दैवाला ' ही झोडपते. हे ' कर्मविपाका ' चे कठोर देणे आभाळातून आले आहे काय?

तर जे काही हे कृतक व पीडक आहे, याला केवळ भारतीय धार्मिक-सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती, प्रवृत्ती व तिला जपणारी आजची स्थितीशील म्हणजे प्रतिगामी वृत्तीच कारण आहे, मग येथे ख्रिश्चन, शीख वा इस्लामी देवधर्माचा संबंध येतोच कसा ? भारत वगळता जगातल्या कुठल्याही खऱ्याखोट्या 'देवधर्माने'रूढीने माणसाला असे इतके नागवले नसेल. इतके उपेक्षिले-ताडले नसेल, सतत हजारो वर्षे. याने इथे तर माणुसकीचा मुडदाच पाडून ठेवला. तरी त्या परधर्मियांशी वैर धरण्याचे, असहिष्णुता बाळगण्याचे दलित कविता साहित्याला कारणच काय ? दलित कविता दुसऱ्या कुणाचा कशाला अधिक्षेप करील-अवमान करील ?

हा प्रकार उघड उघड-मार खाऊन उघड्यावर पडलेल्या व्यक्तीने इतरांकडे मदतीसाठी ओरडावे, असाच केवळ नसून या निमित्ताने दलितांविरुद्ध ' इतरांनाही ' चिथावण्याचा आणि त्यांच्या आपसात कटू वैमनस्य निर्माण करण्याचा अत्यंत विषारी प्रकार आहे, हे स्पष्ट आहे, हा विष-प्रचार निव्वळ वैरभावातून केलेला कुजट अपप्रचार असून दूषीत ग्रह-द्वेषाने पछाडलेल्या मनोवृत्तीचे हे भ्रमिष्ट लक्षण आहे. 'दुखते कुठे व शेकते कुठे' - असलाच हा प्रकार.

दलित साहित्य हे विद्रोही साहित्य खरेच. ते लढाऊ प्रवृत्तीचे क्रांतिकारी साहित्य आहे. विद्रोह म्हणजे विरोध. पण हा विरोध केवळ विरोधासाठी नसून अंतिमतः विधायकतेसाठीच आहे. या विद्रोहामागे भरपूर काळीकुट्ट अशी पार्श्वपरिस्थिती उभी आहे, हे दृष्टिआड कसे करता येईल ? दलित साहित्यामधील विद्रोह–क्रांतिमूल विरोध हा वैरभावातूनही असू शकतो. आहे. पण हे वैर आहे ते कोणाशी ? माणसाशी ? – नाही. दलित साहित्याचे वैर आहे, ते विषमतेशी,

अस्पृश्यतेशी, जातिभेदाशी आणि वर्ण-जातीयवादी भावनेशी, अन्यायाशी, शोषणप्रवृत्तीशी त्याचा लढा आहे. अंधरूढी, अंधश्रद्धेशी, साऱ्या अशुभाबरोबर, कुरुपाबरोबर, दुषीत व दुष्ट ढोंगी प्रवृत्तीबरोबर त्याचे वैर आहे. एकूण ह्या एककल्ली, वर्चस्ववादी, समाजविघातक प्रवृत्तीविरुद्ध दलित साहित्य विद्रोह पुकारते. माणूस म्हणून अखिल माणसाबरोबर त्याचे वैर असण्याचे कारण नाही, तर माणसातल्या अमानुष्कीविरुद्ध ते झुंज देते. थोडक्यात, हा विद्रोह किंवा विरोध (वैर) व्यक्तिविरुद्ध नसून प्रवृत्तीविरुद्ध आहे. आता येथील ढोंगी मार्क्सवादी किंवा गांधीवादी, यांचा सामाजिक संदर्भात दलित कवितेतून क्वचित कुठे अधिक्षेप होत असल्यास, त्यात व्यक्तिद्वेष नसून प्रवृत्तीद्वेषच आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पण- - समाजोत्थानाची व विकासाची प्रेरणा देणारे दलित साहित्य ' वैरभावी साहित्य ' म्हणून संबोधण्यात वैरभावाशिवाय त्यात दुसरा काय मतलब आहे ?

ह्या सगळ्यातून दलित साहित्य व साहित्य चळवळीबद्दल दलितेतरांचे वाईट, गैरमत करण्याचा उघड प्रयत्न तर आहेच, पण प्रत्यक्ष सामान्य दलित जनांचीसुद्धा दिशाभूल करण्याचा त्यात स्पष्ट हेतू आहे. दलित विद्रोही कवितेतून रंगविलेली ' हरिजनांची ' स्थिती नव्या मूल्यांना व परिवर्तनाला मारक आहे'–हे विधान त्या हेतूसाठीच.

येथे पहिल्यांदा " हरिजन "हा अशुद्ध शब्दप्रयोगच साहित्याच्या संदर्भात ' जातीयवादी ' शब्द आहे. ' हरिजन ' शब्दाची उत्पती, व्याप्ती व अर्थ-परिभाषा यात मोठे अंतर आहे, हे प्रस्तुत लेखकाला माहित नाही काय ? 'दलित' साहित्याला पुढे ' हरिजन साहित्य ' ही तो म्हणेल. ' बौद्ध–साहित्य ' म्हणणार नाही.

येथील सामाजिक व वाङ्मयीन संदर्भात दलित साहित्याला आता-आताचा हिंदूनिष्ठ राजकारणातून आलेला गांधीचा ' हरिजन ' हा शब्द मुळीच मान्य नाही. तो उपरा शब्द आहे, म्हणून त्याची संकल्पना या साहित्याला भावणारी नाही. अधिक विश्लेषणाचे हे स्थळ नाही ' दलित ' शब्दाबद्दलसुद्धा येथे एवढेच सांगता येईल, की – दलित साहित्यातील ' दलित ' शब्दाला एक अतिशय व्यापक असा सामाजिक,

सांस्कृतिक इतिहास आहे. त्याला विश्वव्यापक दुःखाचे–वेदनांचे मूल्यगर्भ अधिष्ठान आहे. (दुःख-भावना सार्वत्रिकच असते) म्हणूनच आज या साहित्याला साहित्य म्हणून तेवढाच व्यापक, सर्वस्पर्शी अर्थसंदर्भ व आशयमूल्य प्राप्त झाला आहे. याप्रमाणे भूतकालीन इतिहासाचा सामाजिक–सांस्कृतिक संदर्भाशय (धर्मवाङ्मयाचा) घेऊन दलित कविता पहिल्यांदा उभी राहते, ती कशासाठी ? तिला नवी मूल्ये व नवे परिवर्तन नको आहे म्हणून ? नव्या परिवर्तनशील मानवीय तत्त्वज्ञानाची विज्ञान-निष्ठ विचाराची दलित साहित्याच्या मागे एवढी भक्कम बैठक उभी आहे, की- ' ती परिवर्तनाला मारक आहे ' असे म्हणणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे परिवर्तनालाच हसण्यासारखे केवळ हास्यास्पद आहे.

दलित साहित्य –(कविताही) पहिल्यांदा कालच्या जीवन-चित्रणाच्या पृष्ठभूमीवरच वर्तमानाचा वेध घेऊन उद्याच्या उज्ज्वल स्वप्नांचा आविष्कार करीत आहे. साक्षात्कार घडवित आहे. हे संपूर्ण दलित साहित्य समजून घेतल्याशिवाय प्रत्ययाला येणार नाही. पण प्रस्तुत लेखाच्या विद्वान लेखकाने फक्त सोयीनुसार काही कविताच तेवढ्या वाचल्या असतील, असे दिसते. त्याने दलित कथा, कादंबरी, आत्मकथने असा सर्वांगीण अभ्यास करून आपली मते मांडली असती, तर कदाचित ही पाळी आली नसती.

तथापि, कालचे जीवनचित्रण, जुनाच संदर्भ–जुनाच आशय–याबद्दल लेखकाला वाटणारी खरीखोटी तळमळ (– की खंत ?) लक्षात घेऊनही असे म्हटले पाहिजे. की नुसतेच भविष्य-स्वप्ने रंगविण्याच्या वा वर्तमानकालीन निरस स्वप्नाळूपणाच्या हव्यासापोटी पूर्वपिढ्यांचे दुःख लपविण्याने आजच्या जीवनाची घडी पूर्ण दुरुस्त होऊन गेली. या जीवनाची दुःख–व्यथाच पार नाहीशी झाली असे होत नाही. त्यासाठी ही समाजव्यवस्थाच अगोदर बदलावी लागते.

दुसरे, पूर्वजीवनाचे दुःखदर्शन (दलित संदर्भात), -दुःखजाणीवही आज–अवस्थेतील जीवन जाणीव, दलित, सामाजिक जाणीव जीवंत ठेवते. दुःखाची जाणीव जागृत व जिवंत असल्याशिवाय विद्रोहाची ठिणगी चेतविता येत नसते. विद्रोहाशिवाय क्रांती आणि क्रांतीच्यानंतर

येणारे परिवर्तन मग अशक्य होते. हे सर्व अपरिहार्य टप्पे लक्षात घेतले नाही, तर आपलीच जीभ शेवटी टाळ्याला लागते. तात्पर्य, दलित संदर्भात-कालच समाजवास्तव हे आजचेही समाजवास्तव आहे. ते चांगले 'जिवंत' आहे. कारण ही चिवट व्यवस्था व तिची वृत्ती आजतागायत अपरिवर्तनीय ठरली आहे. ही व्यवस्थाच कारण–म्हणून बाबूराव बागुलांच्या 'कवितेचा जन्म' या कथेतल्या जीवनात अस्वच्छता आहे. दारिद्र्य उपासमार आहे. दुर्भिक्षता व दुःखाचा भीषण कल्लोळ आहे पण त्याला जबाबदार कोण आहे ? त्या कथेतील प्रक्षोभक व भयानक जीवनदर्शन हे कालचे नव्हे, आजचे–आजचे जीवनवास्तव आहे. दलित 'कवितेच्या जन्म' संबंधाने बागुलांना काय सांगावयाचे आहे, त्यांचा कशावर प्रहार आहे, हे समजून घेतले असते तर– ?

याच दृष्टीतून यशवंत मनोहरांची 'कालचा पाऊस' असो की-केशव मेश्रामांची 'बंद दरवाजे' किंवा 'आईवरून परमेश्वराला-शिवी असो, त्यात आलेले वास्तव आज अजिबात नसेल, तर प्रश्न नाही. पण आजही जर ते तसेच कायम असेल, तर प्रस्तृत विद्वान साहित्यिकाचे मत कसे डोळेझाक करणारे किंवा अभिरुचीशून्य आणि साहित्य-मूल्यहीन आहे. हे सांगायला नको.

आपल्याला हवी तीच कामापुरती व सोयीची चारदोन उदाहरणे दिली म्हणजे काही संपूर्ण दलित समाजाचे 'निकोप परिवर्तन' घडून आले व होत आहे, असा अर्थ होत नाही. ते अंश-सत्य असू शकते. आजचे काही प्राध्यापक कवी, लेखक किंवा चार-दोन शिकलेले बँकेचे बाबू वा साहेब लोक वगैरे आर्थिकदृष्टया थोडेफार सुधारले असतील आहेत, हे खरे. पण बाकीचा शहरातील झोपडपट्टीचा आणि ग्रामीण भागातील 'दलित' लोक किती मोठ्या प्रमाणात आजही (व दिवसेंदिवस वाढता) पूर्वी होता तसाच धार्मिक-सामाजिक-आर्थिक व्यवस्थेने दिलेल्या दुर्दशेचे 'भक्ष्य' बनले आहे. अज्ञान, दारिद्र्य, बेकारीचे, अस्पृश्यता व जातियतेचे, अवमान-उपेक्षेचे, लाचारीचे जीवन जगणारे असंख्य लोक जुलूम-अन्याय-पिळवणुकीला आज 'बळी' पडत आहेत. हे समाजवास्तव आजचेच आहे आणि ते दलित कथा-कादंबरीमधून आले-येत आहे. ते

काही या जीवनाचे कोरडे गोडवे गाण्यासाठी नाही. त्या जीवनचित्रणामागे परिवर्तनाची मूलभूत मागणी आहे. त्यासाठीच व्यवस्थेला विद्रोहाचे आव्हान आहे. त्यातून जसे दुःखाचे हुंकार उमटताहेत, त्याप्रमाणे क्रांतीचे हादरेही दिले जात आहेत. पण हे सर्व कोणी कुणाला सांगावे ?

असे बोटावर मोजण्याइतक्या दोनचार लोकांचे आज जे परिवर्तन झालेले आपल्याला दिसते, त्या त्यांच्या स्थित्यंतराचेही (आर्थिक कौटुंबिक) जीवन-चित्रण पुढे मागे होईल, होतसुद्धा आहे. एवढेच की या दोनतीन दशकाच्या थोड्या अवधीत दलित जीवन त्याच्या सर्वांगाने अभिव्यक्त झाले नसल्यास बोट दाखवण्यासारखे त्यात काय आहे ? काळ अनंत आहे आणि दलित साहित्याला पुष्कळच मोठे उजेडी भवितव्य आहे. " अंधारयांत्रिक होण्याचे आम्ही नाकारले, म्हणून आता प्रकाशाची पायवाट जवळ केली आहे. "

—याउलट ज्याला मूलभूत असे मानवी विद्रोही तत्वज्ञानाचे प्रेरणाबळ व क्रांतीचा पाया वरच लाभलेला नाही आणि सामाजिक परिवर्तनाला अनुकूल होतील, अशा स्पष्ट व निश्चित दिशा, जाणीवाही लाभलेल्या नाहीत आणि जे जुन्यालाच आजही चिकटून देवधर्म-रुढीचा स्पर्श-संवाद करणारे, पारंपारिक संकेतादर्श-मूल्यांचा आविष्कार घडविणारे असे जे साहित्य व त्याची तथाकथित पुरोगामी ज. सा. चळवळ (की 'टूम' ?) प्रत्यक्षात जनजीवनाशी भिडत नसली, तरी तिचा-आजच्या विद्रोही, पुरोगामी वाङमयाच्या दिंडीत उगीच अग्रक्रम लावायचा आणि सूर मिसळला नाही, की पुढच्याला विनाकारण धक्का द्यायचा असा एकूण रोख दिसतो.

पण अंतःकरणानेच दुःखगंभीर, वेदनाकुल व विद्रोही प्रकृतीच्या या सर्जनशील साहित्याला—समाजपरिवर्तनाच्या मार्गात अडसर होऊ पाहणाऱ्या कुठल्याही जहरी अन्यायी, ढोंगी, दुटप्पी वृत्तीला आणि हरप्रकारच्या सामाजिक विकृतीला जगापुढे नग्न केल्याशिवाय राहवत नाही,—त्याच्या तेजस्वी वृत्तीला साहवत नाही.

(" विद्रोहाच्या नावाखाली वैरभावी साहित्य " (ना. पत्रिका, दि. ७ जुलै, ८५) – डॉ. मनोहर रानडे यांच्या लेखावरील ही प्रतिक्रिया आहे.) o o o

दलित चळवळीच्या पडझडीमधील अक्षर दुवा

कोणत्याही चळवळीला तिचे आपले एक विशिष्ट ध्येयधोरण असते. एक उद्दिष्ट व कार्य असते. आणि चळवळीला तिचे अंतिम असे एक आकांक्षा-फलित अथवा ' लक्ष्य ' असते. भारतातल्या इतर पुरोगामी (डाव्या) चळवळीप्रमाणे दलित चळवळीचे धोरण आहे. येथील प्रतिगामी शक्तीविरुद्ध समाजमानसात विद्रोहभावना जागृत करून लढा देणे, संघर्ष करणे. तिचे काय आहे संघर्ष-विद्रोहाची प्रक्रिया अव्याहत जिवंत व जागृती ठेऊन तिच्याद्वारे माणसाला माणसासारखं जगता यावे म्हणून त्याला माणुसकीचे हक्क आणि सन्मानित सुख व प्रतिष्ठा प्राप्त करून देणे. दलित चळवळीचे लक्ष्य आहे- मानवतेची, मानवयुगाची प्रतिष्ठापना लोकशाही मूल्यांचे जतन करणे. समाजजीवनात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

या दृष्टीतून दलित चळवळीचा विचार केला तर –या चळवळीला जन्म देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार सूत्राला

तत्त्वप्रणालीला एकमुखानं अंगिकारणारी, कार्यान्वित करणारी सूत्रबद्ध नि एकसंघ अशी सुसंघटना अविरतपणे क्रियाशील आहे किंवा नाही ? असल्यास या चळवळीने आपले ' लक्ष्य ' गाठण्यात आजपर्यंत कितपत यश मिळविले ?– किंवा तिची आहे त्या परिस्थितीमध्ये वाटचालीची दिशा कोणती ? आणि जर तिचा एक ध्येय–धोरण व दिशा दिग्दर्शित करणाऱ्या तत्त्वसूत्रांमध्ये वा मूल्यांमध्ये फारकत होऊन चळवळीत विघटनाचीच प्रक्रिया सतत दृग्गोचर होऊ लागली असेल तर त्याचे मूळ कारण कोणते ?– इ. या प्रश्नांचा चळवळकर्त्यांनी अंतर्मुख होऊन शोध घेणे आज आवश्यक झाले आहे.

इतिहास सांगतो, की भारतीय समाजात प्रथमपासून परस्पर-विरुद्ध अशा दोन प्रवृत्ती, दोन आचार व विचारप्रवाह काळापासून वाहत आलेले आहेत. हे दोन्ही प्रवाह वाजवी–गैरवाजवी, सुष्ट–दुष्ट हेतूवर आणि हितकारक वा अहितकारक, पोषक वा मारक अशा दोन परस्परविरुद्ध जीवनमूल्यांवर आधारित आहेत. सामान्य बहुजनांचे हित ते विशिष्ट मूठभर जनांचे अहित आणि मूठभर लोकांचे अथवा विवक्षित समाजगटाचे जे हित ते बहुजनांचे अनहित. यामुळेच त्या परस्परविरुद्ध दोन प्रवृत्तींच्यामध्ये आदिशतकांपासून कलह–संघर्ष भारतीय समाजाच्या गर्भात सतत चालू आहे. दुसऱ्या शब्दात, या देशात ज्या ज्या वेळी बंड वा क्रांतीची पावले उमटत गेली त्या त्या वेळी ती मिटवून टाकणारी प्रतिक्रांतीची वावटळे वरचढ ठरत गेली.

चार्वाकाचा विज्ञाननिष्ठ भौतिकवाद व पुनर्जन्म, चातुर्वर्ण्यादि कल्पनांना कडवा विरोध, गौतमबुद्ध व महावीरानी वर्णव्यवस्थेविरुद्ध केलेला उठाव आदि सर्व समतावादी आंदोलनांचा हितसंबंधी उच्चवर्णियांनी कसा पराभव केला, हा सारा इतिहास अनेकांना ज्ञात आहेच. पण अगदी अलिकडचा अनुभवही वेगळा नाही.

पहिला आधुनिक बंडखोर

दलित शूद्रांच्या अभ्युदय-उद्धाराच्या तळमळीने सामाजिक धार्मिक, आर्थिक पिळवणुकीविरुद्ध विशुद्ध मानवतावादाच्या भक्कम पायावर उभारलेल्या म. ज्योतिबा फुले यांच्या 'सत्यशोधक' चळवळीचे

सामर्थ्यही असेच खच्ची करण्यात आले. ब्राम्हणी धर्म व वर्चस्वाविरुद्ध चालविलेल्या या भक्कम चळवळीचे फुलेंच्या नंतर ब्राह्मण-ब्राम्हणेत्तर वादात रूपांतर झाले. त्यामुळे चळवळीच्या मूळ सामर्थ्यांची विस्तार-व्याप्तीच संकुचित होत गेली. म. फुल्यांच्या या चळवळीला ब्राह्मणांनी खीळ घातली असेल तर हे एकवेळ समजून घेता येते. परंतु ज्या बहुजन समाजाच्या एकता व जागृतीसाठी त्यांनी अहोरात्र झटून चळवळ राबविली होती त्याच ब्राम्हणेत्तर समाजातील मराठा, कुणबी, माळी व तेलीतांबोळी इ. अज्ञ, अंधश्रद्धाळू, धर्मभोळचा (?) नि रुढी शरण्य वृत्तीच्या लोकांनी आपल्या अडाण भोळेपणा व दृष्टीच्या हेकट कोतेपणापायी चळवळीला दगा दिला हे मात्र त्या चळवळीचे मोठे दुर्भाग्य म्हणावे लागेल. परिणामतः या बहुजन समाजाला– तो ज्या धर्मरुढीच्या आणि ब्राह्मणी वर्चस्वाच्या चरकात सापडला होता. त्या छळ पिळवणूकीच्या पंजातून बाहेर पडताच आले नाही.

तरीपण महात्मा फुल्यांचा मानवतामयी बंडखोर विचार मात्र या समाजातील काही मानवताप्रेमी, सूज्ञ–सुहृदांच्या मानसपटलावरून पुसला गेला नव्हता. त्या विचारांची मानसिकता एका अव्यापारेषु समाज-जाणिवेच्या प्रक्रियेतून समाजाच्या अगदी खोलातून–तळातून प्रवाहित झाली होती. तत्त्वे वा विचारप्रेरणा कधीच मरत नसतात.

डॉ. आंबेडकरांचे कार्य

महात्मा फुले यांच्या त्या सार्वजनिक सत्यधर्मीय, बुद्धि प्रामाण्य-वादी मानवतावादी तत्त्वज्ञानाच्या विचारार्थी चतुरस्त्र विद्वान, सामर्थ्य-शाली बंडखोर बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने साजिवंत झाल्या. त्यांनी उभारलेल्या 'दलित चळवळी'तून पुन्हा त्या मनामनात सळसळून उठल्या–आणि नव्या बंडखोर युगांची तेजस्वी पहाट फुटली. समाजाचे सर्वांग उजळून टाकणारा सूर्यच उदय पावला.

डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीने आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय इ. सर्व क्षेत्रात एकाहून एक वरचढ अशी यशस्वी उड्डाणे घेतली. सामाजिक व राजकीय बाबतीत सत्ताशिक्षण व सवलतीचे हक्क मिळवून देऊन त्यांनी दलित जीवनाचा कायापालटच

केला. दलित माणसात अस्मिता जागृत केली. त्यांच्या बौद्धिकतेला, मानसिकतेला विज्ञाननिष्ठ युगधर्मांच्या नव्या आयामांनी उत्फुल्ल करून समाजाचे सांस्कृतिक उत्थान घडवून आणले. बाबासाहेबांनी दलित जीवनात क्रांतीच केली. त्यांच्या विचार-वाणीने आणि कृती–उक्तीने उत्स्फूर्त झालेल्या दलिताला नव्या युग-प्रेरणा मिळून जीवनमूल्य व सामाजिक जाणिवांचे, विचारांचे आणि त्यांच्या अविष्काराचे नव्यानेच बळ प्राप्त झाले. दलित साहित्य हे चतुरस्त्र प्रतिभाशाली डॉ. आंबेडकरांच्या सर्वांगीण सर्वस्पर्शी क्रांतिप्रवण चळवळीला धरलेले विचार-विकारांचे भाव-सुंदर फूल आहे. त्यांच्या बंडप्रेरक कृती-उक्तीचा व विचार-वाणीचा विद्रोह-स्त्रोत म्हणजे दलित साहित्य होय. अशी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक चळवळ डॉ. आंबेडकर गतिबद्ध करून गेले. ते गेले आणि–

दलित चळवळीची घसरगुंडी

सत्यशोधक चळवळीला म. फुले गेल्यानंतर प्रतिगाम्यांनी जसे ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर वादात गोवून तिला वैशिष्टयहीन केले, त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अथवा साहित्यिक या अंगानाही त्याच वर्णवर्ग व जातीयवादी-वर्चस्ववादी प्रतिगामी मंडळाने सत्वहीन आणि वैशिष्टय विहिन करण्याचा प्रयत्न चालू केला. त्यामुळे चळवळकर्त्यांमध्ये एक प्रकारचा विभ्रम पैदा होऊ लागला आहे.

चळवळीचे स्वत्त्व हरवून तिचे अंतस्वरूप बिघडण्यास व त्यामुळे संघटनेचे विघटन होण्यास चळवळीचे काही कर्ते घटक काही आमिषाने वा कुठल्या तरी स्वार्थी लोभाने हेतूबद्धल होऊन काही प्रमाणात कारण ठरवतातही. पण तरी ते आपण होऊन सर्वस्वी कारण ठरत नसतात. आणि त्यामुळे पूर्ण चळवळ काही कोलमडण्याचे कारण नसते. कारण असते- प्रतिगामी वृत्तीद्वारा तिच्या पिच्छास लागलेली हेतूभेसूर बळाने व्याप्त अशी गुप्त वा अदृश्य यंत्रणा. ती यंत्रणा जेव्हा दृश्यरूपाने कार्यान्वित होऊ लागते. त्यावेळी चळवळीच्या उद्दिष्ट-कार्यातील उत्थानक्रियेवर प्रतिक्रिया अथवा क्रांन्तीवर प्रतिक्रांन्ती दृष्टिगोचर होताना आढळते.

नेमकी हीच गोष्ट प्रथम दलितांच्या राजकीय चळवळीच्या संदर्भात घडली. दलितांचे राजकारण पडले. मागाहून तीच क्रिया सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत घडू लागली. उदाहरणार्थ दलित पॅन्थर्सची सुरुवातीस लोकाभिमुख झालेली जोरदार सामाजिक चळवळ पण 'राजकीय' रिपब्लिकन पक्षाचे झाले तेच ' सामाजिक ' पॅन्थरच्या वाटचाला आले. दलितांच्या घसरगुंडीस लागलेल्या राजकारणाची अशुभ छाया पडून धार्मिक बाबतीतसुद्धा एकसंघ अभिन्नत्वाचा उःशाप दिसत नाही. आता राहता राहिली–दलितांच्या सांस्कृतिक चळवळीचे प्रधानांग अशी दलित साहित्य चळवळ.

दलित साहित्य व मार्क्सवाद

दलित साहित्य हे जीवनाचे प्रतिबिंबच नाही, तर अख्ख्या दलित जीवनाचे–जीवनाएवढेच मोठे–अंतःदर्शन घडविणारे जीवनमूल्य आहे ते कलावाङ्मय असल्याने आणि त्याला जीवनाचेच सौन्दर्य(वाङ्मयदृष्टचा) लाभले असल्याने दलित साहित्य हे कलामूल्यही ठरले आहे आणि ते माणसाच्या सामाजिक न्यायाचा, मुक्तीचा उद्‌गार व मानवतेचा करूण-क्रान्त हुंकार असल्याने दलित साहित्य हे महत्तम मानवी मूल्यच आहे. असे हे मानवी जीवनाचे महान मूल्य असल्यामुळे दलित साहित्याची चळवळ तिला विशुद्ध मानवतावादाचा अक्षरदुवा लाभला असल्याने– कुणी मारून मरणारी नाही–आहे. हे खरे असले तरी दलितांच्या या साहित्य चळवळीतही सृजनशील निर्माणकर्त्या साहित्यकारात विभिन्नत्वाची, वर्तुळत्वाची वा विलगत्वाची हेतूगर्भित प्रस्थापित उद्दिष्टचे अध्याहृत होताना दिसत आहेत. त्याचे एक कारण दलितांच्या साहित्यिक चळवळीत झालेला, होऊ पहाणारा भारतीय मार्क्सवादी विचारवंत व लेखकांचा हस्तक्षेप हे होय.

आर्थिक शोषण प्रवृत्तीला विरोध करणाऱ्या मानवतावादी मूळ मार्क्सवादाशी दलित चळवळीचे वैर असण्याचे कारण नाही. शोषणयुक्त आर्थिक व्यवस्थेचे दलितांपैकी कुणी गौरव करणार नाही. परंतु आंबेडकरवादित्वाचे श्रेय डावलून वा कमी करून आणि दलित चळवळीच्या आंबेडकर प्रणित मूळ तत्त्वज्ञानाच्या बैठकीला बगल देऊन तिथे केवळ

आर्थिक-वर्गीय दृष्टीकोण बाळगणारी मंडळी बहुजनसमाजाच्या सर्वांगीण विकासाच्या 'व्यापक' नावावर पुढे येऊन चळवळीचे मूळ वैशिष्टच मारू बघत असेल, तर हा धोका दलित साहित्यिकांनी वेळेवर ओळखायला पाहिजे. मुख्य अडचण-मार्क्सवादीच्या पडदयाआड असलेली ही भारतीय मार्क्सवादी मंडळी भारतीय हिंदू संस्कृतीच्या जात व वर्ण परंपरेतून पूर्णतः मुक्त झालेली आहेत कां ? तसे नसेल तर–आणि दलित चळवळीला त्यांची हृदयाच्या साक्षीने सहयोग व साथ असेल तर हे लोक मग दलितांच्या मूळ सामाजिक, सांस्कृतिक आंबेडकरी प्रेरणा आधी का स्वीकारीत नाहीत ? पण तसे करण्यात–भारतीय मार्क्सिस्टांचा सुरुवातीपासूनचा इतिहास आहे, की–त्यांना हिंदुत्व आड आले आहे–येत आहे ? एका डोळस मार्क्सवादी विचारवंतानेच म्हटल्याप्रमाणे–पुरोगामी लेखकाचे लक्ष आर्थिक लढ्यावर केंद्रित करण्यात मार्क्सवादाने जणू लेखकांना एक विषयच नेमून दिला आणि त्यामुळे भारतीय तळजीवनाचा वास्तव व स्वयंस्फूर्त उद्‌गार बाहेर येऊ शकला नाही. इतिहासाला गती देण्याऐवजी इतिहासाने भारतीय मार्क्सवादाला धक्के देत पुढे ढकलले आहे.(प्रा. रा. मुक्तिबोध)

मार्क्सवादी साहित्य म्हणजे नुसत्या आर्थिक व वर्गीय दृष्टीच्या आग्रही मर्यादांनी बंदिस्त साहित्य. त्यातील प्रेरणा दलित साहित्य चळवळीला सध्यावस्थेत तरी पोषक ठरेल, असे वाटत नाही. तो पुढचा टप्पा ठरेल. दलित चळवळीचा लढाच मुळात माणसाला माणूस न मानणाऱ्या, माणूस म्हणून त्याची इज्जत-प्रतिष्ठा नाकारणाऱ्या, एवढेच काय– त्याला असलेले सन्मानित सुखही छिनून घेणाऱ्या अघोर पाखंड प्रवृत्तीविरुद्ध आहे. माणसाला तुच्छ–अस्पृश्य मानणे, त्याचा तिरस्कार करणे, जातीयवाद पेटवून त्याला मारण्या-जाळण्याचे–शक्ती व सत्त्वहीन करण्याचे माणुसकीहीन वर्तन करणे,–हे सर्व काय वर्गीय आर्थिक समस्येतूनच निर्माण झाले आहे ? भारतात 'केवळ गरीब-श्रीमंत, नोकर- मालक अशी वर्गव्यवस्था पूर्वी तरी होती काय ? ही व्यवस्था होती ती वर्ग व्यवस्था की वर्ण व्यवस्था म्हणजे जाती व्यवस्था होती ?

पुरोहित ब्राह्मणांनी आर्थिक दृष्टीनं जीवनयापन व उपजिविकेच्या

सोयीसाठी पहिल्यांदा चातुर्वण्य समाजव्यवस्था निर्माण केलीही असेल. पण माणसाला मग शूद्रांच्याही खालच्या अंत्यज 'अस्पृश्य' व सर्व दृष्टीने 'दलित' कशासाठी करून ठेवले ? माणसाला माणसाप्रमाणे वागवून फक्त त्याचे आर्थिक शोषण तेवढेच करण्यासाठी की काय ? की त्याचे सर्वस्व छिनून सर्वार्थाने हीन-दीन, लाचार-अपंग करून आपले आर्थिक-सामाजिक वर्चस्व आणि मान-प्रतिष्ठा समाजात बिनधास्त अक्षर-अमर करून ठेवण्यासाठी ?

जातिभेद व वर्गभेद

वर्णाधिष्ठित विषमतेचे अपत्यजातीय वाद ही जातिव्यवस्थेची अत्यंत विकृत परिणती आहे. ही जातीयवादी समाजरचना अगोदर मोडून काढल्याशिवाय बहुजन समाजाचा केवळ आर्थिक वर्गीय पायावर ही मंडळी कसा काय सर्वांगिण विकास साधू शकते, हे कळत नाही. वर्णव्यवस्थेचे फलित वा व्यवच्छेदक लक्षण वर्ग नसून जात आहे. जात म्हणजे वर्ग नव्हे किंवा वर्ग म्हणजे जात होत नाही. या दोहोंच्या प्रात्यक्षिक स्वरूपात महदन्तरच आहे. वर्ग कलहाच्या परिणामापेक्षा जातिसंघर्षाचे परिणाम भयंकर समाजविघातक व मानवतेला काळिमा आणणारे असतात. ते माणसाला पशुपातळीवर आणून सोडतात. जात ही समाजाच्या प्रगतीची खीळ आहे. समाजाला लागलेला महाभयंकर रोग आहे. तिने काळापासून हिंदु समाजाचे, माणसाचे अधःपतन करून ठेवले आहे. तसे वर्ग व्यवस्थेचे नाही. गरीब-श्रीमंत, भांडवलदार-मजूर स्वामी-दास हे वर्गव्यवस्थेचे विभाजन संपूर्ण समाजभर वेढले नसून सीमितच आहे. उलट भारतीय समाज हा असंख्य हजारो जाती-पाती मिळवून बनलेला आहे आणि हिंदू धर्म संस्कृतीचे हेच मुख्य वैशिष्टय आहे.

एकाने म्हटल्याप्रमाणे 'जी कधीच जात नाही अशी ती वस्तू म्हणजे जात होय' हे खरे आहे. याउलट 'दैनंदिन व्यवहारात जगताना माणसाला जात नसते' असे दलितांमधून (आश्चर्य) कोणी म्हणतात त्यांना जातीय विषमतेचे चटके सोसावे लागले नसतील कदाचित, त्यांना 'आहे नाही' च्या वर्ग कलहाचीच (ही दलित

समस्येच्या पलीकडची पुढची झेप) झळ अधिक जाणवली असेल तर असू दे. अहो पण इथे जगतानाच माणसाला जात आड येत नाही, आहे काय ? हे भारतभर अत्याचार, बलात्कार, जाळपोळ, मारतोड यांचे सत्र कशाचे निदर्शक ? तेही खालच्याच हीन ? जातीवर का ? गरीब फक्त खालच्याच जातीचे नसतात. पण एखाद्या श्रीमंत दलितावर सुद्धा सारखेच अन्याय, अत्त्याचार का होतात ? ती आड आली नसती तर दलित चळवळीचा कदाचित जन्मही झाला नसता आणि तेव्हा वर्गलढाही भारतात यशस्वी झाला असता.

भाकरीबरोबर प्रतिष्ठा हवी

" आम्हाला भाकरीपेक्षा प्रतिष्ठा प्यारी आहे. " असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. ते त्यांच्या सबंध आयुष्याला जातीय विषमतेच्या, अस्पृश्यतेच्या आगीत दुःख, अपमानाने पोळून काढणाऱ्या अनुभवातून आणि त्याच अवस्थेतून जात असलेल्या आपल्या समाजाचे डोळाभर हाल पाहून म्हणून त्यांनी " झगडा झगडा आणि ही जातियतेची, अन्याय विषमतेची जन्मदात्री चातुर्वण्य समाजरचना सर्वा अगोदर मोडून तोडून टाका. स्वाभिमानाचे सन्मानाचे जिणे जगा! आपल्या हक्कासाठी लढा. लाचारी पत्करून मागितल्यावर काही मिळावयाचे नाही. त्यासाठी अविरत संघर्ष करा. आपलं हक्क आपणच संघटितपणे संघर्ष करून मिळवा! " असा समाजाला संदेश दिला. याचा दलितांना विसर पडणे शक्य नाही.

हे थोडचा विस्ताराने लिहिण्याचे कारण दलित चळवळीचे पुढे जाताना थोडे मागे वळून इतिहासाचा अनुभव लक्षात घ्यावा. आपण तो अनुभव लक्षात येत नाही म्हणून (नको) त्याच त्या इतिहासाची पुनरावृत्ती होते. दुसऱ्या दलित चळवळीचा ज्याच्याशी लढा आहे त्या वर्णविषमतावादी, जातीयवादी प्रतिगामी हिंदुत्वाशी (हिं. म. ज.) सं. रा. स्व. सामना करून त्याचे दमन करणे जेवढे सोपे असेल तेवढेच करून पुरोगामित्वाचा परिवेष घेणाऱ्या आतून मात्र हिंदुत्ववाद्यांच्या समाजविघातक यंत्रणेशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जळून असणाऱ्या काही तथाकथित पुरोगामी मनोवृत्तीचा निपटारा करणे अधिक कठीण आहे.

कारण त्या मित्र म्हणवणाऱ्या व्यक्तित्व वृत्तींना उघडपणे व सहजपणे शत्रूही ठरवता येत नाही. ही अडचण आहे. तथापि, या सुरात सूर मिळविणाऱ्या झाकल्या झोलांच्या उलटचा कारवायांचा धोका ओळखून स्वच्छपणे आणि अंतःकरणाच्या प्रामाणिकपणाने दिलेल्या हाताची साथ देखील न टाळता दलित चळवळीला आपल्या मूळ सामर्थ्यासह पुढील मार्ग आक्रमावयाचा आहे.

' मला माझी म्हणता येण्यासारखीही मायभूमी नाही. मी ज्या जगात राहतो ते जग माणसाला जगण्यासारखे खचित नाही म्हणून मी अशा जगात मरणार नाही. मरता येण्यासारखे माणसाचे जग निर्माण होईस्तवर मी वाट पाहीन. झगडत राहीन ' – हेच दलित चळवळीचे ब्रीद आणि अंतिम लक्ष्य आहे. ते लक्ष्य गाठण्याच्या मार्गात कितीही अडथळे आलेत तर येवोत, दलित चळवळीला – ती पडत उठत असतानाही–मनुष्यत्वाचा ध्येय सुन्दर अक्षर-दुवा लाभला असल्याने ती गतकालातील अगतिक माणसाच्या मुर्दा मनाने जगणार नाही आणि अशा ' मुर्दाबाद ' जगात मरणारही नाही तर माणुसकीचा पराक्रमी उद्घोष करीत अमानुष अशा या समाजव्यवस्थेचे मढे पुरते गाडून पुरून नव्या उमेदीचे नवे जग माणसाचं. बुद्धीचे समता, स्वातंत्र्य, न्यायाचे नवे स्वतंत्र युग निर्माण करण्याच्या आपल्या जीवनकार्याशी दलित चळवळ एकदिलाने एकरूप व कटिबध्द होऊन सतत आपली तेजोदर वाटचाल करीत राहील.

o o o

REFBK-0025379

. . . . या दलित साहित्याची सर्वच दृष्टींनी एकमेव मूलात्म प्रेरणा डॉ. आंबेडकर हीच होय. कारण, आंबेडकर म्हणजे या क्रांतीयुगाचा परिवर्तनवादी विचार आहे. न्यायसमतेचं, मानवतेचं तत्त्वज्ञान आहे, आणि ते संघर्ष–प्रेरक आहे. किंबहुना समाजातील अन्याय विषमतामूल परिस्थिती पोसणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपणाचे हक्क व प्रतिष्ठा मिळवून देऊ इच्छिणाऱ्या वर्णजातीय समाजव्यवस्थेला तोडून नवी समाजरचना आणि मानवतेची प्रस्थापना करू पहाणाऱ्या आजच्या दलित चळवळीला विद्रोह–बंड, नकारादी लाभलेली प्रेरक तत्त्वे प्रसृत करणारे एकूण आंबेडकरी दर्शन म्हणजेच आंबेडकर वाद हेच दलित साहित्याचेही ध्येय होय. अर्थात ते परिवर्तनवादी आहे. या सामाजिक बांधिलकीत दलित जाणीव अंतर्भूत आहे.

नवी रामदास पेठ
नागपूर–४४० ०१०

वि. भि. कोलते